आधुनिक केसरी

रविवार, १ जानेवारी २०२३

AURANGABAD (MAHARASHTRA) ●PAGE-08 ●PRICE-5 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●RNI : MAHMAR/2021/82566

## विशेष संपादकीय

# लेखणीतून न्यायाचा आवाज बुलंद करणारे वसंत मुंडे

आधुनिक केसरी

**डॉ. प्रभू गोरे, मुख्य संपादक**

अन्यायाविरुद्ध स्वर गर्जनेचा, लेखणीतून बुलंद आवाज जनतेचा।

पत्रकारिता म्हणजे अतिसामान्यांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवण्याचे प्रभावी माध्यम आहे हे खूप कमी वयात उमगलेला वसंत मुंडे नावाचा तरुण पत्रकारितेत आला आणि सामान्यांचे प्रश्न मांडता मांडता वृत्तपत्रांचे आणि पत्रकारांचेही प्रश्न मांडू लागला! आश्चर्य म्हणजे वसंत मुंडे यांनी वयाच्या सोळाव्या वर्षी पहिल्यांदा भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठवला. विद्यार्थिदशेत असताना गावालगत रोजगार हमी योजनेत सामाजिक वनीकरणाच्या कामावरील मजुरांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन त्यांची आर्थिक फसवणूक करण्यात आली होती. तशी ती बर्याचदा होते. 'लोकमत'चे अंबाजोगाईतील तत्कालीन पत्रकार मोटेगावकर सरांना हा भ्रष्टाचार सांगून त्यांनी या सर्व मजुरांना न्याय मिळवून दिला.

पुढे पत्रकारितेचं औपचारिक शिक्षण घेतल्यानंतर दैनिक लोकसत्तामध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती मिळाली आणि वसंत मुंडे तेथे वीस वर्षांपासून कार्यरत आहेत. लेखणीतून वंचित, उपेक्षित वर्गासाठी काम करणाऱ्या अनेक संस्थांना त्यांनी आर्थिक मदत उभी करून दिली. शेती, शिक्षण या विषयांवर सकारात्मक व ऊर्जा निर्माण करणारे विपुल लिखाण केले. त्यातूनच तत्कालीन पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी बोलावलेल्या निवडक पन्नास पत्रकारांच्या राष्ट्रीय परिषदेतही मुंडे यांची निवड झाली होती. ऊसतोडणी मजुरांबरोबर राहून लिहिलेल्या लेखमालिकेला 'समर्थ'ने शिष्यवृत्ती दिली. याशिवाय अनेक पुरस्कारही मिळाले. उत्तम संवाद व बिनधास्तपणे मोजक्या शब्दांत विषय मांडण्याची हातोटी हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.

### प्रश्न मांडले, मार्ग सांगितले:

लेखणीतून सामान्यांचे प्रश्न मांडताना सहकारी पत्रकारांच्या प्रश्नांचीही जाणीव वसंत मुंडे यांना झाली. समाजाचे प्रश्न मांडणाऱ्या पत्रकारांच्या प्रश्नांकडे बऱ्याचदा डोळेझाक होते. पत्रकारांना काही प्रश्न असतील असे राज्यकर्ते व समाजालाही वाटत नाही. हे जाणवल्यानंतर मुंडे यांनी पत्रकार संघाच्या माध्यमातून वार्ताहर आणि संपादकांचे प्रश्न मांडत ते सोडवण्याचे मार्गही सांगितले. औरंगाबाद विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर मुंडे यांनी महाराष्ट्रात पहिल्यांदाच प्रत्येक जिल्ह्यात शासकीय समितीची पत्रकारांबरोबर थेट खुली चर्चा उपक्रम राबवला. त्यातूनच जाचक अटी शिथिल होऊन अधिस्वीकृती पत्रिका मिळण्याचा मार्ग सोपा झाला. शहरापासून गावपातळीपर्यंतच्या पत्रकारांचे प्रश्न मांडून ते सोडवले जात असल्याने याची दखल तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही घेतली.

### संपादक नसलेला पहिला अध्यक्ष:

वसंत मुंडे यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या (मुंबई) राज्य अध्यक्षपदी एकमताने निवड झाली. संपादक नसताना पत्रकाराची अध्यक्षपदी निवड होण्याची संघटनेच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ होय! तब्बल तेरा हजारांपेक्षा अधिक पत्रकार सदस्य असलेल्या संघटनेचे कामकाज अधिक लोकाभिमुख करण्यासाठी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यावर वसंत मुंडे यांनी आधुनिक पद्धतीचा वापर केला.

### स्वावलंबी होण्यासाठी संपादकांची गोलमेज परिषद

समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे अडचणीत असलेला वृत्तपत्र- व्यवसाय कोरोनामुळे अधिकच डबघाईला आला. जाहिरातींचा ओघ कमी झाल्याने साखळी वृत्तपत्रासह छोट्या वृत्तपत्रांचेही आर्थिक गणित बिघडले. उत्पादन खर्चाच्या तीस टक्के किमतीत घरपोहोच वृत्तपत्र देण्याचे पारंपरिक धोरण; त्यात कोरोना, ऑनलाइन वाचनाची सवय यामुळे आर्थिक संकट ओढावले आणि काम करणाऱ्या पत्रकारांना पगारकपातीला सामोरे जावे लागले. अनेकांना तर नोकरीही गमवावी लागली. अशा परिस्थितीत वसंत मुंडे यांनी औरंगाबादमध्ये संपादकांची पहिली गोलमेज परिषद घेऊन वृत्तपत्रांनी आर्थिक स्वावलंबी होण्याचे आवाहन केले. मागील वीस वर्षांत पेट्रोल ३० रुपयांवरुन १२० रुपये, तर डिझेल १६ रुपयांवरुन ९७ रुपये लिटर झाले. एक रुपयाचा चहा दहा रुपये झाला. छपाईचा कागद २५ रुपयांवरुन १०० रुपयांपर्यंत झाला. सरकारने जाहिरातीवर व इतर वस्तूंवर ५ टक्के जीएसटी आणि इतर कर लावल्याने किमती पाच पटीने वाढल्या. असे सर्व वस्तूंचे भाव वाढत असताना वर्तमानपत्रांच्या किमतीत मात्र एक पटीनेही वाढ झाली नाही. आजही ८ ते १२ पानांची वर्तमानपत्रेही दोन ते पाच रुपयांत घरपोहोच दिली जातात. त्यामुळे उत्पादन खर्चाच्या २० टक्के विक्री किंमत असणारे हे जगातील एकमेव उत्पादन आहे. जाहिराती कमी झाल्याने तोटा भरून काढणे अशक्य असल्याने विक्री किंमत वाढवण्याचे गणित वृतपत्रांचे मालक, संपादक, वितरक यांना पटवून दिले. लोकपत्रकार भागवत तावरे यांनी शब्दबद्ध केलेली वसंत मुंडे यांची 'वृत्तपत्रांचे अर्थकारण' या विषयावरील मुलाखत राज्यातील तब्बल तीनशेपेक्षा अधिक वृत्तपत्रांनी प्रकाशित करून समर्थन केले. परिणामी राज्यातील तीनशेपेक्षा अधिक दैनिकांनी विक्री किंमत वाढवली. एका पत्रकाराची एकच मुलाखत विविध दैनिकांत प्रसिद्ध होण्याची ही पहिलीच वेळ असल्याने वसंत मुंडेंचे नेतृत्व सर्वमान्य झाले.

### साप्ताहिक सुटी घ्या, फायद्यात राहा!

वृत्तपत्र व्यवसायाला ऊर्जित करण्यासाठी केंद्र सरकारने करदात्यांना वृत्तपत्र खरेदीवर उत्पन्नकरात वार्षिक पाच हजारांची सवलत द्यावी, अशी मागणी श्री. वसंत मुंडे यांनी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांच्याकडे केली असून याबाबत सकारात्मक विचार सुरू आहे. पूर्वी माहितीची इतर माध्यमे नसल्याने वृत्तपत्रे नियमित काढण्याचे धोरण रूढ झाले होते. मात्र आता इतर साधने उपलब्ध असल्यामुळे वृत्तपत्रांनीही रविवारची सुटी घेतली पाहिजे. सरकारनेही आता पाच दिवसांचा आठवडा केला आहे. खासगी उद्योगातही सुटी असते. हा विचार मांडताना सुटीतून वृत्तपत्रांच्या आर्थिक फायद्याचे आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचे गणित त्यांनी मांडले. याचा काही दैनिकांनी स्वीकार केल्याने त्याचे चांगले परिणाम दिसू लागले आहेत.

### नव्या उपक्रमांतून आश्वासक वातावरण:


वर्षानुवर्षे सरकारकडे मागण्या करून काय साध्य झाले? याचा विचार करून माध्यमातील लोकांनीच सक्षम झाले पाहिजे अशी भूमिका वसंत मुंडे यांनी केवळ मांडली नाही तर पत्रकार संघाच्या माध्यमातून नवीन पायंडे सुरू केले. कोरोना काळात २८ जिल्ह्यांतील पत्रकारांशी वेबसंवाद करून लोकसहभागातून पत्रकारांना किराणा साहित्यासह मदत मिळवून दिली. पत्रकार संघाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या. एकाच दिवशी राज्यभर 'रक्तदान' शिबिर घेऊन चौदाशे बॅग रक्त संकलन करून देण्याचा विक्रम नोंदवला. समाज माध्यमाच्या मोहजालातही संवाद कायम राहावा यासाठी औरंगाबाद विभागीय कार्यालयात वार्तालाप तर बीड येथे मासिक व्याख्यानमाला सुरू केली. परिणामी राज्यभरात संघाच्या माध्यमातून वार्तालाप घेतले जात आहेत. दिवाळीत स्नेहमिलन, तर रमजान ईदमिलन कार्यक्रम घेऊन संघाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न केला. दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबीयांना लोकसहभागातून मदत उपलब्ध करून देण्याबरोबरच वैद्यकीय उपचारांसाठीही संघाच्या माध्यमातून मदतीचा हात दिला. अशा नवीन उपक्रमांतून संघटना आणि वृत्तपत्रक्षेत्रात नव्या परंपरा पुढे आणत या क्षेत्राला सक्षम करण्यासाठी वसंत मुंडे यांनी आश्वासक वातावरण निर्माण केले आहे.

### पाच विभागीय अधिवेशने:

वृत्तपत्रांचे अर्थकारण आणि पत्रकारांच्या समस्या यावर औरंगाबाद येथे संपादकांची गोलमेज परिषद आणि लातूर, ठाणे, नागपूर, जळगाव येथे विभागीय अधिवेशने घेऊन वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर जागृतीची चळवळच वसंत मुंडे यांनी उभी केली आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर देशपातळीवर वृत्तपत्रांच्या अर्थकारणावर स्वतंत्र अधिवेशने होण्याची ही पहिलीच वेळ होती. या पुढेही पत्रकारांसह समाजाच्या प्रश्नांना भिडण्याचे नवनवे मार्ग श्री. वसंत मुंडे शोधून काढतील याची खात्री आहे. सर्वजनहिताच्या या वाटेवर आम्ही त्यांच्या सोबत आहोत याचीही आम्ही ग्वाही देतो.

जुने जाऊ द्या मरणालागुनी, जाळुनी किंवा पुरुनी टाका
सडत न एक्या ठायी ठाका, सावध! ऐका पुढल्या हाका...

असे कवी केशवसुतांनी 'तुतारी' कवितेत म्हटले आहे. काळाच्या पुढे पाहणारे श्री. वसंत मुंडे यांची कामाची अभिनव पद्धत पाहून ही कविता हमखास आठवतेच! ●●●





# सोळावं वरीस मोक्याचं करीत बहरलेला वसंत





श्रावण गिरी
संपर्क क्र.
9527540168

**सोळावं वरीस धोक्याचं,या बिघडण्याच्या वयात आम्ही घडलो असा आपल्या कर्तृत्वाचा परिचय देण्याचे अनुभवसिद्ध सामर्थ्य असणारे पत्रकार वसंत मुंडे यांनी गावालगत सुरू असलेल्या रोजगार हमी योजनेच्या कामातील भ्रष्टाचारा संबंधी वयाच्या सोळाव्या वर्षी आवाज उठवून सोळावं वरीस मोक्याचं केलं. पुढील काळात मराठवाडासाठी, लोकपत्र आणि लोकसत्ता मधून अस्तित्व सिद्ध करीत २००३ साली लोकसत्ता दैनिकाच्या जिल्हा प्रतिनिधी पदापर्यंत मजल मारली. परिश्रमातून बहरलेला हा वसंत अव्याहत मोहरताना ग्रामस्थ लाडझरी ता अंबाजोगाई ते मराठी पत्रकार संघाचा प्रदेशाध्यक्ष होऊन गावापासून मुंबईपर्यंत सर्वांना आपल्या कार्याचा सुगंध देतो.**

आधुनिक केसरी

कर्तृत्व सर्वसिद्ध असताना त्यांची नाळ मातीशी आणि पाय जमिनीवर आहेत. आयुष्यात अनेकांना संधी मिळते त्याचं सोनं करायचं की माती करायची ,हे ज्याच्या त्याच्या कर्माने स्पष्ट होत असते. वसंतरावांनी संधीचं सोनं करीत शोधवार्ता, ऊसतोडणी, कामगारांचे प्रश्न, उपेक्षितांचे जगणे, वंचित निराधार आणि शेतीमातीवर लिहीत सामान्य माणूस आपल्या लेखणीचा केंद्रबिंदू केला .परिणामी २००७ साली तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी ग्रामीण भागातील विकास कायद्याच्या अंमलबजावणी संदर्भात बोलावलेल्या पत्रकार परिषदेसाठी निवडक ५० पत्रकारात त्यांना निमंत्रित केले. बीडमधील राज्यस्तरीय स.मा.गर्गे पत्रकारिता पुरस्काराचा देखणा कार्यक्रम प्रतिवर्षी सत्तेत असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न होताना मी पाहिला आहे. उदाहरण म्हणून पहायचे तर या कार्यक्रमातील विलासराव देशमुख आणि गोपीनाथ मुंडे यांची जुगलबंदी महाराष्ट्राने अनुभवली. गिरीष कुबेर, अनंत राऊत, निखिल वागळे अशा पत्रकारांचे सन्मान कायम स्मरणात राहतील .विस्तार मर्यादेमुळे सर्व उपस्थितांचा नामोल्लेख टाळून या निमित्ताने मी इतकंच सांगू इच्छितो की, शासन प्रशासनाचा मध्य बणून सामाजिक आरोग्य सुदृढ करणारे पत्रकार वसंत मुंडे हे जनसामान्यांच्या गळ्यातील ताईत आहेत, हे निःसंशय!

सर्पराज्ञी, शांतीवन, इनफंट इंडिया ,अनाथालय अशा प्रकल्पांना प्रसिद्धी देत लोकसत्ता मधून आवाहन करीत त्यांनी केलेले निधी संकलन आणि पत्रकार संघाच्या वतीने दिलेल्या तात्काळ रुग्णवाहिका आणि इतर सामाजिक कार्य पहाता विशेषत: शाळा विकास आराखडा आणि ग्रामीण भागातील त्यांनी पुरविलेले लक्ष याची आवर्जून नोंद घ्यावी लागते. व्याख्याने देत रक्तदान शिबिरे घेत, गरजूंना आरोग्य सुविधा पुरवत त्यांचे सुरु असलेले कार्य असो वा यावर्षी नेत्रदान नोंदणीचे त्यांनी केलेले आवाहन असो त्यांच्या डोळस वृत्तीचे आणि सामाजिक दृष्टीचे हे उत्तम उदाहरण आहे. विधिमंडळ आणि संसद स्तरावर त्यांच्या कार्याची दखल घेऊन शरद पवार, देवेंद्र फडणवीस ,कपिल पाटील, गुलाबराव पाटील, विलास मुत्तेमवार ते अगदी अलीकडे डॉ. भागवत कराड यांच्यापर्यंत सत्तेतील राज्यकर्त्यांनी त्यांची नोंद घ्यावी ,याचे बहुतांश श्रेय ते आत्मविश्वासाची परिपूर्ण बांधणी करणाऱ्या लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना देतात.

वृत्तपत्रांचे अर्थकारण या विषयावर वसंत मुंडे यांनी रान पेटवले .समाजाचे प्रश्न मांडणारे पत्रकार उपासपोटी असतात. कौतुकाची थाप त्यांचा उत्साह वाढवणारी असली तरी त्यांचं पोट भरण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे, हे त्यांना अनुभवाने ठाऊक होते. कदाचित त्यामुळेच अधिस्वीकृतीचे औरंगाबाद विभागीय अध्यक्ष झाल्यावर त्यांनी तालुकास्तरावर अधिस्वीकृतीधारक असावेत, ही भूमिका मांडली. एकूणच पारंपारिक आकृतीबंध तोडून व्यवस्थेने दुबळे ठरविलेल्या वर्गाला बळ देण्याचं काम त्यांनी केलं. पत्रकार आणि मालक दोघेही सक्षम नसताना दहा रुपये उत्पादन मूल्य असलेला पेपर दोन रुपयात विकणारा मालक लॉकडाऊन मध्ये पार कोलमडलेला त्यांनी पाहिला. त्यांच्या मनाची बांधणी करीत दैनिकाच्या किमतीत वाढ करण्याची मानसिकता प्रथम त्यांनी तयार केली. त्यासाठी संपादकांची गोलमेज परिषद घेतली. वृत्तपत्र व्यवसाय उद्योगात लघु उद्योगाचा समावेश असावा, ही भूमिका घेऊन जनजागृती केली. प्रश्न जाणून घेऊन त्यावर तोडगा सुचविणारे हे सक्षम नेतृत्व महाराष्ट्र पत्रकार संघाला लाभले, हा खरोखर ग्रामीण परिसराचा सन्मान आहे. दैनिकाची उत्पादन शुल्क आणि विक्री मूल्य याचा मेळ घालून दैनिकाची विक्री किंमत वाढविण्याची मानसिकता सर्वप्रथम बदलली पाहिजे हा पवित्र घेत अत्यंत अवघड असलेला हा विषय त्यांनी सर्वत्र फिरून या क्षेत्रातील लोकांना समजून सांगितला त्यांची मनोभूमिका तयार केली. दैनिकांना साप्ताहिक सुट्टी असावी, हा विचार अथवा आय करातून या व्यवसायाला सूट मिळावी त्यातून रोजगार निर्मितीला चालना मिळेल आणि सरकारचा फायदा होईल हा विचार समजावून सांगताना प्रश्न मांडून चालणार नाही तर ते सोडवण्यासाठी पर्याय देत पाठपुरावा केला पाहिजे याची त्यांना जाणीव होती. मालक विक्रेते पत्रकार यांचा त्रिवेणी संगम तयार करून समतोल साधत शासन दरबारी हा प्रश्न त्यांनी वेळोवेळी मांडला. संघर्ष करीत पुढे येताना शहरी पत्रकारांच्या न्यूज हाऊसला धक्का देत ग्रामीण भागातील सक्षम असूनही दुबळा ठरवलेला पत्रकार त्यांनी ताकदीने उभा केला. त्याला बळ दिलं. स्थिरस्थावर पत्रकारितेत बंड करणारा हा पहिला कलंदर सामाजिक क्षेत्रातही अग्रेसर ठरला. बिंदुसरा प्रकल्पातील गाळ उपसण्यापासून ते अनाथ निराधारांच्या पुनरुज्जीवनासाठी धडपडत आणि आपल्यासोबत प्रवाहातील चार चौघांना सोबत घेऊन त्यांना ऊर्जा देत पत्रकारिता करणाऱ्या या श्रमजीवी दृष्टी असलेल्या आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे भान असलेल्या पत्रकारास वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा....

●●●

# संघटन बांधणीसाठी वाहून घेतलेले नेतृत्व

आधुनिक केसरी



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र.
9423051246

महाराष्ट्र पत्रकार संघाचे विद्यमान अध्यक्ष श्री. वसंत मुंडे यांचा आज वाढदिवस. तमाम पत्रकारांच्या संघटन बांधणीसाठी त्यांनी आपले नेतृत्व सतत कार्यरत ठेवले आहे. त्यांच्याकडे संघटन कौशल्य, कार्याची कसोटी आणि प्रचंड जनसंपर्काची धार या त्रिसूत्रीतून या नेतृत्वाने आपले वर्चस्व सिद्ध करून दाखवले आहे. त्यांच्या आजच्या वाढदिवसानिमित्त प्रसिद्ध साहित्यिक, लेखक बाळासाहेब जोगदंड यांनी जागवलेली खास आठवण...

*पानावरला दहिवर व्हावे...असे जगावे*
*दगडामधला पाझर व्हावे...असे जगावे,*
*ग्रीष्माशी संवाद करावा नाना तऱ्हेने*
*मनभावन गुलमोहर व्हावे...असे जगावे...*

गझलकार अमोल वाघमारे या मित्राची निकोप आणि जगण्याच्या विविधांगी अंगाबद्दल संवाद साधणारी ही गझल वाचली की उभ्या आयुष्याचा वेध यातून मिळतो. माणसं ही न भेटलेली असतात गेल्या ३० वर्षांपासून वसंत मुंडे या अफाट नेतृत्वविषयी ऐकून आहे. त्यांचे कार्य बघून त्यांच्या कार्यासाठी झोकून दिलेल्या नेतृत्वाला सलाम करण्यासाठी हात आपोआप जुळले जातात. माझे मूळ गाव अंबाजोगाई आणि वसंत मुंडे महोदयांचे अंबाजोगाई तालुक्यातीलच लाडझरी हे गाव. आमचा एकच तालुका आणि एकच जिल्हा असलेल्या या व्यक्तीमत्वाची माझी समोरासमोर कधीच भेट नाही. परंतु या तावून सुलाखून निघालेल्या माणसाचे कार्य बघूनच भेटीची आस आल्याशिवाय राहत नाही.

प्रचंड मेहनत, अणि क्षेत्र कोणतेही असो त्यासाठी निष्ठेने काम करणारी फार कमी माणसे सध्या बघायला मिळतात. अष्टपैलू व्यक्तीमत्वाच्या जडणघडणीतून सतत नवनिर्माण होत असते. व्यासंग सर्वस्पर्शी असतो. सूक्ष्म अवलोकन अभ्यासपूर्ण असते. आयुष्यातील कोणतीही दिशा निवडली की ध्येय प्राप्तीसाठी अखंड कष्ट उपसावे लागते. आणि हीच कळवळ वसंतराव मुंडे यांच्या अंगी भिनलेली दिसून येते. महाराष्ट्राला जशी संत महंतांची परंपरा आहे. तशीच पत्रकारितेची यशस्वी परंपरा आहे. आणि म्हणूनच वसंतराव मुंडे यांचे नाव पत्रकारिता क्षेत्रात आज दैदिप्यमान राहिलेले दिसते. त्याशिवाय पत्रकार म्हणून वैविध्यपूर्ण बातम्यांचा वेध घेण्याची एक समर्पक कलाच त्यांना लाभली आहे. सर्व स्तरातील माणसांची त्यांची जुळलेली नाळ त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाची साक्ष देते. तर पत्रकारितेतील गुणवैशिष्ट्यांचा आदर्शवत त्यांच्या जगण्यातून पाहावयास मिळतो. आणि म्हणूनच ते पत्रकारितेतील विविध पुरस्काराचे मानकरी ठरतात ही आमच्यासारख्या अनोळखी मित्रांसाठी गौरवास्पद बाब ठरते.

आणि वरील गझलेतील शेवटच्या चरणातील पुढील ओळी...
जमले नाही सागर, हरकत नाही
तृष्णाशामक घागर व्हावे...असे जगावे...!

असे वसंतरावांच्या कार्याची नोंद घेताना सांगावेच लागते. संघटन कौशल्य आणि सिद्धहस्त नेतृत्वाच्या बिजातून त्यांची होत असलेली भरभराट निश्चितच कौतुकास्पद आहे. त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय कार्याचे अभ्यासपूर्ण चिंतन म्हणूनच अंतम ुख होऊन जाते.

पत्रकारिता क्षेत्रातील नवनवे बदल स्वीकारत या क्षेत्राचे गणित समजावून घेत आणि या क्षेत्राला नावलौकिक प्राप्त करून देण्यासाठी वसंतराव करीत असलेले प्रचंड झपाटलेले कार्य या क्षेत्रास पुढील काळात निश्चितच आशादायक ठरणार आहे. चौथा स्तंभ भक्कम उभा राहिला पाहिजे, या स्तंभाला कुठेही धक्का लागू नये म्हणून ते करीत असलेले प्रयत्न या क्षेत्रासाठी पुढील काळात सफल ठरणार आहेत. विशेष गुणवैशिष्ट्ये अंगी बाळगून त्यांचे जगणे मनामनाला विचार करण्यास भाग पाडते. तर या क्षेत्राविषयी त्यांची धडपड आम्हाला प्रसन्न केल्याशिवाय राहत नाही. त्यांची शोध पत्रकारितेतील धडपड बघितली की त्यांच्या लेखणीला सलाम करावाच लागतो. संघटन चळवळीतील त्यांचा उत्साह सतत ओसंडून वाहत असतो. म्हणूनच त्यांची ख्याती निश्चितच कौतुकास्पद आहे.

संघर्ष हेच जीवन आहे. जो प्रयत्नशील आणि संघर्षशील राहतो तो नेहमी हसतमुख राहतो. तोच जीवनात यशस्वी होतो. अथक प्रयत्न, अपार जिद्द, अतुट सत्य निष्ठा आणि सृजनशीलता या गुणांनी वसंतराव मुंडे हे व्यक्तिमत्त्व बहरत चालले आहे. त्यांचे हे कार्य एकप्रकारे दीपस्तंभासारखे वाटते . त्यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा..अभिनंदन..!

●●●



# दिलखुलास मैत्रीचे अनोखे दर्शन

आधुनिक केसरी

केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे यांनी बीडच्या दौऱ्यावर असताना आपले अनेक वर्षापासुनचे मित्र पत्रकार वसंत मुंडे यांच्या कार्यालयात जाऊन सदिच्छा भेट घेतली. सुरुवातीच्या काळातील आठवणींना ऊजाळा देत मुक्त संवाद साधत मैफिलच रंगली. यावेळी मुंडे, कराड, सावे यांच्यातील दिलखुलास मैत्री अनुभवायला आली. सार्वजनिक जीवनात अलिकडे टोकदार होत असलेल्या भूमिका आणि राजकारणात विशिष्ट उंचीवर पोहोचल्यानंतर वैयक्तिक मैत्री जपण्याचे प्रकार अपवादानेच पहायला मिळतात ते दिसुन आले.

बीड येथे शनिवार दि. १० डिसेंबर रोजी एका सार्वजनिक कार्यक्रमासाठी केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ.भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे आले होते. कार्यक्रमानंतर दोघांनीही महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या कार्यालयास सदिच्छा भेट दिली. मागील वीस वर्षात वसंत मुंडे यांनी पत्रकारीतेच्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाने वेगळा ठसा उम टवला आहे. तर डॉ.कराड, सावे यांनीही राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची मिळवली आहे. कराड आणि सावे यांची राजकीय कारकीर्द आणि मुंडेंची पत्रकारीतेची सुरुवात समकालीनच. वसंत मुंडे बीडमधून पत्रकारीता करत असले तरी संघटनेच्या माध्यमातून त्यांचा सुरुवातीलाच संपर्क राहिला आहे. दिवंगत गोपीनाथ मुंडे, विलासराव देशमुख या दिग्गजांसह राज्यभरातील पत्रकारीता क्षेत्रातीलही नाम वंतांशी संपर्क आल्यानंतर त्यांनी पत्रकारीतेच्या पुढे जाऊन मैत्रीचा घट्ट धागा निर्माण केल्याचे अनेकदा दिसुन आले.

योगायोगाने कराड, सावे आणि मुंडे आपआपल्या क्षेत्रात एका विशिष्ट उंचीवर पोहोचले असले तरी तिघांनीही वैयक्तिक मैत्रीवर कुठेही परिणाम होऊ न देता आपले संबंध कायम ठेवल्याचे बीडकरांना अनुभवायला आले. सार्वजनिक जीवनात राजकीय भूमिका अलीकडे टोकदार होत असल्याने वैयक्तिक पातळीवरील सहजता कमी झाल्याचे चित्र सर्वत्र दिसते. तर राजकीय क्षेत्रात विशिष्ट उंची गाठल्यानंतर नेत्यांचे दौरे, भरगच्च कार्यक्रमाम ुळे घाई गडबडीत पार पडतात. त्यामुळे इच्छा असुनही वैयक्तिक मैत्री असणार्यांना भेटणे आणि ऋणानुबंध जोपासणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीत मुंडे, कराड आणि सावे यांच्या भेटीने सार्वजनिक भूमिकांच्या पलीकडच्या दिलखुलास मैत्रीचे उत्कट दर्शन झाले. वृत्तपत्रांचे अर्थकारण या विषयावर वसंत मुंडे यांनी केलेल्या चिकित्सक अभ्यासाची पुस्तिका केंद्रीय अर्थ राज्यमंत्री कराड व सहकार मंत्री सावे यांना देण्यात आली. त्यावेळी दोघांनीही पत्रकारीता क्षेत्रातील वसंत मुंडे यांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी संपादक संतोष मानूरकर उपस्थित होते.

●●●

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# माध्यमांचे अर्थकारण नव्याने मांडणारे नेतृत्व



संजय व्यापारी
संपर्क क्र.
7743918559

आधुनिक केसरी

बीड हा केवळ ऊसतोड कामगारांचा किंवा बेरोजगारांचा जिल्हा नाही; तर तो नेतृत्व करणाऱ्यांचा देखील जिल्हा आहे. इथल्या मातीत नेतृत्वाची बिजं जन्मजात असतात की काय असं वाटतं. 'अभ्यासोनि प्रकटावे' हा वसा घेऊन पुढे जाणाऱ्यांची संख्या कमी का असेना, पण ती निश्चित आहे. तसेच बीड पत्रकारांचादेखील जिल्हा आहे. इथे भरपूर पत्रकार आहेत – रोजगार शोधू पाहणारे, न्यायाची तडफ असलेले आणि नाव कमावू पाहणारे. या सगळ्यांची लढाई आधी स्वतःशी आणि नंतर व्यवस्थेशी आहे. हे लढे एकेकाळी कसे एकाकी बिनसूत्री होते. वसंत मुंडे यांनी या लढ्यांना एका सूत्रात बांधलं.

साधारण वीस वर्षांपूर्वी पत्रकारितेत आलेले वसंत मुंडे यांचं नाव आज राज्यभर पोहोचलं आहे. त्याला कारण पत्रकारांचे प्रश्न आणि ते सोडवण्याची कला! 'कला' हा शब्द यासाठी की, नुसती तडफ असून चालत नाही वा नुसता वेळ देऊनदेखील भागत नाही. प्रश्नांची जाण निर्माण करून ते सोडवून घेण्यासाठी एक हातोटी माणसाच्या अंगी असावी लागते. ती मुंडेंमध्ये आहे. तुमचं 'बेसिक' पक्कं असेल तर छोटछोटे उपायदेखील मोठे परिमाणकारक ठरू शकतात, हे आता त्यांनी सिद्ध केलंय. एक वेळ राजकीय संघटन तितकंसं त्रासदायक नसेल इतकं पत्रकारांचं असतं. कारण पत्रकार नेहमी प्रश्न उपस्थित करण्याच्या आणि बोट दाखवण्याच्या भूमिकेत असतात.

## प्रश्न जाणून लढ्याची आखणी

वसंत मुंडे यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून जिल्हाध्यक्षपदापासून काम केलं. पुढे मराठवाडा अध्यक्ष, राज्य कार्याध्यक्ष; आणि आता प्रदेशाध्यक्ष. शिवाय राज्य शासनाच्या अधिस्वीकृती समितीचे ते विभागीय अध्यक्ष आहेत. या माध्यमातून पत्रकारांचे प्रश्न त्यांना उमजले आणि लढा सुरू झाला. पत्रकारांचं मानसिक स्थैर्य ते आर्थिक सुबकता यासाठीचा त्यांचा लढा यशाच्या वाटेवर आहे. तेही राज्यातील अग्रगण्य दैनिक लोकसत्तामध्ये काम करत असताना.

पत्रकारांना प्रश्न असतात, दैनिकांच्याही समस्या असू शकतात किंवा एकूणच पत्रकारितेमध्ये अस्थैर्य वगैरे असू शकते; यावर विश्वास न बसणारा अलीकडचा काळ. त्यामुळे लढा, न्याय, अन्याय, प्रश्न, मागणी... हे फक्त बातमीतच वापरायचे शब्द, असा समज झालेला. इतरांचं सोडा पण पत्रकारांचंही तसंच! दिव्याखाली अंधार असावा अगदी तसं. परंतु 'पत्रकारांचेही प्रश्न आहेत आणि ते सोडवले पाहिजेत' हे ठणकावून जर कुणी सांगितलं असेल, तर ते वसंत मुंडेंनी! स्वतः उपाशी असणारा दुसऱ्याचं काय भलं करेल? हे साधं-सोपं गणित! पण ते कुणाला वळत नव्हतं. अन्यायाच्या छायेत जगणारा दुसऱ्याला न्याय देऊ शकेल काय? त्याचे प्रयत्न खरंच प्रामाणिक असतील काय? हा खरा प्रश्न विचारण्याची धमक मुंडेंमध्ये आहे. आज परिस्थिती बदलत आहे. पत्रकार, छोटी दैनिकं, मीडिया हाऊसेस जागरुक होत आहेत. पत्रकारितेच्या अर्थकारणाचं रुतलेलं चाक गती घेण्याच्या बेतात आहे. वसंत मुंडेंचे प्रयत्न वाखाणण्याजोगे आहेत ते नक्की फळाला येतील.

## सोबतीला घेऊन चालणारे सक्षम नेतृत्व

प्रत्येक क्षेत्रात संघटना असतात. पुढारपण करणारे असतात. राज्यशास्त्राच्या निकषानुसार नेतृत्वाचा एक पाय संघटनेत आणि दुसरा प्रगतीच्या दिशेने उंचावलेला पाहिजे. तरच ती संघटना, तो समाज प्रगती साधू शकतो. दोन्ही पाय समाजात वा संघटनेत असून चालत नाही. किंवा दोन्ही पाय विकासाच्या दिशेने जाणारेही चालत नाहीत. सोबत घेऊन चालणं, ही संकल्पना सक्षम नेतृत्वाचं दायित्व सांगणारी आहे. वसंत मुंडे यांचं नेतृत्व हे असंच निपुण आहे. त्यामुळेच ते छोट्या दैनिकातल्या पत्रकारांचे प्रश्न घेऊन मुंबई-दिल्लीच्या वाऱ्या करीत असतात. पत्रकारांचे प्रश्न असतात तरी काय? अपुरं मानधन, कामाच्या वेळा निश्चित नसणं, जेवणाच्या वेळा निश्चित नसणं, आरोग्याच्या सुरक्षेची कसलीच हमी नाही आणि पुरेशी सुटीही नाही, कुटुंबासाठी पैसेही नाही आणि वेळही नाही. अशी ही वेठबिगारी! अशा कात्रीत सापडलेल्या पत्रकारांसाठी काय करता येईल; यासाठी त्यांचे चाललेले प्रयत्न बघून त्यांच्यातलं प्रयोगशील नेतृत्व अधोरेखित होतं.



अधिस्वीकृती समितीचं विभागीय अध्यक्षपद आल्यानंतर मुंडे यांनी एक प्रयोग केला, खुल्या चर्चेचा. पत्रकारितेच्या इतिहासात असा प्रयोग यापूर्वी कुणीही केलेला नव्हता. राज्यात अनेक शहरात जाऊन त्यांनी तिथल्या पत्रकारांशी थेट संवाद साधला. तुमचे प्रश्न काय आहेत? अधिस्वीकृती पत्रिका मिळवण्यासाठी कुठल्या अडचणी आहेत वा कुठले जाचक नियम आहेत? पत्रकारांना अधिस्वीकृती सहजपणे कशी मिळेल आणि त्यातून जास्तीत जास्त फायदे कसे मिळवून देता येतील, यासाठी त्यांची धडपड सुरु झाली. त्यात त्यांना यशही आले. त्यांच्या कार्यकाळात ज्येष्ठ पत्रकारांना अधिकाधिक अधिस्वीकृती पत्रिका मिळाल्या. महत्वाचं म्हणजे अधिस्वीकृती पत्रिकेसाठी दैनिकांचा कोटा वाढवून घेण्यात मुंडेंनी मोलाचं योगदान दिलं. त्यामुळे तालुकास्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आणि मुख्यालयात काम करणाऱ्या पत्रकारांचा अतिरिक्त 'अधिस्वीकृती' मिळाल्या. अर्थात हे सगळं साध्य झालं ते प्रश्न समजून घेतल्याने. त्यामुळे मराठवाड्यातील आणि राज्यातील पत्रकार मुंडेंच्या नेतृत्वावर अढळ आहेत.

## अर्थकारण सावरणारी ब्लू-प्रिंट

मुंडेंनी पत्रकारांसाठी काम केलं म्हणजे नेमकं काय केलं, हे खऱ्या अर्थाने समजून घ्यायचं असेल तर त्यांनी मांडलेलं 'अर्थकारण' किंवा 'अर्थधोरण' समजून घ्यावं लागेल. तेव्हा खऱ्या अर्थाने मुंडेंची ब्लू-प्रिंट समजून घ्यायला मदत होईल. सोशल मीडिया आणि डिजिटल पत्रकारिता यामुळे छोटी दैनिकं डबघाईला आलेली. त्यात दोन वर्षं पडलेलं कोरोना सावट. त्यामुळे संपूर्ण माध्यमविश्वावर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. मीडिया हाऊसेसनी जराही विधिनिषेध न बाळगता कर्मचारी कपात केली. छोटी दैनिकं तर पुरती कोलमडली. मानधनावर काम करणारा जिल्हा आणि तालुका पत्रकार कमालीचा बेचैन झाला. अशा परिस्थितीत वसंत मुंडे गप्प कसे राहतील? लॉकडाऊनच्या काळात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून विविध पत्रकारोपयोगी उपक्रम राबविणं सुरू झालं. पत्रकारांना धीर मिळाला. पण माध्यमविश्वाला उभं करण्यासाठी कायमचा उपाय आवश्यक होता. मुंडेंनी साधारण २०२०-२१मध्ये दैनिकांच्या किंमती वाढवण्यासंबंधी नवा विचार मांडला. धक्कादायक होतं हे. सगळ्यांनी नजरा टवकारल्या, भिवया उंचावल्या. किंमती वाढवणं कसं शक्य होईल?, लोक पेपर विकत घेतील काय? त्यातून असं काय साध्य होईल? असे प्रश्न समोर येऊ लागले. या काळात त्यांनी भेटीगाठी आणि संवादावर भर दिला. आपलं म्हणणं सोपं करुन सांगितलं. ते पटवून देण्यासाठी तासनतास बोलत राहिले. बाजारपेठेत प्रत्येक उत्पादनाचं स्वतःचं एक मूल्य असतं. ते ठरवण्याचे अधिकार त्या उत्पादकाला असतात. त्यासाठीचा कच्चा माल, मनुष्यबळ, वीज, वाहतूक, वितरण, हा सगळा खर्च गृहीत धरून मग उत्पादनाचं मूल्य ठरवावं लागतं. हेच बाजाराचं गणित असतं. पण वृत्तपत्रक्षेत्र याबाबतीत गाफील होतं. स्वमूल्याची जाणीव माध्यमांना नव्हती खरी. चार पानी दैनिकाच्या एका अंकाचा खर्च वीस ते तीस रुपये आहे, आठ पानी दैनिकाचा खर्च पन्नास-साठ रुपयांच्या घरात आहे. मग दैनिकाचं मूल्य दोन-पाच रुपयेच का, हा तो बिनीचा प्रश्न. वसंत मुंडेंनी तो ठासून बिंबवला! 'हळू हळू किंमती वाढवा, दैनिकाचा खर्च भागला तर आर्थिक साक्षरता येईल' असं बेरजेचं गणित मांडायला सुरुवात केली. त्यात ते यशस्वीदेखील झाले. राज्यात जवळपास दीडशे ते दोनशे दैनिकांनी किंमती वाढवण्याचा निर्णय घेतला आणि वाढवल्यादेखील. विशेष म्हणजे कुठल्याच दैनिकाच्या खपावर विपरित परिणाम झालेला नाही. कुणाचा अंक कमी झाला नाही की कुण्या वाचकाने साधी तक्रारही केली नाही. अगदी बिनबोभाटपणे दैनिकं सक्षम होऊ लागली. मोहीमच सुरू झाली. हे लोण आता राज्यभर पसरू पाहात आहे. छोटाच उपाय पण मोठा परिणामकारक ठरला.

दैनिकं खंबीरपणे उभी राहिली तर पत्रकारिता टिकेल, हेच तर मूळ सूत्र आहे. शिवाय याबाबत त्यांनी दिल्लीपर्यंत आवाज उठवला. दैनिकांची नोंदणी ज्या कार्यालयात होते, त्या 'आरएनआय' मधील अधिकाऱ्यांनादेखील त्यांनी दैनिकांच्या किंमतीबाबत पटवून दिलं. तेव्हा अधिकारीही आवाक झाले. आता याबाबतचा स्वतंत्र प्रशासकीय वा न्यायालयीन लढा मुंडेंनी सुरू केला आहे. एकदा का या 'पंजीयक' कार्यालयाने दैनिकांच्या मूल्यावर अधिकृत निर्णय घेतला, मग माध्यमविश्वाला राखेतून वर यायला वेळ लागणार नाही.

## साप्ताहिक सुट्टी घ्या

वसंत मुंडेंचा पुढचा मुद्दा तर आश्चर्यकारक आहे. साप्ताहिक सुटीचा. 'छे पेपरला कुठं सुटी असते का? सुट्टी सोडून बोला हो,' अशा प्रतिक्रिया आल्या. इथंही मुंडेंनी त्याचं अर्थकारण आणि आरोग्यकारण पटवून दिलं. 'एखादं दैनिक छापून वाचकांच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी किती खर्च येतो? त्यातून एका दिवसाचा किती खर्च? महिन्यातल्या चार दिवसांचा आणि वर्षातल्या ४८ दिवसांचा किती खर्च वाचला? दैनिकांना साप्ताहिक सुट्टी नसावी, असा काही नियम नाही. एक तर खर्च वाचतो आणि दुसरं कर्मचारी खूश राहतात. आज शासनाने पाच दिवसाचा आठवडा केलाय. अनेक खासगी कंपन्या आणि कॉर्पोरेट न्यूज सेक्टरमध्येसुद्धा पाच दिवसाचा आठवडा आहे. मग छोट्या दैनिकांनी आणि पत्रकारांनी काय घोडं मारलं? उलट सुट्टीमुळे अधिकच्या उर्जेने पत्रकार काम करू शकेल!' हाही मुद्दा राज्यातल्या अनेक दैनिकांनी मनावर घेतलाय. काहींनी यावर विचार करून सुट्ट्यादेखील सुरु केल्यात. या निर्णयांमुळे पत्रकारितेविषयी आपलेपणा, आकर्षण निर्माण होण्यास मदतच होणार आहे. यासोबतच पत्रकार पेन्शन आणि पत्रकार संरक्षण कायदा होण्यास मुंडेंचं मोलाचं योगदान आहे. जिल्हा दैनिकं, छोटी विभागीय दैनिकं यांचा केंद्र सरकारने लघुउद्योगामध्ये समावेश करण्याची मागणी वसंत मुंडे करत आहेत. यासाठी त्यांनी केंद्रीय लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगमंत्री नारायण राणे यांच्याशी बोलणी सुरू आहे. दैनिकांना लघुउद्योगाचा दर्जा मिळाला तर ते त्या उद्योग विभागाच्या कक्षेत येतील. छपाई मशिनसाठी कर्ज उपलब्ध होऊ शकेल, कर सवलत आणि एमआयडीसी भागात छापखान्यासाठी जागाही मिळेल. शिवाय अर्थसंकल्पातून या व्यवसायाला तरतूद होण्याची आशा आहे. अर्थात दैनिकं सक्षमपणे उभं राहतील. जनसामान्यांचा आवाज आणखी बुलंद होईल. पण त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. मुंडेंचे प्रामाणिक प्रयत्न मात्र सुरू आहेत.

## वृत्तपत्र ग्राहकाला कर-सवलत

आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. त्यामुळे दैनिकाचा खप वाढू शकेल. शिवाय सकस लेखनाला अर्थाश्रय मिळेल. तो म्हणजे वृत्तपत्र खरेदीवर कर सवलत. वाचकाने वर्षभर वृत्तपत्र खरेदी केले, तर त्याला त्याच्या उत्पन्न कर परताव्यामध्ये पाच हजार रुपयांची सवलत मिळावी, या मागणीसाठी केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड यांची वसंत मुंडेंनी अनेकदा भेट घेतली. त्यावर चर्चा सुरू आहेत. या निर्णयावर सरकारने गांभीर्याने विचार केला तर दैनिकं पाय रोवून खंबीरपणे उभा राहतील. निदान कर सवलतीच्या निमित्ताने घरोघरी वाचन परंपरा रुजण्यात मदत होईल. चांगलं लिहिणारे पुढे येतील. पत्रकार अभ्यासपूर्ण मांडणी करण्यासाठी बांधिल राहतील. एवढे सगळे साध्य सिद्ध होऊ शकतात. केंद्र सरकारने ठरवलं, चांगले निर्णय घेतले तर दैनिकांच्या पडक्या वाड्यांना मजबूत भिंती आणि कौलं लागू शकतील. वसंत मुंडे हे त्यासाठी प्रयत्नशील आहेत.

## लढवय्याचं नेतृत्व

वसंत मुंडे म्हणजे पत्रकारांसाठी लढणारा लढवय्या आहे. पत्रकारांचं नेतृत्व काय करू शकतं, याचं हे उदाहरण आहे. सर्व पत्रकारांनी प्रामाणिक साथ देऊन वसंत मुंडे यांचा हात बळकट करण्याची गरज आहे. पत्रकारितेचा चेहरा-मोहरा बदलल्याशिवाय व्यवस्थेचा चेहरा बदलणार नाही. त्यासाठी पत्रकार; ज्याला चौथा स्तंभ म्हणतात, तो खंबीर होणं गरजेचं आहे. अधिस्वीकृतीतील सुलभता, दैनिकांची मूल्यवाढ, साप्ताहिक सुटी, वाचकांना करसवलत, दैनिकांना लघू उद्योगाचा दर्जा, पत्रकारांना सन्मानजनक मानधन; या सगळ्या आघाड्यांवर वसंत मुंडेंचं काम सुरू आहे, त्यांचं काम एक दिवस नवा इतिहास रचेल यात तिळमात्र शंका नाही.

●●●

# मराठी पत्रकारितेच्या ह्रदयी फुललेला वसंत



रवींद्र तहकीक
संपर्क क्र.
7888030472

आधुनिक केसरी

वसंत मुंडे.बीड जिल्ह्यातील परळी सारख्या ग्रामीण चेहरा मोहरा असलेल्या पण कर्तुत्ववान कष्टाळू आणि आपापल्या क्षेत्रात जिद्दीने काहीतरी करण्याची आस असणाऱ्या माणसांची खाण असणाऱ्या तालुक्यातील हा तरुण.पत्रकार,सामाजिक कार्यकर्ता,शेतकरी,व्यावसायिक असा सर्व काही.प्रारंभी घरोघरी जाऊन पेपर टाकण्याच्या काम ापासून नंतर दैनिक लोकपत्र या मराठवाडा पातळीवरील दैनिकाच्या जिल्हा प्रतिनिधीत्वाची जबाबदारी,मग पत्रकारितेची पदवी, असा सुरु झालेला वसंत मुंडे यांचा पत्रकारितेचा प्रवास दैनिक लोकसत्ता सारख्या राज्य पातळीवरील अग्रगण्य मराठी दैनिकापर्यंत येऊन पोहचलेला आहे.एखाद्या दैनिकाचा जिल्हा प्रतिनिधी म्हणून दीर्घकाळ कार्यरत रहाणे ही बोलाची कढी नाही.



विश्वास,अपेक्षा,गुणवत्ता,दर्जा, स्पर्धा अशा अनेक गोष्टींचा त्यात कस लागतो. अटी शर्ती आणि कटकटी असतात.अनेक कसोटीचे प्रसंग येतात.त्यात सचोटीची परीक्षा होते.वसंत मुंडे यांनी हे सगळे पाणी तोडत आपले स्वीमिंग चालू ठेवले. पुन्हा पाण्यातल्या कुठल्याही मगरमच्छाशी वैर न करता.एवढे सगळे जलदिव्य पार करुन हा मासा शांत झोपू तरी कसा शकतो,हे विचारायला त्याच्या वंशाला जायला लागेल.ते शक्य नाही, म्हणून त्याच्याशी मैत्री करायला हवी.महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून प्रदेशाध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळताना वसंत मुंडे यांनी राज्यभर असे मैत्र जुळवले आहेत.उत्तम संघटन कौशल्य,सुसंवाद,नियमित संपर्क,सातत्याने फिरणे,गाठीभेटी,सहकार्य,समन्वय हा वसंत मुंडे यांचा स्वभाव आहे.पत्रकार संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक कामे धसास लावली.ज्येष्ठ पत्रकारांना त्यांचे घरी जाऊन सन्मानाने अधिस्वीकृती पत्र देण्याची त्यांची कल्पना आणि त्याची केलेली अमलबजावणी मला विशेष भावली.पत्रकारांच्या समस्या अडी अडचणी बाबत वसंत मुंडे सलगपणे मदतकार्य करतात.वैयक्तिक पातळीवर दखल घेतात.तो प्रश्न अडचण सोडविण्यासाठी स्वतः, संघटनात्मक शक्ती आणि संपर्काचा वापर करतात.स्थानिक प्रशासकीय पातळीपासून सरकार दरबारी पाठपुरावा करतात.हे करताना कुठल्याही प्रकारचा अहंभाव नाही.भेद नाही. हातचा राखून ठेवणे नाही. मला वाटते हीच वसंत मुंडे यांच्या लोक संग्राहक व्यक्तिमत्वाची खरी ताकद आहे.

●●●

# पत्रकारितेतील माझा नेता

आधुनिक केसरी


सामाजिक जाणिवेतून पत्रकारिता करणारे जे बोटावर मोजण्याइतके पत्रकार आहेत, त्यात वसंतराव मुंडे हे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. समाजातील शेवटच्या घटकांना न्याय मिळावा, यासाठी त्यांची लेखणी कधी तलवारीचे पाते बनून तळपते. ऊठ सुठ कुणालाही सल्ले देणाऱ्या काळात वसंतराव मुंडे यांची सकारात्मक पत्रकारिता डोळ्यात अंजन घालणारी ठरते. अगदी विद्यार्थी दशेपासून वसंतराव मुंडे यांनी पत्रकारीतेत स्वतःला झोकून दिले आहे. शेती, आपल्या मातीचे प्रश्न प्रामाणिकपणे मांडणे, हा वसा वसंतरावांनी घेतलेला आहे. गेली दोन दशके माझे त्यांच्याशी सौख्य आहे. ते कायम टिकून आहे. आतून, बाहेरून अगदी आरश्याप्रमाणे पारदर्शक त्यांचे जगणे राहिलेले आहे. उपेक्षित असलेल्या ऊसतोड मजुरांची कैफियत पोटतिडकीने मांडल्याने त्यांना समर्थन संस्थेची अतिशय प्रतिष्ठेची मानवी हक्क वार्ता शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. नागपूर येथे झालेल्या या सोहळ्याचा मीही साक्षीदार होतो. पत्रकारीतेची कार्यशाळा असलेल्या दैनिक मराठवाडा साथीतून वसंतरावांची वाटचाल सुरु झाली. पुढे लोकपत्र आणि लोकसत्ता दैनिकातून त्यांनी उभ्या महाराष्ट्राला आपल्या लेखणीची चुणूक दाखवली. दिवंगत स. मा. गर्गे पुरस्कार राज्यात नव्हे तर देशात प्रतिष्ठेचा ठरला, त्याचे श्रेय वसंतराव मुंडे आणि संतोषजी मानुरकर यांना दिले पाहिजे. आज महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष हे पद केवळ मिरवण्याचे नसते हे मुंडे यांनी कृतीतून दाखवून दिले आहे. बिगर संपादक असलेला अध्यक्ष हा नवा इतिहास त्यांच्या नावावर आहे. त्यांचा वृतपत्रांच्या अर्थकारणाचा अजेंडा राज्याने मान्य केला आहे. लोकांच्या प्रश्नांसाठी बीड ते मंत्रालय दणाणून सोडणाऱ्या वसंतरावांच्या कामाचा झपाटा माझ्यासह अनेकांना उभारी देणारा ठरतो. त्यांचे काम, त्याची व्याप्ती खूप मोठी आहे. मात्र हा छोटासा लेखन प्रयास. १ जानेवारी हा वसंतराव मुंडे यांचा वाढदिवस. त्यानुषंगाने जिंदादिल माणूस, संवेदनशील पत्रकार, माझे नेते, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांना वाढदिवसाच्या अगणित शुभेच्छा.



बाबा श्रीहरी देशमाने
संपर्क क्र.
8411990808

●●●























आधुनिक केसरी

# वसंत मुंडे ते वसंतराव मुंडे!

वसंता आणि माझी ओळख तशी वसंता पत्रकारीतेत येण्यापूर्वीच! मी पत्रकारीतेत स्थिरस्थावर होवू लागलो होतो आणि वसंता पत्रकारीतेत आपले नशीब आजमवण्यासाठी धडपडत अंबाजोगाईत आला होता, तेंव्हा पासुनची!

लहान मोठ्या वर्तमानपत्रात काम करुन लोकमत सारख्या तेंव्हा प्रचंड खप असलेल्या दैनिकात माझे ज्येष्ठ सहकारी कै. प्रा. भालचंद्र मोटेगावकर सरांच्या नंतर लोकमत मध्ये काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी लोकमत मध्ये काम करणे ही तशी अवघड कामगिरी होती, आपल्या सर्वांच्या सहकार्याने सलग १७ वर्षे ती मला पार पाडता आली!

लोकमतचे सर्वेसर्वा आदरणीय राजेंद्र दर्डा यांनी माझ्यावर टाकलेली जबाबदारी प्रभावीपणे यशस्वी करीत असतांना त्यांनी अंबाजोगाईत मराठवाड्यात पहीले लोकमतचे उपविभागीय कार्यालय सुरु केले आणि त्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली.





सुदर्शन रापतवार
संपर्क क्र.
72182393333

याच काळात वसंता माझ्या संपर्कात आला. दहावीची परीक्षा पास होवून महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी तो अंबाज- ोगाईत वडिलांचे छत्र हरवलेले, कोरडवाहू अल्प भु धारक शेतकऱ्यांचा मुलगा. शिक्षण आणि उदरनिर्वाहा साठी लागणारे पैसे आपण स्वतः कमवावेत आणि आपले शिक्षण पुर्ण करावे ही उर्मी घेवून कामाच्या शोधात फिरणारा वसंता असाच एके दिवशी मला लोकमतच्या कार्यालयात येवून भेटला. काही काम आहे का हे विचारण्यासाठी!

वसंताचा चुनचुनीतपणा आणि त्याची कोणतीही करण्याची धडपड माझ्या लक्षात आली आणि माझे मित्र ज्येष्ठ पत्रकार कै. मुश्ताक हुसेन सर यांची आणि वसंता ची मी भेट घालून दिली. मुश्ताक हुसेन सरांनी त्यावेळी मासिक शिक्षक पत्रिका सुरु केली होती. संपुर्ण मराठवाड्यात ही पत्रिका स्वतः ...ि करणारा मुलगा त्यांना हवा होता. वसंता ने हे काम स्विकारले आणि ... करुन दाखवले.

...र करीत असताना वृत्तपत्र वितरणातील बारकाव्यांचा अभ्यास करीत पत्रकारितेचे आपले लक्ष केंद्रित केले.

पुढे दैनिक लोकपत्र मध्ये अंबाजोगाई येथील प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी बीड येथील एका वरीष्ठ पत्रकाराने माझ्याकडे विचारणा केली आणि लोकपत्र साठी मी वसंता चे सुचवले. वसंता पत्रकार झाला! कॉलेज झाले की वसंता मग माझ्याकडे यायचा. त्याकाळी बातमी मिळवण्यासाठी तिची माहिती काढण्यासाठी सतत फिरावे लागायचे. घटनास्थळी भेटी देणे, अधिकाऱ्यांचे म्हणणे समजावून घेणे, त्यांच्या कडुन अधिकृत माहिती घेणे, वस्तुस्थिती तपासुन पहाणे, पोलीस स्टेशन, न्यायालय, रुग्णालयात घडलेल्या घटनांची माहिती कागदावर लिहून घेणे आणि नंतर कार्यालयात येवून बातमी तयार करुन बसने औरंगाबाद कार्यालया पाठवणे. या सर्व कामात वसंता माझ्या सोबत असायचा. माझ्या स्कुटरवर वसंता हा संपुर्ण तालुकाभर फिरायचा. विविध घटनांचे टीपण, गुन्हा रजिस्टर नंबर, आरोपींचे नावे, रुग्णालयात जखमीचे, मयताची नाव, एखाद्या कार्यक्रमात पाहुण्यांची नावे, भाषणांचे तपशील दिसुन घेणे ही सर्व जबाबदारीची कामे वसंता लिलया करायचा!

अंबाजोगाई जिल्हा निर्मितीच्या आंदोलनात वसंता पत्रकारांवर वाकडी नजर असलेल्या एका पोलीस निरीक्षकाच्या तावडीत सापडला, त्याने सोबतच्या एसआरपी कडुन वसंताला बेदम मारहाण केली. वसंताला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. जिल्हा निर्मिती आंदोलनात घायाळ झालेल्या वसंता चे नाव मग जिल्हाभर झाले.

●●●



# कलम बहाद्दरांचा सरदार

## संघर्षाचा उत्कल बहर



आधुनिक केसरी



**भागवत तावरे**
संपर्क क्र.
9613331111

खरं तर लेख लिहून त्यांच्या कारकिर्दीला व कार्यआलेखाला शब्दात गुंफणे म्हणजे चेष्टा ठरावी , मुळात हा लेख खुशामत वा वाहवा च्या कारणी नाही , शेतकऱ्याच्या लेकराने मक्तेदारीचे कुंपणच नाही तर तटबंदी असलेल्या क्षेत्रात नांगर टाकावा हेच दिव्य आहे मात्र त्यावर कास्तकाराने पत्रकारितेची नांगरणी केली, खुरपणी करून यातले कचपण काढले , मातीची सेवा करत सुपीक वाफे व त्यातून माझ्या सारखे अनेक रोपे वापउन आणले . वापलेले टिकावे म्हणून सल्ला मार्गदर्शन रुपी सिंचन घालणारे हे नेतृत्व म्हणजे वसंत मुंडे ,आज एका वर्षाने थोरले होते आहे . त्यांची नोंद पत्रकारांचे प्रदेश अध्यक्ष वा लोकसत्ताचे प्रतिनिधी अशी असेल मात्र मला त्या पलीकडे ते दिसले भावले आहेत .

वंसत मुंडे या नावाची मला ओळख झाली ती पत्रकारांचे प्रश्न सोडवतात , त्यांना स्थिरावताना आधार देतात आणि आदर देखील , आकाश समजलेले उम जलेले हे आमचे नेतृत्व जमिनीवर पाय कायम रोवून आहे , अत्यंत हलाखीच्या स्थितीतून त्यांनी साधलेली पदे आणि सांधलेली माणसे हे त्यांचे यश आणि संपन्नता आहे . अधिस्वीकृतीचे मराठवाडा अध्यक्ष झाल्यापासून मी त्यांनी अधिक जवळून ओळखू लागलो , भागवत तू लिहलेले एकदा परत वाचत जा हा लहान सल्ला त्यांनी मला दिला आणि मी परत वाचताना चुका उमगून मी सुधारत गेलो , तुझ काही चुकत हे न सांगता परत वाचत जा म्हणून त्यांनी साधलेली सुधारणा त्यांच्यातल्या वात्सल्य गुरुची साक्ष आहे . गेली ८ वर्षे मी आणि त्यांच्यातला स्नेह दिवसेदिवस वाढत गेला , माझ्यासाठी त्यांनी दिलेले सल्ले अडचणीच्या काळात दिलेला आधार आणि आजवर लिखाणासाठी त्यांनी दिलेला आदर त्यांच्या थोरवीची साक्ष आहे . कधीकाळी पहाटे पेपर टाकणारे वसंत मुंडे आज महाराष्ट्र राज्यातील पत्रकारांचे सुकानुधारी बनले आहेत , नेत्यांची सदर असो वा लेखणीचे सरदार , माणसे उभी करताना समन्वय व दुवा हे अंगभूत गुण घेऊन साहेबांनी आपला परीघ केवळ व्यापक नाही तर प्रगल्भ केला . संतोष मानूरकर सारख्या अत्यंत सटीक आणि प्रगल्भ लेखणीचे स्वामी सोबतीला घेऊन त्यांनी पत्रकारांची एक मोट बांधली आहे . मागच्या वर्षी मी त्यांची घेतलेली एक मुलाखत राज्यभर गाजली , विषय क्लिष्ट होता मात्र तितकाच गरजेचा , पत्रकारितेचे अर्थार्जन हा एक जिकरीचा आणि काळीज व काळजीचा विषय , महागाई व उत्पादन मूल्य हे निकष लागू नसलेले एकमेव उत्पादन म्हणजे वर्तमानपत्र , ते घाट्यात विकून आणि जाहिरात दारांची हांजी हांजी करून आर्थिक स्थैर्य लाभणार नाही तर हक्काचे धन मिळावे यासाठी थेट अंक किमत उत्पादन मूल्यावर घेऊन जाण्याचे आवाहन पहिल्यांदा कुणी केले असेल तर वसंत मुंडे सरांनी . महाराष्ट्रात सर्वदूर पत्रकारांचे जाळे विणताना हा संघर्षाच्या सागरातील मुंडे नावाचा खलासी आज लेखणीच्या टेकड्यात हिमालय आहे , तसे मुंडे या नावातच संघर्ष आहे , यान्वये त्यांच्या कारकिर्दीला संघर्षाची किनार आणि झालर नसेल तर आश्चर्य . उसतोड तोड कामगारांचा मुलगा ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यापासून ते देशाच्या अर्थमंत्र्यापोत आपली जरब आपला वकूब सिद्ध करणारे वसंतराव मुंडे एक वर्षाने थोरले होते आहेत , पत्रकारितेच्या रिंगणात त्यांनी निर्माण केलेल्या अनेक त्रिज्या आहेत ज्याने आठी प्रहराचा जागता पहारा सुरु आहे . कुटुंब प्रमुख म्हणून नवीन पत्रकार , या क्षेत्रातील कामगार , नव्या संपादकांना आवश्यक मार्गदर्शक आखणी रेखनी करून देताना वसंत मुंडे आम्हा पत्रकारांचे सुकानुधारी सिद्ध आहेत .

●●●

# पत्रकारांचा पाठीराखा



आधुनिक केसरी



**बालाजी तोंडे**
संपर्क क्र.
9028108210

सायकलवरून पेपर वाटप ते राज्यातील सर्वात मोठ्या पत्रकार संघाचा अध्यक्ष ही वसंतराव मुंडे यांची वाटचाल जेवढी संघर्षाची तेवढीच प्रेरणादायी आहे... शालेय जीवनात आईसोबत रोजगार हमीची कामे करत असताना ठेकेदार व अधिकार्याने मजूरांवर अन्याय केला... या अन्यायाची वर्तमानपत्रात एक बातमी आली अन् मजूरांना पुर्ण मोबदला मिळाला... या एका छोट्या प्रसंगातून बसंतराव मुंडे यांच्या मनात प्रत्रकारीतेचे आकर्षण निर्माण झाले... बालपणापासून अन्यायाची चीड अन् त्या विरोधात बंडखोरी करण्याचा पिंड असलेल्या वसंतराव मुंडे यांनी पत्रकारीतेच्या माध्यमातून लोकांवरील अन्याय दुर होत असेल तर मला पत्रकारच बनायचे आहे, असे म्हणत सुरूवातीच्या काळात सायकलवरून पेपर वाटण्याचे काम केले... ध्येय समोर ठेवून जिद्दीने ते त्याकाळी ग्रामीण पत्रकार बनले... एकेकाळी रोजगार हमीची कामे करणारा, पेपर वाटणारा हा युवक पुढे चालून महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचा अध्यक्ष बनेल, पुणे, मुंबईच नव्हे तर देशाच्या राजधानी दिल्लीतही सदस्य असलेल्या पत्रकारांच्या चळवळीचा नेता बनेल असे कोणाला स्वप्नातही वाटले नव्हते... मात्र टोकाचा संघर्ष, प्रचंड परिश्रम, सिध्दहस्त लेखणी, सकारात्मक दृष्टीकोण, सर्वपक्षीय नेत्यांशी ऋणानुबंध आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाण्याच्या गुणामुळे बसंतराव मुंडे हे राज्यभरातील पत्रकारांचे नेतृत्व करत आहेत... पाठीराखा बनून पत्रकारांचे सार्वजनिक आणि व्यक्तीक असे हजारो प्रश्न त्यांनी सोडवले आहेत... खरेतर बीड जिल्ह्यातील अतिशय छोट्या गावातून, सामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले बसंतराव मुंडे हे पुणे, मुंबईसह राज्यातील पत्रकारांचे नेतृत्व करतात, ही गोष्टच मुळात बीड जिल्ह्याचा सन्मान वाढवणारी आहे...

खरेतर मुंडे नावातच एक जादू आहे... कितीही संघर्ष वाट्याला आला तरी संकटाच्या छताडावर पाय देऊन उभे राहण्याची क्षमता या नावात आहे... विशेष म्हणजे बसंतराव हे लोकनेते गोपीनाथराव यांची जन्मभूमी आणि कर्मभूमी असलेल्या परळीचे मुंडे आहेत... असा हा रक्तातच संघर्ष कण्याचा गुण अन् अन्यायाविरूध्द प्रचंड चिडीचा पिंड असलेला व्यक्ती काय करू शकतो, हे बसंतराव मुंडे यांनी दाखवून दिले आहे.. मुंडे नाव तर आहेच मात्र वसंतराव हे प्रचंड अभ्यासू, ग्रामीण पत्रकारांच्या प्रश्नांची जाण अन् तळमळ असलेले संवेदनशिल नेतृत्व आहेत... बसंतराव मुंडे हे राज्यातील सर्वात मोठ्या पत्रकार संघाचा राज्याचा अध्यक्ष बनल्यानंतर खर्या अर्थाने ग्रामीण पत्रकारांचे प्रश्न, त्यांच्या व्यथा, अडचणींना वाचा फुटली... छोट्या गावापासून मुंबई पर्यंतच्या पत्रकारांचे प्रश्न त्यांनी चव्हाट्यावर आणले... नुसते चव्हाट्यावरच आणले नाहीत तर मंत्रालयात, मंत्री, मुख्यमंत्र्यांच्या दालनात बसून अनेक प्रश्न त्यांनी सोडवले देखील आहेत... पत्रकार पेन्शन, पत्रकार हल्ला विरोधी कायदा, ग्रामीण पत्रकारांना अधिस्विकृती, पत्रकार कल्यान निधी असे कितीतरी प्रश्न त्यांनी राज्यकर्त्यांना धारेवर धरून मार्गी लावले आहेत... पत्रकारांच्या प्रश्नावर सोलापुर येथील एका आघाडीच्या वृत्त वाहीनीने वसंतराव मुंडे यांची घेतलेली मुलाखात राज्यभर गाजली. कारण पत्रकार सर्वांच्या प्रश्नावर बोलतात, वंचीत उपेक्षीतांचा आवाज बनण्याचे काम ते करतात. परंतू पत्रकारांच्या प्रश्नावर कोणीच बोलत नाही. पत्रकार संघाचा राज्याध्यक्ष बनल्यानंतर पहिल्यांदाच वसंतराव मुंडे यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना ऐरणीवर आणले... सर्व समाज घटकांसाठी, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांसाठी सरकारची कुठली ना कुठली योजना आहे. परंतू पत्रकार हा एकमेव घटक असा आहे, समाजाचा आरसा असूनही त्याच्यासाठी कोणतीच योजना नाही, हे वसंतराव मुंडे यांनी पहिल्यांदा राज्यकर्त्यांच्या लक्षात आणून दिले... सरकार सर्वांना घरे बांधून देते... प्रत्येकासाठी घरकुल योजना आहे... मग पत्रकारांसाठी ती नाही? फाटका खिसा, बीन पगारी नोकरी, रहायला घर नाही, सरकारची कोणतीच योजना नाही... या परिस्थितीत पत्रकारांनी कधीपर्यंत अपेक्षीताचे जीने जगायचे? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला... ईतिहासात पहिल्यांदाच राज्यभरातील पत्रकारांचा प्रश्न तळमळीने मांडल्यामुळे ही मुलाखत प्रचंड लोकप्रीय ठरली... ही मुलाखत आणि लोकपत्रकार भागवत तावरे यांनी घेतलेली मुलाखत राज्यातील दोनशेहून अधिक वर्तमानपत्रात प्रसिध्द झाली... या नंतर विविध कार्यक्रम, उपक्रमांच्या माध्यमातून राज्यभर दौरा करून वसंतराव मुंडे यांनी पत्रकारांचे प्रश्न जाणून घेतले... त्यांच्याशी चर्चा केली... तत्पुर्वी विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष बनल्यानंतर ग्रामीण पत्रकारांनाही अधिस्विकृती मिळाली पाहीजे यासाठी त्यांनी माहिती संचालकांना बीडमध्ये बोलावून खुली चर्चा घडवून आणली.... विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष म्हणून बसंतराव मुंडे यांनी दिलेल्या योगदानामुळे ग्रामीण भागातील शेकडो पत्रकार अधिस्विकृती धारक बनले... औरंगाबद आणि बीड येथे प्रत्येक आठवड्याला विविध क्षेत्रातील एका मान्यवराला बोलावून चर्चा सत्र त्यांनी घेतले... यातून पत्रकारांच्या मुलभूत प्रश्नांना खर्या अर्थाने वाचा फुटली.. वसंतराव मुंडे, संतोषजी मानुरकर यांच्या संकल्पनेतून सुरू झालेला हा उपक्रम प्रचंड लोकप्रीय ठरला...

पत्रकार संघाचा राज्याचा अध्यक्ष म्हणून बसंतराव मुंडे यांनी पत्रकारांचे प्रश्न तर मांडलेच परंतू छोट्या- मोठ्या वर्तमान पत्रांना न्याय मिळण्यासाठी त्यांनी लढा उभा केला आहे... उत्पादन खर्चापेक्षा कमी किंमतीत विकले जाणारे वर्तमान पत्र हे जागातील एकमेव प्रोडक्शन असल्याचे संपादक बांधवांना पटवून देत, आपण आपली किंमत जो पर्यंत वाढवणार नाहीत तो पर्यंत वर्तमानपत्र आणि पत्रकारांना चांगले दिवस येणार नाहीत, हे त्यांनी राज्यभर दौरा करून तळमळीने सांगीतले... त्यांनी केलेल्या या आवाहनाला अनेक संपादकांनी प्रतिसाद देत आपल्या वर्तमानपत्राची किंमत वाढवली.. सोशल मिडीयाच्या जमाण्यात घटनेच्या बातम्याला महत्व उरले नसून जे लोकांना माहीत आहे, तेच आपण सांगीतले तर लोक पेपर कशाला वाचतील? असा प्रश्न उपस्थित करून बदलत्या काळाबरोबर पत्रकारांनी देखील बदलले पाहीजे... लोकांना काय हवे? त्यांची रूची काय? हे ओळखून पत्रकारांनी अधुनिक तंत्रज्ञान शिकले पाहीजे... ज्या लोकांपर्यंत कोणतेच माध्यम जात नाही अशा लोकांपर्यंत पत्रकारांनी गेले पाहीजे... अशा मोटीवेशन स्पीचच्या माध्यमातून लोकांना आरसा दाखवणार्या पत्रकारांना देखील आरसा पाहण्याचे वसंतराव मुंडे यांनी सुचवले...

मराठवाड्याला अनंत भालेराव यांच्या सारख्या कर्मयोगी पत्रकारांचा आणि मराठवाडा सारख्या निर्भीड, सामाजिक चळवळींना वाहुन घेतलेल्या वर्तमानपत्राचा वारसा आहे... बीडमध्ये स्व. मोतीरामदादा वरपे, अमर हबीब, नामदेवराव क्षीरसागर, नरेंद्रकाका कांकरीया, अशोकअप्पा देशमुख, सर्वोत्तमअण्णा गावरस्कर, सुनील क्षीसागर, गंमत भंडारी, दिलीपराव खिस्ती, शेख तय्यब, राजेंद्र होळकर, अभीमन्यू घरत या पत्रकार आणि संपादकांचा वारसा आहे... या विशाल वारशाला वसंतराव मुंडे यांनी अधिक उंचीवर नेले आहे... पत्रकारिता ही केवळ बातमी लिहिण्याएवढी मर्यादित नसते तर पत्रकार सामाजिक चळवळी उभ्या करू शकतात... विकासासाठी गावे दत्तक घेऊ शकतात... चांगली कामे करून ग्रामपंचायतींनी पुरस्कार मिळवून देऊ शकतात... निव्वळ सेवाभावी वृत्तीने काम करणार्या संस्थांना मार्गदर्शन आणि बळ देऊ शकतात... राज्यकर्त्यांना चांगल्या कामासाठी पुढाकार घ्यायला लावू शकतात... वेगळ्या विचाराच्या, वेगवेगळ्या पक्षांच्या बड्या नेत्यांना एका व्यासपीठावर आनु शकतात... सरकारला लोकोपयोगी निर्णय घ्यायला आणि चुकीचे धोरण बदलायला लावू शकतात... एवढेच नव्हे तर बीड जिल्ह्यासारख्या छोट्या आणि मागास जिल्ह्यातील पत्रकार राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील पत्रकारांना पुरस्कार देऊन गौरवू शकतात.... हे वसंतराव मुंडे, संतोषजी मानुरकर यांनी दाखवून दिले आहे. यामुळेच राज्यातील पत्रकारांचे नेतृत्व करणारे वसंतराव मुंडे हे पत्रकारांचे खरे पाठीराखे आहेत, असे मला वाटते... वसंतराव मुंडे साहेब हे राज्यातील पत्रकारांचा नेता तर आहेतच मात्र मोठ्या मणाचा राजा माणूसही ते आहेत... अशा या बीडच्या पत्रकारीतेचा नावलौकीक मुंबई, दिल्लीपर्यंत घेऊन जाणार्या बसंतराव मुंडे साहेबांना वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा...!

●●●



# पत्रकार ते राज्याध्यक्ष प्रेरणादायी प्रवास



आधुनिक केसरी



**संतोष मानूरकर**
संपर्क क्र.
9822797982

दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ मध्ये मराठीतील पहिले वृत्तपत्र दर्पण प्रकाशित केले. तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये ६ जानेवारी हा दिवस मराठी पत्रकार दिन साजरा केला जातो. समाजप्रबोधनाचे सशक्त माध्यम म्हणून वृत्तपत्राची ओळख आहे. या वृत्तपत्रांमध्ये आवश्यक असणारी पत्रकारिता हे जसे शास्त्र आहे तसेच ती एक कलाही आहे. शब्दांच्या माध्यमातून मनाचा अचूक ठाव घेत वाचणाऱ्याच्या मनाला भिडणारे, प्रबोधन, ज्ञान संवर्धन व मनोरंजन करणारे लेखन हे पत्रकारितेचे खरेच गमक आहे. अशा या वृत्तपत्रामधील पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रत्यक्ष पेपर वाटपासून ते आज थेट महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या राज्याध्यक्षपदी आपले नाव कोरत, आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून आपले वेगळेपण जपत, पत्रकार, प्रतिनिधी, वृत्तपत्र वितरक, कर्मचारी, संपादक यांच्या समस्यांना वाचा फोडणारे बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणजेच वसंत मुंडे.

वसंत माधवराव मुंडे यांचा जन्म जानेवारी १९७८मध्ये परळी तालुक्यातील लाडझरी या छोट्याशा खेड्यामध्ये झाला. घरची परिस्थिती हालाखीची. मोलमजुरी करून घर कसेबसे चालवले जात.आईसोबत अर्थार्जनासाठी वसंतजीही मोलमजुरी करत आईला मदत करत. शिवाय यासोबतच शिक्षणही चालू होते.प्राथमिक शिक्षण गावातच जिल्हा परिषदेच्या शाळेत तर माध्यमिक शिक्षण शंकर विद्यालय घाटनांदुर येथे झाले.महाविद्यालयीन शिक्षण अंबाजोगाई येथे श्री. योगेश्वरी महाविद्यालय आणि स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात झाले. महाविद्यालयीन काळात ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या विविध वृत्तपत्रांची ओळख वसंतजींना सर्वप्रथम झाली.यातूनच वृत्तपत्र विषयी वेगवेगळी जिज्ञासा,कुतूहल त्यांच्या मनामध्ये निर्माण झाले.

यादरम्यान गावाकडे आई काम करत असलेल्या रोहयो योजनेतील मानधन वाटपाची घटना घडली. या योजनेतील मानधन वाटपामध्ये अधिकाऱ्यांनी घोळ करत मानधन वाटप केल्याचे वसंतजींना समजले. अनेक तक्रारी, अर्ज, विनंत्या केल्या मात्र यश आले नाही. शेवटी या सर्व वृत्ताचे रीतसर निवेदन तयार करून त्यांचे म हाविद्यालयीन प्राध्यापक तथा तत्कालिन लोकमत वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणारे प्रा. भालचंद्र मोटेगावकर यांच्याकडे जाऊन सर्व हकीकत सांगितली. त्यांनी लगेच या घटनेची शहानिशा करून योग्य तो न्याय देत योग्य मानधन वाटप करण्यास भाग पाडले. स्वतः उभारलेल्या या पहिल्या न्याय लढ्यास वसंतजींना मिळालेले हे पहिले यश होते.

पुढे अंबाजोगाई येथील उर्दू पत्रकार मुस्ताक हुसैन यांच्यासोबत अंबानगरीमध्ये कार्यरत असणाऱ्या पत्रकार मंडळींसोबत एकत्रित येऊन विविध विषयावर व विविध पत्रकारांची ओळख वाढत गेली. यातूनच प्रा. गाठाळ यांच्या विवेकसिंधु या वृत्तपत्रांमध्ये कार्यरत असणारे पत्रकार विजय हमिने यांचा सहवास त्यांना लाभला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महाविद्यालयातील विविध घटनांची वृत्तपत्रांमधून बातमी स्वरूपात रूपरेषा देण्यास सुरुवात केली.

याचकाळात अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुका सुरू झाल्या. सा. जन्मभूमीचे संपादक मोहन कराड त्यावेळी निवडणुकीसाठी उभे राहिले. त्यावेळी या साप्ताहिकांचे वाटप देखील वसंतजी यांनी केले. विविध वृत्तपत्रांमध्ये आपण लेखन करावे, ते प्रसिद्ध व्हावे यासाठी मिळेल ते काम, सर्व कष्ट, प्रचंड मेहनत करण्याची त्यांची तयारी होती. अशातच एकदा त्यांच्या गावातील शेतामध्ये अचानक लागलेल्या आगीमध्ये त्यांची व इतर गावकऱ्यांच्या शेतातील पिके जळाली. या घटनेचे सविस्तर वृत्त ज्येष्ठ पत्रकार अमर काका हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतजी यांनी तयार करून ते दै. विवेकसिंधू मधून प्रसिद्ध झाले. ही वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली त्यांची पहिलीच बातमी होती. मात्र या बातमीची दखल घेत शेतातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे होऊन आर्थिक मदतही मिळाली.

अंबाजोगाई येथील तत्कालीन पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते अरुण खैरमोडे यांच्या सहवासामुळे वसंतजी यांना दै. मराठवाडा साथी प्रतिनिधी सर्वप्रथम वृत्तपत्र क्षेत्रात संधी मिळाली. वृत्तपत्र क्षेत्रात त्यांनी आपले काम सुरु केले. याच काळात त्यांचा संपर्क शिक्षक संघटनेमध्ये कार्यरत असणारे संपत्ते गुरुजी यांच्याशी आला.त्यांच्यासोबत त्यांनी मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रभर भ्रमंती करत शालेय शिक्षण, शैक्षणिक विचारधारा, शैक्षणिक समस्या अशा विविध गोष्टींची माहिती घेत आपली ज्ञानवृद्धी केली. पत्रकारिता क्षेत्रातील काम करत असताना नवीन नवीन गोष्टी आत्मसात करण्यासाठी ते सतत धडपडत असत. याच दरम्यान श्री योगेश्वरी महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या भगवानराव सबनीस यांच्याकडे त्याकाळी लोकसत्ता, सकाळ हे पेपर पोस्टाने येत असत.मग वसंतजीनी हे वृत्तपत्र पाहून,वाचून त्यामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, स्तंभलेखन, स्टोरी लेखन यांचे अत्यंत काळजीपूर्वक अध्ययन केले. त्यानुसार लिहिण्याचा प्रयत्न केला. यासोबतच ज्येष्ठ पत्रकार अमर काका हबीब, सुदर्शन रापतवार, विजय हमिने यांच्या सहवासात त्यांना अनेक गोष्टी शिकण्यास मिळाल्या.

याच दरम्यान त्यांच्या जीवनात एक अशी घटना घडली, जी त्यांच्या जीवनात, पत्रकारिता क्षेत्रात एक टर्निंग पॉइंट ठरली. अंबाजोगाई जिल्हा निर्मितीचे आंदोलन सुरू झाले होते. पत्रकार व विद्यार्थी आघाडी यांच्या माध्यमातून वसंतजी ह्या लढ्यात सहभागी झाले होते. मात्र बर्दापूर येथे पोलिस स्टेशनमधील पत्त्याच्या क्लबची बातमी वसंतजी यांनी वृत्तपत्रात प्रसिद्ध केली. यामुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासन हादरून गेले. तत्कालीन अधिकाऱ्यावर कारवाई झाली.मात्र काहीच दिवसात जिल्हा निर्मितीचे आंदोलन चिघळले आणि अंबाजोगाई येथे कर्फ्यू लागला. या कर्फ्यूमध्ये वसंतजी अंबाजोगाई येथील बस स्टँड वर अडकले, ड्युटीवर असणारे अधिकारी यांच्या लक्षात ही गोष्ट आल्याने मागील बातमीचा राग मनात धरत त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह वसंतजी यांना रस्त्यावरच अमानुषपणे मारहाण केली. ही मारहाण इतकी अमानुष होती की त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या विधानसभेत उमटले. महाराष्ट्राचे तत्कालीन उपमुख्यमंत्री लोकनेते गोपीनाथजी मुंडे यांनी या घटनेची लक्षवेधी आयोजित करून विधानसभा तहकूब केली. पुढे मुंडे साहेबांनी या घटनेबद्दल वसंतजी यांची आस्तेवाईकपणे चौकशी करत पाठीवर कौतुकाची थापही दिली.

सन १९९९ च्या अखेरीस त्यांना दै. लोकपत्रमध्ये जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती मिळाली.२००० ते २००१ या काळात त्यांनी आजपर्यंत प्राप्त केलेल्या अनुभवाचा उपयोग करून आपले वेगळेपण सिद्ध केले. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळख असणाऱ्या बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांच्या व्यथा समजून घेण्यासाठी त्यांनी दहा दिवस ऊसतोड कामगारांसोबत राहून प्रत्यक्ष अनुभवावर आधारित ऊसतोड कामगारांच्या व्यथा चित्रित करणारी क्रमिक लेखमालिका लोकपत्रातून प्रसिद्ध केली.या पहिल्याच लेखमालिकेस समर्थन संस्था मुंबई द्वारे राज्यातील पत्रकारांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती प्राप्त झाली. सन २००२ मध्ये या शिष्यवृत्तीच्या वितरण समारंभ प्रसंगी मराठवाड्यातील पत्रकार म्हणून ऐनवेळेस व्यक्त केलेल्या मनोगताने सर्वांचे लक्ष वेधले. याप्रसंगी मंचावर उपस्थित असणारे लोकसत्ताचे तत्कालीन सहायक संपादक श्री. दिनकर रायकर यांनी वसंतजींची विशेष दखल घेत पाठीवर कौतुकाची थाप ही दिली.

दिवसेंदिवस वसंतजींचा पत्रकारिता क्षेत्रातील प्रगतीचा आलेख हा चढताच होता. पुढे दै. लोकसत्ताचे तत्कालीन सहाय्यक संपादक श्री दिनकर रायकर, आनंद आगाशे, मुकुंद संगोराम या पत्रकारितेतील दिग्गज व्यक्तींनी त्यांची दै. लोकसत्ताचे बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली. सन २००२ मध्ये त्यांची पहिली बातमी पीक पाणीया सदरामध्ये दै. लोकसत्तामध्ये प्रसिद्ध झाली. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्राच्या माध्यमातून आजवर वसंतजी यांनी अनेक विविधांगी लेखन केलेले आहे. यामध्ये सक्सेस स्टोरी, चर्चेतले चेहरे, कृषीधन या विषयावर आधारित लेखमालिका विशेष गाजल्या.

सन २००४ मध्ये बीड जिल्हा पत्रकार संघाच्या सचिव पदी वसंतजी यांची तर अध्यक्ष म्हणून संतोष मानूरकर यांची निवड करण्यात आली. याच्या माध्यमातून त्यांनी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. ज्येष्ठ पत्रकार स.मा. गर्गे पत्रकारिता पुरस्काराचे आयोजन दरवर्षी केले. महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मा. विलासरावजी देशमुख व लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब या हजरजबाबी, वक्तृत्वसंपन्न, भाषाचातुर्य व्यक्तिमत्त्वांच्या उपस्थितीत आयोजित होणारा कार्यक्रम म्हणजे बीडकरांसाठी अवर्णनीय असा होता.आजतागायत दरवर्षी हा पुरस्कार अनेक मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जातो.

सन २०१४ –१५ पासून महाराष्ट्र राज्य शासनाच्या अधिस्वीकृती कमिटीवर त्यांची नियुक्ती झालेली आहे. तसेच मराठवाडा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर खुली चर्चा, ज्येष्ठ पत्रकारांची अर्ज न घेता निवड, कोटा पद्धतीमध्ये बदल अशा विविध विषयांमध्ये अमुलाग्र बदल करत आपल्या कार्याची वेगळी छाप त्यांनी पाडली. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संजय भोकरे तसेच गोविंद घोळवे यांनी त्यांची महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या कार्याध्यक्षपदी तर सन २००० पासून राज्याध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. कोणत्याही वृत्तपत्राचे संपादक नसतानाही एक जिल्हा प्रतिनिधीपदी काम करणारा पत्रकार असूनही महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे अध्यक्षपद भूषविणारे वसंत मुंडे हे पहिले पत्रकार आहेत. हा वसंत मुंडे यांच्यासोबतच आपल्या बीड जिल्ह्याचा बहुमान आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्याध्यक्ष या नात्याने त्यांनी वृत्तपत्र क्षेत्रात अमुलाग्र बदल केलेले आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील वृत्तपत्र क्षेत्राशी निगडित व्यक्तींच्या ऑनलाईन बैठकांचे संवादांचे त्यांनी आयोजन केले. कोरोना सारख्या भयानक काळात पत्रकार,वृत्तपत्र वितरक, विक्रेते, कामगार यांचे अतोनात हाल झाले. सम ाजातील अधिकारी–कर्मचारी यांच्या पगार कपातीचे विस्ताराने चर्चा अनेक वृत्तपत्रांमध्ये करण्यात आले.मात्र याच वृत्तपत्रासाठी कार्यरत असणारे अनेक छोटे–म ोठे पत्रकार, वृत्तपत्र विक्रेते, वितरक, कर्मचारी यांच्या पगार कपातीची दखल मात्र कुठल्याच वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध झाली नाही हे विलक्षण दुर्दैवच म्हणावे लागेल. अशा सर्व पत्रकार बांधवांसाठी, कर्मचाऱ्यांसाठी एक राज्याध्यक्ष या नात्याने आपल्या संघटनेच्या माध्यमातून एक कुटुंबप्रमुख या नात्याने तीस हजारांहून अधिक बांधवांना सर्वतोपरी सहकार्य त्यांनी केले.

आजच्या आधुनिक काळात जीवनातील प्रत्येक गोष्ट ही महाग होत चाललेली आहे. एक रुपयाला मिळणारा चहा दहा रुपयाला मिळतो, एक झेरॉक्स दोन रुपयाला येते. मात्र आठ ते दहा पानी वृत्तपत्र केवळ तीन ते चार रुपयाला तेही अनादिकाळापासून! या भूमिकेला एक राज्याध्यक्ष म्हणून न्याय देण्यासाठी वृत्तपत्रांची किंमत वाढवली पाहिजे ही भूमिका सर्वप्रथम त्यांनी मांडली.देशाच्या बजेटवर विस्ताराने वर्णन करणारी वृत्तपत्रे मात्र वृत्तपत्राच्या बजेटवर विस्ताराने चर्चा करत नाहीत. संपादकांनी पत्रकारांना जाहिरातदाराच्या दारातून बाहेर काढायचे असेल तर वर्तमानपत्राची विक्री किंमत वाढवावी लागेल. तर आणि तरच जाहिरातदार संपादकाच्या दारात येईल. ही ठाम भूमिका महाराष्ट्रात सर्वप्रथम वसंत मुंडे यांनी म ांडली.याचा परिणाम म्हणून आज महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांनी आपली किंमत वाढवण्यास सुरुवात केलेली आहे. वृत्तपत्राच्या किमती वाढल्यामुळे वृत्तपत्राला आर्थिक स्थैर्य लाभेल आणि त्यातूनच वृत्तपत्राचा दर्जा सुधारेल असे त्यांचे ठाम मत आहे. त्यांच्या या भूमिकेचे विस्ताराने वर्णन करणारी मुलाखत महाराष्ट्रातील विविध २०० हून अधिक वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली हे विशेष. वृत्तपत्र क्षेत्रातील होणाऱ्या या परिवर्तनाची नांदी वसंतजी मुंडे यांच्यामुळेच महाराष्ट्रात सर्वप्रथम सुरुवात झाली. त्यांच्या या आगळ्यावेगळ्या निर्णयामुळेच वसंत मुंडे व बीड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्रात सर्वश्रुत झालेले आहे. ज्यायोगे आगामी काळात वृत्तपत्र क्षेत्रात अनेक सकारात्मक बदल आपणास निश्चितच पहावयास मिळतील. राज्यातील वृत्तपत्रांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी वृत्तपत्र संपादकांची पहिली गोलमेज परिषद वसंतजी यांनी आयोजित केली. या परिषदेसाठी नगर, जालना, औरंगाबाद जिल्ह्यातील ४० हून अधिक संपादक या परिषदेसाठी उपस्थित होते. पत्रकारितेच्या क्षेत्रातील २० वर्षाच्या समृद्ध अनुभवातून वृत्तपत्र,पत्रकार, प्रतिनिधी, कर्मचारी, विक्रेते, वितरक या सर्वांच्या हितासाठी त्यांना अनेक नवनवीन योजनांची अंमलबजावणी करावयाची आहे. कुठलीही शैक्षणिक,आर्थिक, राजकीय पार्श्वभूमी पाठीशी नसताना, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून शिक्षण घेत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर वसंतजी यांनी वृत्तपत्र वाटप ते राज्याध्यक्षपदी कार्य करत आपले कौशल्य, वेगळेपण सिद्ध केलेले आहे. त्यांचा हा प्रवास नक्कीच सर्वांना थक्क करणारा आणि प्रेरणादायी आहे. राज्याध्यक्ष वसंतजी मुंडे आपल्या कार्यातून वृत्तपत्र क्षेत्रास नवसंजीवनी देण्यास नक्कीच यशस्वी ठरतील.यासाठी सा. प्रभाकर परिवाराच्या वतीने त्यांना हार्दिक शुभेच्छा. ●●●

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



मा.श्री.वसंत मुंडे
प्रदेशाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई



शुभेच्छुक :-
श्री.बाजीराव शंकरराव फराकटे
जिल्हाध्यक्ष ; महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ
कोल्हापूर जिल्हा व जिल्हा कार्यकारिणी



श्री.विश्वास आरोटे
प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई

रविवार, ०१ जानेवारी २०२३
⊙ किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१३४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

●MARATHI ●DAINIK ●AURANGABAD (MAHARASHTRA) ●SUNDAY 01 JANUARY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-134 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-5


## नवी पहाट दाखविण्यासाठी

सुड घेणारा काळ थकलाय
याचा अर्थ...
सोसणारा विजयी झालाय
असा नसतो राजा
सटवाईच्या लेखणीचा अर्थ
कुणालाच उमगला नाही
सोसणाऱ्याच्या अंगी बळ यावं म्हणून
हा तीनेच काळाला दिलेला
स्वल्प...
नव्हे नव्हे अल्प विराम हा असेल कदाचित.
म्हणून तर बंडाचं निशाण हे
सोसणाऱ्याच्याच हाती असतं नेहमी
आसुडाचे पागोरे छाटण्यासाठी
अन् येणाऱ्या पिढ्यांना
नवी पहाट दाखविण्यासाठी.
मावळत्या किरणांना भावपूर्ण निरोप देऊया
आणि उगवत्या किरणांचे आनंदाने स्वागत
करूया.


प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

# कर्नाटकात भाजपा स्वबळावर

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहांची मोठी घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू : कर्नाटकमध्ये आगामी मे महिन्यात विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता आहे. ही निवडणूक भाजपा स्वबळावर लढणार असल्याची घोषणा केंद्रीय गृहमंत्री अमित शहांनी यांनी केली आहे. बंगळुरूमध्ये आयोजित जाहीर सभेला संबोधित करताना ते बोलते होते. यावेळी बोलताना त्यांनी जेडी(एस) युतीबाबत अफवा पसरवत असल्याचा आरोपही केला. तसेच कर्नाटकमध्ये भाजपा पुन्हा सरकार बनवेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्ती केला.**



काही लोकांकडून जेडी(एस) आणि भाजपाची युती होणार असल्याची अफवा परसवली जात आहे. जेडी (एस)ला मत देणे म्हणजे काँग्रेसला मत देणे आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणूक भाजपा स्वबळावर लढवणार आहे, अशी प्रतिक्रिया अमित शहा यांनी दिली. तसेच कार्यकर्त्यांनी निवडणुकीसाठी सज्ज राहावे, असे निर्देशही त्यांनी दिले. पुढे बोलताना त्यांनी काँग्रेवरही टीकास्त्र सोडले. काँग्रेसला सत्ता केवळ भ्रष्टाचार करण्यासाठी हवी आहे. मात्र, आम्ही सत्तेचा वापर लोकांचे जीवनमान उंचावण्याठी करतो. जनतेच्या भल्यासाठी करतो. त्यामुळे काही दिवसांपूर्वीच झालेल्या सात राज्यांच्या निवडणुकीत काँग्रेसला सहा राज्यात पराभव स्विकारावा लागला आहे, असे ते म्हणाले. दरम्यान, तत्पूर्वी त्यांनी बूथस्थरावरील कार्यकत्यांची बैठकही घेतली. यावेळी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांसह भाजपाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी उपस्थित होते.

## नववर्षाच्या स्वागतासाठी सप्तशृंगी मंदिरात प्रचंड गर्दी; भाविकांसाठी देवस्थानचाही मोठा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी भाविकांनी विविध देवस्थानांवर गर्दी केल्याचं चित्र आहे. नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंगी मातेच्या मंदिर परिसरात देखील भाविकांनी गर्दी केली आहे. विशेष म्हणजे सप्तशृंगी देवीचे मंदिर आज २४ तास खुले असणार आहे. सालाबादप्रमाणे नव्या वर्षाची सुरुवात अनेक भाविक भक्त श्री क्षेत्र सप्तशृंगगड येथे श्री भगवतीच्या दर्शनाने करतात. त्यामुळे श्री क्षेत्र सप्तशृंगगड येथे नववर्षाच्या दरम्यान भाविक-भक्तांची प्रचंड गर्दी लोटते. यावर्षी नववर्षाच्या स्वागतासाठी



नेहमीपेक्षा जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मंदिर देवस्थानच्या वतीने येणाऱ्या भाविकांची गर्दी विभागली जावी आणि सर्वांना सहजतेने भगवती दर्शन घेता यावे यासाठी नुतन वर्ष प्रारंभास विविध राज्यातून येणाऱ्या भाविक-भक्तांसाठी श्री भगवती मंदिर २४ तास खुले ठेवण्यात येणार आहे. शिर्डीचे साईबाबा मंदिर, वाणीची सप्तशृंगी माता आणि इतरही मंदिरांत भाविक भक्तांची अलोट गर्दी झाली आहे. अनेक भक्त पालख्या घेऊन पवित्र स्थळांवर दाखल होत आहेत. सप्तशृंगी मातेच्या मंदिराच्या नियमित वेळेप्रमाणे सर्व काही होणार असून भाविकांना करोना नियमांचे पालन करण्यासाठी मास्क सक्ती करण्यात आलेली आहे. आज नव्या वर्षाच्या स्वागताला या ठिकाणी प्रचंड गर्दी असेल. त्यामुळे मास्क बंधनकारक असणार आहे.

## नारायण राणे 'शिवतीर्थ'वर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भाजप खासदार आणि केंद्रीय मंत्री नारायण राणे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या भेटीला गेले आहेत. राज ठाकरे यांच्या 'शिवतीर्थ' निवासस्थानी दोघांची भेट झाली. नारायण राणे सपत्नीक राज ठाकरेंच्या भेटीला गेले होते. जवळपास दीड तास या दोघांची बातचित चालली. त्यानंतर काही काळ नारायण राणे आणि राज ठाकरे या दोघांच्याच काही काळ गॅलरीत गप्पा रंगल्या. या भेटीचे नेमके कारण अद्याप गुलदस्त्यात आहे. परंतु राणे-ठाकरे भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.आगामी मुंबई महापालिका निवडणुका आणि राज्यातील इतर महत्त्वाच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही भेट महत्त्वपूर्ण मानली जात आहे. गेल्या काही काळापासून राज ठाकरेंची भाजपशी जवळीक वाढली असताना आता राणेंशीही पुन्हा सूत जुळताना दिसतेय. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांना कोंडीत पकण्यासाठी दोघांमध्ये चर्चा झाल्याची शक्यता वर्तवली जाते. कोकणात ठाकरे गटाला खिंडीत गाठण्यासाठी भाजप-मनसे यांची युती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या भेटीत मुंबई-गोवा महामार्गाविषयीही दोघांमध्ये बातचित झाल्याचे बोलले जाते. नारायण राणे आणि राज ठाकरे यांची ही कौटुंबिक सदिच्छा भेट जवळपास दीड तास रंगली. शिवतीर्थच्या गॅलरीमध्ये हे दोन्ही नेते काही काळ गप्पा मारताना दिसले. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काही दिवसांपूर्वीच कोकण दौरा केला होता. या दौऱ्यात राज ठाकरेंनी नारायण राणे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली होती. मात्र यावेळी नारायण राणे घरी नव्हते. त्यामुळे दोघा नेत्यांची भेट होऊ झाली नव्हती.


नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!
ज्ञानकुंज शिक्षण प्रसारक मंडळ, औरंगाबाद
कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व ज्ञानकुंज इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल





मा. विजय द्वारकुंडे
(अध्यक्ष, ज्ञानकुंज शि.प्र. मंडळ, औरंगाबाद)




मा. भाऊसाहेब काळे
(सचिव, ज्ञानकुंज शि.प्र. मंडळ, औरंगाबाद)

Email : arts.com.scmr.college@gmail.co
Email : dnyanknjies2020@gmail.com

बाजारसावंगी, ता. खुलताबाद, जि. औरंगाबाद






विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# 'तेच ते ...'

आधुनिक केसरी



आता बोला ! 'फॅक्ट' हा शब्द मुळातच एखादी गोष्ट सत्य आहे म्हणून वापरला जातो. पण तेवढं कमी की काय म्हणून बरीचशी मंडळी 'ट्रू फॅक्ट' असं म्हणतात. म्हणजे सत्याबद्दल मुळीच शंका नको ( ? ) येताना पाण्याची 'वॉटरबॅग' सोबत असू द्या हे ही असंच मजेशीर.
एखादी व्यक्ती आपल्या व्यवसायात किंवा कामात यशस्वी झाली किंवा एखाद्या विशिष्ट वेळेपासून त्यांच्या चांगल्या कारकिर्दीला सुरुवात झाली तर 'नंतर त्यांनी मागे वळून पहिले नाही,' हे शब्द हमखास वापरले जातात. 'ज्यांना पुढे जायचं आहे तो कशाला मागे वळून पाहील ?' एखादी व्यक्ती निवृत्त झाली किंवा निधन पावली तर 'त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली आहे ती भरून निघणे अशक्य आहे' असे उद्गार काढले जातात. अशा सगळ्या पोकळ्या कायम राहिल्या असत्या तर केवढे निर्वात वातावरण निर्माण झाले असते याची कल्पना करवत नाही ! एखाद्या व्यक्तीला श्रद्धांजली वाहताना 'त्यांच्या जाण्याने त्यांचा कुटुंबियांवर जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे, दुःखाची कुऱ्हाड कोसळली आहे' असे शब्द हमखास असतात. बोलणाऱ्याच्या भावना प्रामाणिक असतात. पण त्याच त्या शब्दांची पुनरावृत्ती न करता 'त्यांच्यावर आलेली ही मोठी आपत्ती, आलेले संकट' असेही म्हणता येऊ शकते.
असे शब्द काय किंवा जीवनात आलेला 'तोच तो' पणा काय ! सारखेच आहे. हा 'तोच तो' पणा जर घालवायचा असेल तर नव्याचा शोध घेतलाच पाहिजे. त्यासाठी थोडी बुद्धीला चालना द्यायला हवी. काम करण्याचे, व्यक्त होण्याचे नवनवीन पण अर्थपूर्ण मार्ग शोधून काढता यायला हवेत. नाहीतर मग विंदांच्या कवितेत सांगितल्याप्रमाणे 'तेच ते अन तेच ते...' असं म्हणत बसण्याची पाळी येईल.



# आनंदी पहाट

## घराची खरी गरज अंतर्मनाला

आधुनिक केसरी

घराची खरी गरज मनालाच अधिक असते. म्हणूनच मन प्रसन्न राहाण्यासाठी घर देखील प्रसन्न असलं पाहिजे. जसं आपलं मन सुंदर असतं तसंच घर सुद्धा सुंदर असलं आणि दिसलं पाहिजे. आपल्या घराच्या अंतरंगावरून आपल्या अंतर्मनाची ओळख होत असते. आपल्या घराच्या अंतरंगाचं रूप आपल्या अंतर्मनांचा आरसा असतो. आपल्या सजवलेल्या घरामुळे आपलं व्यक्तिमत्व देखील खुलून येत असतं. यामुळे सौदर्याचा साक्षात्कार केवळ घरातच होतो असं नाही तर अंतर्मनातही होत असतो. आपण ज्या वातावरणात वावरतो त्या वातावरणाचा आपल्यावर कमी अधिक प्रमाणात प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अनुकरणप्रिय असणारं आपलं मन अनेकदा कोणा एखाद्याकडे काही बघितलं की त्याचा शोध सुरू करत असतं. आपल्याही घरात ती वस्तु आणण्याचा आग्रह आपलं मन करतं. सौदर्यासाठी अशा वस्तूचा जरूर विचार करायला हरकत नसते. परंतु ती वस्तु आपल्या घरात कोठे, कशी ठेवावी याचा आपला विचार होतोच असं नाही. मनाच्या आग्रहामुळे आणलेल्या वस्तूची जागा मग ठरत नाही किंवा जागा निश्चित झाली तरीही त्या जागेवर ती शोभून दिसत नाही. अशावेळी गरज भासते ती व्यावसायिक अंतर्गत संरचनाकाराची आणि त्याच्या गुणानुभवाची. तोच आपल्या घरात सौदर्याचा साक्षात्कार घडवून आणू शकतो. बदलत जाणारे जीवनमान आणि काळाची गरज म्हणून जीवनपद्धतीत देखील आमुलाग्र बदल घडत गेले आहेत. घराच्या बाबतीत केवळ विविधता हवी म्हणून गृह सजावट असा माफक दृष्टिकोन राहिला नसून तो खूपच व्यापक झाला आहे. आपल्याला घराची जरुरी केवळ शरीरासाठी मुलभूत गरज भागवणे अशी नसून त्याची खरी गरज मनासाठी अधिक असते.

# मातीत ओल्या रुजावे......

आधुनिक केसरी

बी लावल्यानंतर त्या मातीत ओलावा असेल तर ते बी रुजते. कोरड्या मातीत बी टाकून काही उपयोग होत नाही. बी सुद्धा भरदार असावे लागते. जेणेकरून त्यातून नवा अंकुर फुटेल.बियापासून झाड, फुलं, पिक, धान्य, भाजीपाला काढताना जेवढी मेहनत घ्यावी लागते तेवढीच मेहनत आपल्या मुलांना घडवताना घ्यावी लागते. बी जमिनीत टाकून दिले, त्याच्याकडे नंतर पाहिलेच नाही ,तर बी वाळून जाईल, किंवा किडे, मुंग्या खाऊन घेतील. तसेच मुलांचंही असतं. जन्माला आली आणि वाढतील आपोआप!!! असं म्हणून चालणार नाही. सोनं उगाळून जरी नाही घातलं तरी निदान सोन्यासारखी मुलं नक्कीच घडवता येतील.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515
भाग-55

त्यासाठी मुलं लहान आहे तोवरच त्यांच्यावर योग्य संस्कार व्हावे. लहानपणी त्यांना जी ओढ असते प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याची, ती मोठेपणी नसते .कारण ओढ संपली की बाल्यावस्था संपत असते.
निरनिराळा आनंद मुलांसोबत आपणही घ्यावा. मानसिक व शारीरिकरीत्या मुलं सक्षम व्हावीत. जेणेकरून कोणत्याही संकटांना ती सहज सामोरे जातील.
घरात मुलांसमोर वाद, भांडण नको. मुलांसमोरच काय, कधीच नको. मुलांच्या शालेय जीवनात आई-वडिलांनी डोळस असावं. त्यांच्या शाळेत काय सोयी सुविधा आहेत ते बघावं. शिक्षकांशी संवाद साधावा.
बापाने धोतराने नाक पुसू नये, नाहीतर मुलगा शर्टाच्या बाहीला नाक पुसतोच.. घरात शिव्या ऐकल्या तर बाहेर मित्राला शिव्या देतोच. या सगळ्या गोष्टींचे आपण भान ठेवावे .माती ओली आहे तोवरच बी रुजते. लहान वयात (ओल्या मातीत) संस्कार रूजायला वेळ लागत नाही. सर्वात महत्त्वाचं म्हणजे मुलांसाठी आपण आपला वेळ द्यावा. लहान लहान गोष्टीची त्यांच्याशी चर्चा करावी .चोरासारखं त्यांच्याकडे नेहमीच संशयित म्हणून पाहू नका .
आपलीच निर्मिती आहे ती...

# मूर्ख डोमकावळा

आधुनिक केसरी

एका गरूडाने कुरणात चरत असलेल्या मेंढ्यांच्या कळपातील एका कोकरावर झडप घातली व त्या कोकराला पळवून नेले. त्याचे हे धाडस आणि सामर्थ्य पाहून रानातले सर्व पशुपक्षी त्या गरूडाकडे भीतीयुक्त आदराने पाहू लागले.
'गरूडाने पळवले त्यापेक्षाही मोठे कोकरू जर आपण पळवले तर गरूडापेक्षाही आपला मानसन्मान वाढेल, त्याच्याइतकीच प्रतिष्ठा आपल्याला लाभेल असे एका डोमकावळ्याला वाटले.
त्यासाठी त्याने नजर ठेवून एका मोठ्या थोराड अशा कोकराच्या पाठीवर बसून त्याला उचलण्याचा प्रयत्न केला पण ते कोकरू उचलले जाण्याऐवजी, डोमकावळ्याचेच पाय कोकराच्या पाठीवरील लोकरीमध्ये अडकले व तिथून सुटण्यासाठी त्याने पंखांची केलेली फडफड व आरडाओरड मेंढपाळाच्या कानी गेली. तो तिथे आला व त्याने डोमकावळ्याला सोडविले व पिंज-यात कैद केले व त्याला स्वतःच्या मुलांच्या स्वाधीन केले. मुलांनी मेंढपाळाला विचारले,"बाबा या पक्ष्याचे नाव काय हो" यावर तो मेंढपाळ हसून म्हणाला," या मूर्ख पक्ष्याला जर तुम्ही याचे नाव विचारले तर हा स्वतःला गरूडापेक्षाही श्रेष्ठ असा पक्षी म्हणून स्वतःची ओळख करून देईल पण प्रत्यक्षात हा मोठेपणाचा आव आणणारा एक भिकार डोमकावळा आहे."
**तात्पर्य:** काही काही लोकांना मोठेपणाचा आव आणण्याची प्रचंड सवय असते. यामध्ये त्यांनी कितीही जरी मोठेपणाचे सोंग घेतले तरी इतर सूज्ञ लोक हे त्यांची पात्रता जाणून असतात.

# समर्थवाणी


आधुनिक केसरी

**नदी सागराला मिळते याचे खरे कारण हेच की ती आपले उगमस्थान सोडीत नाही. थकणाऱ्यास आणि कंटाळा करणाऱ्यास युवक म्हणता येणार नाही कारण युवक ही संज्ञा केवळ शारीरिक नसून मानसिक देखील आहे. जसे विद्यार्थी गुरुंचा शोध घेत असतो तसेच गुरु देखील विद्यार्थ्यास शोधत असतो.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# भगवंताशी आपले नाते जोडावे



आधुनिक केसरी

भगवंताचे नाम मुखातून न येण्यापेक्षा मुकेपण बरे नाही का ? दृष्टी जर भगवंताची मूर्ती पाहात नसेल तर ती दृष्टी काय कामाची ? आपले कान जर त्याची कीर्ति ऐकत नसतील तर ते कान काय कामाचे ? डोळ्यांनी भगवंताची मूर्ती पाहणे, मुखाने भगवंताचे नामस्मरण करणे, कानांनी त्याचेच गुणानुवाद ऐकणे, हाच खरा अभ्यास आहे. भगवच्चरित्र ऐकायचे कशासाठी ? तर त्याप्रमाणे वागण्यासाठी.
भगवत्प्राप्तीसाठी एक सुलभ उपाय आहे. भगवंताशी आपले नाते जोडावे. कोणते तरी नाते लावावे. भगवंत हा माझा स्वामी आहे, मी त्याचा सेवक आहे; तो माता, मी लेकरू; तो पिता, मी पुत्र; तो पती, मी पत्नी; तो पुत्र, मी आई; तो सूत्रधार, मी बाहुले; असे काही नाते लावावे. मुलगा दत्तक घेतल्यावर मग त्याच्याशी पुत्रप्रेम लावतो की नाही ? लग्न होण्यापूर्वी कोण नवरा आणि कोण बायको ? पण लग्न होताच ते नाते लावतो, आणि सहवासाने प्रेम वाढवितो. प्रेम केल्याने प्रेम वाढते. तसे भगवंताविषयीचे प्रेम कोणचे तरी नाते लावून वाढवावे. किंबहुना तो स्वभावच व्हावा, म्हणजे भगवद्प्राप्ती सुलभ होते. हनुमंताने दास्यभक्ति केली, रामाला आपल्या हृदयातच ठेवले. गुहकाचे रामावर तसेच प्रेम होते. रावणाने शत्रू म्हणून, भरताने भाऊ म्हणून, सीतामाईने पती म्हणून, बिभीषणाने मित्र म्हणून, हनुमंताने स्वामी म्हणून, भगवंताला आपलासा करून घेतलाच. ज्या गावात मारुती नाही त्या गावात राहूच नये. मारुती गावात नसेल तर निदान आपल्या घरी तरी ठेवावा. घरात देवाची उपासना करावी. घर हे मंदिराप्रमाणे असावे. परान्न म्हणजे दुसऱ्याने मिळविलेले अन्न. आपण घरी जे अन्न खातो ते देखील परान्नच आहे, कारण अन्नदाता परमात्माच आहे. त्याचे स्मरण ठेवून अन्न खावे. चवीला बळी न पडता, जरूर असेल तेव्हा आणि तेवढेच खाणे, याचे नाव सात्त्विक आहार होय. मुख्य म्हणजे, प्रत्येक गोष्टीत भगवंताची आठवण राहिली पाहिजे. मग ते खाणे, पिणे, गाणे, बजावणे, हिंडणे, काहीही असो. गायनामध्ये ठरलेल्या सुरात शब्द म्हणायचे असतात, त्यामध्ये भगवंताची आठवण राहणे कठीण असते. गायन हे करमणुकीकरिता असले तरी भगवंताला अशा प्रेमाने आळवावे की त्याच्या डोळ्यांत पाणी यावे. राम आपल्या जरूरीपुरते कुठेही देतो, म्हणून भगवंत देईल त्यात समाधानाने राहायला शिकावे. प्रपंचात दुःखप्रसंग आले म्हणजे मग रामस्मरण होते; तसे ते सर्व काळी करावे. रामावर श्रद्धा पूर्ण असावी, म्हणजे आपली काळजी त्याला वाटते. **आजचे बोधवचन आहे** – भगवंताच्या नामात राहिल्यावर त्याला आपलासा करून घ्यायला निराळे काही करण्याची जरूरी नसते.

# योगीराज संत ज्ञानेश्वर

आधुनिक केसरी

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणजे महाराष्ट्राचे एक अनमोल रत्न ! महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातील परमार्थाच्या क्षेत्रातील न भूतो न भविष्यति असे अजोड व्यक्तिमत्त्व व अलौकिक चरित्र म्हणजे संत ज्ञानेश्वर. गेली सुमारे ७२५ वर्षे महाराष्ट्रातील सर्व पिढ्यांतील सर्व स्तरांतील समाजाने जे व्यक्तिमत्त्व आपल्या मनोमंदिरात एक अढळ श्रद्धास्थान म्हणून जपले आहे; आणि जे श्रद्धास्थान पुढील असंख्य पिढ्यांतही कायमच अढळ व उच्चस्थानी राहणार आहे; असे एकमेवाद्वितीय व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री संत ज्ञानेश्वर! ज्ञानेश्वरांचा जन्म आपेगाव येथे तेराव्या शतकात, मध्यरात्री श्रावण कृष्ण अष्टमी, शके ११९७ (इ.स. १२७५) रोजी झाला त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत कुलकर्णी. त्यांच्या आई रुक्मिणीबाई या होत. गोविंदपंत व मीराबाई हे त्यांचे आजोबा-आजी होत. निवृत्तीनाथ हे ज्ञानेश्वरांचे थोरले बंधू. निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई या त्यांच्या भावंडांचा जन्म अनुक्रमे शके ११९५, ११९९ व १२०१ मध्ये झाला. आपेगाव हे औरंगाबाद जिल्ह्यातील पैठणजवळ गोदावरी नदीच्या काठावर वसलेले छोटे गाव आहे. ज्ञानेश्वरांचे वडील विठ्ठलपंत हे मुळात विरक्त संन्यासी होते. विवाहित असतानाच



त्यांनी संन्यास घेतला व ते काशीला गेले. गुरूंना ते विवाहित असल्याचे समजल्यावर गुरूंनी त्यांना परत पाठवले. त्यांच्या आज्ञेनुसार पुन्हा गृहस्थाश्रमात प्रवेश केल्यानंतर विठ्ठलपंतांना चार अपत्ये झाली. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ताबाई अशी त्यांची नावे होत. विठ्ठलपंत तीर्थयात्रा करत करत आळंदी मुक्कामी येऊन स्थायिक झाले. त्या काळी संन्यासाची मुले म्हणून सर्व समाज या चौघा भावंडांची हेटाळणी करीत असे. गावाने त्यांना व त्यांच्या कुटुंबाला वाळीत टाकले. परित्यक्त ब्राह्मण म्हणून त्यांना काळ कंठावा लागला. ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांची मुंज करण्याचे आळंदीच्या ब्राह्मणांनी नाकारले. त्यावर विठ्ठलपंतांनी उपाय काय असे धर्मशास्त्रींना विचारले. त्यावर केवळ देहदंडाचीच शिक्षा आहे असे ब्राह्मणांनी सांगितले. मुले संस्कारांपासून वंचित राहू नये व त्यांचे भविष्यात भले व्हावे यासाठी विठ्ठलपंतानी व रुक्मिणीबाई यांनी आत्महत्या करून देहान्त प्रायश्चित्त घेतले. आई-वडिलांच्या मृत्यूनंतर ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांना लोकांकडून फार त्रास दिला गेला. त्यांना अन्न आणि पाणी यासारख्या मूलभूत गोष्टी नाकारण्यात आल्या. पुढे ही भावंडे पैठणला गेली आणि तेथे ज्ञानेश्वरांनी आपली विद्वत्ता सिद्ध केली. संत ज्ञानेश्वरांनी अत्यंत रसाळ भाषेत शब्दरचना केली. संत नामदेवांच्या जोडीने त्यांनी भागवत धर्म – वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. ७०० वर्षांची परंपरा असलेल्या वारकरी संप्रदायाचे अनुयायी महाराष्ट्रात आजही लाखो संख्येने आहेत. भावार्थदीपिका हे भगवद्गीतेच्या अनुवादवजा टीका ग्रंथाचे कार्य ज्ञानेश्वरांनी अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा येथे केले.निवृत्तीनाथ हेच ज्ञानेश्वरांचे सद्गुरू होते. नेवासा क्षेत्रात आपल्या गुरूंच्या कृपाशीर्वादाने गीतेवर त्यांनी प्रख्यात टीका लिहिली. खरे पाहता ज्ञानेश्वरांनी ही टीका सांगितली व सच्चिदानंद बाबा यांनी ती लिहिली. या ग्रंथास 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थदीपिका' असे म्हणतात. हे मराठी वाङ्मयाचे देशीकार लेणे झाले. ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून संस्कृत भाषेतील 'ज्ञान', श्री संत ज्ञानेश्वरांनी प्राकृत भाषेत आणले. असे म्हणत त्यांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान, मराठीची महती व्यक्त केली आहे. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग सांगणाऱ्या ज्ञानेश्वरीत सुमारे ९००० ओव्या आहेत. हा ग्रंथ इ.स. १२९० मध्ये लिहिला गेल्याचे मानले जाते. त्यांचा दुसरा ग्रंथ 'अनुभवामृत' किंवा 'अमृतानुभव' होय. हा विशुद्ध तत्त्वज्ञानाचा, जीव-ब्रह्म ऐक्याचा ग्रंथ आहे. सुमारे ८०० ओव्या (दहा प्रकरणे) या ग्रंथात आहेत. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने हा श्रेष्ठ ग्रंथ आहे. चांगदेव पासष्टी' या ग्रंथाद्वारे त्यांनी चांगदेवांचे गर्वहरण करून त्यांना उपदेश केला. चांगदेव हे महान योगी १४०० वर्षे जगले असे मानले जाते. पण त्यांचा अहंकार गेला नव्हता. यासाठी संत ज्ञानेश्वरांनी उपदेशपर लिहिलेले ६५ ओव्यांचे पत्र म्हणजे चांगदेव पासष्टी हा ग्रंथ होय. यात अद्वैतसिद्धान्ताचे अप्रतिम दर्शन आहे. संत ज्ञानेश्वरांचा 'हरिपाठ' (अभंगात्मक, २८ अभंग) हा नामपाठ आहे. यात हरिनामाचे महत्त्व सांगितले आहे.




# चोरीचा सात लाख 75 हजारांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** वैजापूरात पोलिसांनी दमदार कामगिरी केली असून सात लाख 75 हजाराचा मुद्देमाल हस्तगत करत यात शिवूर येथील दोन चोरट्याना ताब्यात घेतले आहे.

सविस्तर माहिती अशी की शिवूर परिसरात विद्युत पंप, पीटर, स्टार्टर, मोटार सायकल गुन्ह्याच्या तपासात शिवूर पोलिसांना त्यांच्या सूत्राकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन जणांना ताब्यात घेत खाकी विचारपूस करता शिवूर येथीलच विशाल पगार व ऋषिकेश हारदे यांनी चोरी केल्याची कबुली दिली असून त्यांच्या ताब्यातून चाळीसगाव, नांदगाव, येवला, वैजापूर या ठिकाणाहून नऊ मोटारसायकल, एक बुलेट, 6 विद्युत पंप , 3 पिटर, 5 स्टार्टर असा चोरी केलेला एकूण सात लाख 75 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पुढील तपास शिवूर पोलीस करत आहे.

# कौटुंबिक वादातून खून, दोन तासात आरोपी जेरबंद

## श्रीरामपूर पोलिसांनी केली मदत

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** आज संध्याकाळी ५च्या सुमारास वाळूज परिसरातील इसारवाडी फाट्यावर कुऱ्हाडीचे वार करुन खून करणाऱ्या आरोपीला वाळूज पोलिसांनी श्रीरामपूर पोलिसांच्या मदतीने दोन तासात जेरबंद केले. बाबासाहेब छबूराव खिल्लारे( ३४ ) धंदा ड्रायव्हर असे मयताचे नाव आहे.तर सचिन शामराव नाटकर( २४ )हा आरोपी आहे. दोघेही भोकर ता. श्रीरामपूर येथील रहिवासी आहेत.दहा वर्षांपूर्वी सचिन नाटकर च्या बहीणीचे मयत बाबासाहेब खिल्लारे शी लग्न झाले होते. पण खिल्लारे ला सोडून नाटकरची बहीण निघून गेली होती. त्याचा राग सचिन नाटकरच्या मनात होता. सध्या हुरड्याचा मौसम असल्यामुळे मयत बाबासाहेब खिल्लारे भाऊ भावजायी सोबंत इसारवाडी फाट्यावर हुरडा विकत होता. त्या ठिकाणी आरोपी सचिन नाटकर ने येत बाबासाहेब खिल्लारेचा कुऱ्हाडीने मानेवर व डोक्यावर वार करुन खून केला.व पळून गेला. हा प्रकार वाळूज पोलिसांना कळल्यावर घटनास्थळी पोलिस निरीक्षक सचिन इंगोले, एपीआय ढोले यांनी धाव घेतली. आरोपीला प्रत्यक्ष खून करतांना खिल्लारेच्या भाऊ भावजायी ने पाहिले असल्यामुळे त्यांनी पोलिसांना घटनाक्रम सांगितला.पोलिस निरीक्षक सचिन इंगोले यांनी नगर गुन्हेशाखा व श्रीरामपूर पोलिसांना खून करुन आरोपी मोटरसायकलवर तिकडे निघाल्याची माहिती दिली. नगर व श्रीरामपूर पोलिसांनी नाकाबंदी केली होती शेवटी श्रीरामपूर पोलिसांनी आरोपी ताब्यात घेत वाळूज पोलिसांना कळवले.वाळूज पोलिसांनी श्रीरामपूरला जात आरोपी ताब्यात घेतला.या प्रकरणी पुढील तपास एपीआय ढोले करंत आहेत.

# लेणीसाठी लवकरच१२ इलेक्ट्रॉनिक बस

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर जवळ असलेली जगप्रसिद्ध



अजिंठ्याच्या लेणीत आता इलेक्ट्रिक बसेसद्वारे पर्यटकांना प्रवास घडणार आहे. त्यासाठी सोयगाव आगाराला १२ इलेक्ट्रिक बस मिळणार असल्याची माहिती सोयगाव आगार प्रमुख हिरालाल ढाकरे यांनी दिली. इलेक्ट्रिक बस चार्ज करण्यासाठी अजिंठ्याच्या लेणीत एक पॉवर स्टेशन उभारण्यात येणार आहे. जागेचा अंतीम निर्णय अद्याप बाकी असून सोयगाव आगारात एक चार्गिंग स्टेशन व एक सी एन जि स्टेशन प्रस्तावित असल्याचे आगार प्रमुख हिरालाल ठाकरे यांनी न सांगितले. नवीन वर्षात फेब्रुवारीनंतर अजिंठ्या च्या लेणीत इलेक्ट्रिक बस प्रदूषणमुक्त बस अजिंठा लेणीत प्रदूषणमुक्त बस चेन्नई येथून १५ बस मागवल्या होत्या व त्या बस येथे चालवल्या जात होत्या. कालांतराने त्या खराब झाल्या. त्या बसच्या जागी महामंडळाने नियमित एसटीबस वापरण्यास सुरुवात केली होती. महागडी वाहने वाहनतळावर उभी करन प्रदूषणाच्या नावाखाली एसटीच्या बसमध्ये प्रवास करावा लागत असल्याने याबाबत पर्यटकांत नाराजी आहे.धावणार असल्याचे त्यांनी सांगितले. संख्येने भेट दिली. सोमवार सुट्टीचा दरम्यान, तत्कालीन पर्यटन मंत्री दिवस वगळता शनिवारी दि. २५ ते आदित्य ठाकरे यांनी लेणीसाठी इले- मंगळवारी दि. २७ /१२/२२ रोजी या कालावधीत इलेक्ट्रॉनिक बसची घोषणा केली होती. सोयगाव आगाराला नऊ लाख, साठ हजाराचे उत्पन्न मिळाले डिसेंबर अखेरीस चार दिवसांत उत्पन्न मिळाले असल्याचे सांगण्यात आले आहे.



# सामूहिक तबला व हार्मोनियम वादनाने नववर्षाचे स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** स्थानिक चनखोरे कॉलनीत सामूहिक तबला, हार्मोनियम वादनाने व शास्त्रीय गायनाने नववर्षाचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री गुरुदेव संगीत विद्यालयाच्या तबला, हार्मोनियम व गायनाच्या साधकांचा प्रतिसाद मिळाला. मेहकर शहरातील चनखोरे कॉलनीत असलेल्या श्री गुरुदेव संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून 31 डिसेंबर रोजी सामूहिक तबला वादन , हार्मोनियम वादन व शास्त्रीय गायन करून नवीन वर्षाचे स्वागत करण्यात आले आहे.

यामध्ये अथर्व रोडसमुद्रे, प्रणम्य जकाते, यथार्थ खिल्लारी, निरीक्षा जोशी, देवेश देशमुख, वेदांत चाकोते, प्रीती जोशी, शुभांगी लोंढे, यजुर्व राईतकर, ओमकार भाले, साईशा जोशी आणि गीता राईतकर या संगीत साधकांनी वादन व शास्त्रीय गायनात सहभाग घेतला होता.

यावेळी ताल दादरा, ताल केरवा, ताल तिनताल आदी तालाचे वादन व भूपाळी, देश आणि दुर्गा रागाचे शास्त्रीय वादन व गायन करण्यात आले. या सर्व विद्यार्थ्यांना संगीत आचार्य रत्न भगवान राईतकर व गीता राईतकर यांचे मार्गदर्शन लाभले.






# सांस्कृतिक राजकारण



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**मनुष्यमात्रांच्या कल्याणासाठी, सुखी आणि संपन्न आयुष्य प्रदान करण्यासाठी आणि निरोगी, निरामय तसेच सुरक्षित आयुष्य प्रदान करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन केलेली कृती म्हणजे राजकारण असे ढोबळमानाने म्हणता येईल. विशेषतः आधुनिक जीवनमूल्ये स्वीकारानंतर सर्वांठायी समत्वबुद्धी ठेऊन कार्य करणे अवश्य असते. आपणांस कोणी चांगले म्हणावे म्हणून नाटकीपणे चांगल्याचा आव आणणे वेगळे आणि अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी या संतोक्तीप्रमाणे चांगले असणे निराळे. इतर कोणत्याही व्यवस्थेपेक्षा लोकशाही निश्चितच चांगली, परंतु त्याअंतर्गत चालणारे सांस्कृतिक राजकारण मात्र अखिल मानव्यपूरक आहे का? हा खरा प्रश्न आहे.**

आपण ज्या काळात अस्तित्वात असतो तो काळ चांगला किंवा वाईट या रीतीने कसेही वर्णन करता येईल. प्रश्न केवळ काळाचा किंवा विश्लेषणाचा नसून मानवी प्रगतीच्या भौतिक-अभौतिक स्थितीचा आहे. हेही दिवस जातील, या वाक्याप्रमाणे काळ तर मोठा कठीण आला, हे वाक्य आपण कोणत्याही काळासाठी वापरू शकतो. भौतिक प्रगती आज किंवा उद्या काळसुसंगतपणे होईल. राजकारणाचा मोठा भाग त्याकडे लक्ष देऊन असतो. सामान्य माणूसही रस्ते, वीज, पाणी, दवाखाने, शिक्षणाच्या आणि दळणवळणाच्या पुरेशा सोयी असतील आणि आटोक्यात असणारी महागाई असेल तर फार आकांडतांडव न करता जीवन व्यतीत करण्यात मशगुल असतो. चाणाक्ष राजकारणी नेमका याच गोष्टींचा फायदा उचलू शकतात. प्रमाणशीर इतिहासापेक्षा लोकस्मृतींना आवाहन करून हव्या तशा स्मृती निर्माण करण्याचे आणि त्यांचा फैलाव करण्याचे गुपीत तर कधी उघड कटकारस्थान होत असते.सत्ता मिळवणे आणि मिळालेली सत्ता टिकवणे या दोन्ही गोष्टी भिन्न आहेत. काहींना फक्त सत्ता मिळते पण टिकवता मात्र येत नाही. कारण ती सत्ता टिकविण्यासाठी ज्या काही युक्त्या-प्रयुक्त्या करायच्या असतात त्या ही मंडळी करत नाहीत

किंवा त्यात कमी पडतात. ही गोष्ट चांगली की वाईट हे त्या त्या काळानुसार ठरत असले तरी, समाजाच्या विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जोपासण्यासाठी सत्तापक्ष नेहमीच सांस्कृतिक क्षेत्रात हस्तक्षेप करताना दिसतात. प्रस्थापित व्यवस्थेला धोका पोहचू नये किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या बहुसंख्याकांना आपलेसे करण्यासाठी संस्कृतीचा वापर आयुधांसारखा करणे हे सत्तापक्षाला काही नवीन नसते. समाजात जेव्हा चंगळवाद आणि तांत्रिकता वाढत जाते तेव्हा कोणत्याही सरकारला शासन करणे सोपे होत जाते. कारण जनमानसाला एका भ्रममूलक अवस्थेमध्ये जगायची सवय यामुळे वाढीस लागते. जनतेच्या हिताच्या नावाखाली अनेक अनुत्पादक गोष्टी त्याआडून करता येतात. या माध्यमातून स्वकमाई आणि स्वार्थ साधता येतो, हे हेरले जाते. वैयक्तिक स्वार्थपरायणता सामाजिक गैरमार्गाने साधणे हे एकमेव उद्दिष्ट होऊन बसते. तोमासो कंपानेला हा एक इटालियन तत्त्वज्ञ होऊन गेला. त्यांच्यावर प्लेटोच्या आदर्श राज्याचा भरपूर प्रभाव होता. कंपानेला म्हणतात की, वैयक्तिक संपत्ती संचय हा सामाजिक विकासासाठी सर्वात मोठा अडसर ठरतो. त्यासाठी व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या वाढीची सर्व जबाबदारी शासनाने उचलली पाहिजे. या प्रकारच्या साम्यवादी विचारांच्या कंपानेलाचा प्रभाव पुढे चालून ग्रामशीवर पडला. अंतोनिओ ग्रामशी यांच्या विचारांचे नावीन्य म्हणजे मार्क्सवादाला सांस्कृतिक परिप्रेक्षाची दिलेली देण होय. आपल्या कारावासातील वास्तव्यात ग्रामशीने सांस्कृतिक अंगाने समाजाचे विश्लेषण मोठ्या प्रमाणात केले आहे.

जवळपास तीन हजार पृष्ठांच्या लेखनातून समाजाची व शासनाची सांस्कृतिक अंगाने चिकित्सा केली आहे. सभ्यता आणि संस्कृतीचा प्रवाह अखंडपणे खळाळता असावा असे आपण म्हणतो. त्यात बहुसंख्यांकांची किंवा जेत्यांची संस्कृती हे छुपेपणे अंतर्भूत असते. आधुनिक काळात ज्यांना आपण माध्यमे म्हणून संबोधतो त्या वर्तमानपत्र, दूरचित्रवाणी सारख्या माध्यमातून तसेच समाजमाध्यमांतून शासन आपणांस हवे तसे जनमत तयार करू शकते. सांस्कृतिक राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सपाटीकरण होय. प्रत्येक प्रांताची, भाषेची, लोकव्यवहाराची एक रीत असते, परंतु राजकारणाच्या सोयीसाठी त्याचे एकरेषीकरण




करण्यावर सांस्कृतिक अधिसत्तेचा भर असतो. यावर एकमेव उपाय म्हणजे शिक्षण. कंपानेला यांनीही शिक्षणास अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. आपल्याकडे महात्मा फुले यांनी देखील शिक्षणास फार महत्त्व दिल्याचे आपण पाहतो. या द्रष्ट्या महानुभवांस शिक्षणाचे महत्त्व माहीत होते. शिक्षणाने विवेकवादी विचार वाढला पाहिजे, बुद्धिवादी विचार वाढला पाहिजे. आपल्या कार्यासाठी शारीरिक श्रमापेक्षा बुद्धीचा वापर करणाऱ्यास आपण बुद्धिवादी म्हणतो. खरेच शिक्षणातून बुद्धिवाद वाढतो का? परोपजीवी कारकुनी बुद्धिवाद आणि स्वयंसिद्ध सर्जनशील बुद्धिवाद यात फरक करावा लागेल. शासन सर्वांना शिक्षण देताना ते यापैकी कोणत्या प्रकारचे शिक्षण देते यावर आपले सांस्कृतिक पुढारलेपण अथवा मागासलेपण अवलंबून असते. सर्वांना मोफत शिक्षण दिले तर समाजाच्या हिताचे होईल पण विशिष्टांच्या दूरगामी दृष्टीने गैरसोयीचे होईल. मग अशावेळेस शासन शिक्षणाच्या बाजारीकरणावर भिस्त ठेवते. पैशाअभावी सामान्य जनतेची मुले दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहतात. अशा शिक्षण व्यवस्थेतून फक्त परोपजीवी कारकुनी बुद्धिवाद विकसित होऊ शकतो, जो की कोणत्याही काळात, कोणत्याही व्यवस्थापकांना हवा असतो. प्रयत्नपूर्वक समाजाची चौकट टिकवून ठेवणे आणि त्यापायी कुछ लोग मरते है तो मरणे दों, कुछ बसे जलती है तो जलने दों याप्रकारची वृत्ती वाढीस लागते. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर राष्ट्राचे म्हणून एकसामायिक ध्येय आपल्यासमोर असायला पाहिजे होते, ते किमान तयार करणे गरजेचे होते, ते आम्ही करण्यात असफल ठरलो आहोत. कुटूंबातील सदस्यांना काही कामे नसतील तर वाद-कलह वाढतात, त्याप्रमाणेच देशाचेही आहे. देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी सांस्कृतिक एकोपा टिकवून ठेवणे, सामाजिक दुरी वाढविणाऱ्या सांस्कृतिक एककांची हद्दपारी आपणांस एक भारत - अखंड भारत घडविण्यास मदत करणारी ठरू शकते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

# २०२३ चे स्वागत करताना



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**बदल हा निसर्गाचा नियम आहे, तो सर्वांना मान्य करावाच लागतो. याच निसर्ग नियमानुसार २०२२ ला निरोप देण्याची आणि नवीन वर्षाचे स्वागत करण्याची वेळ आता जवळ येऊन ठेपली आहे. भारत शकांचा, मन्वन्तरांचा, तसेच इसवींचाही सन मोठ्या उत्साहाने साजरा करतो. प्रारंभ म्हणजे सुरुवात! मागील चांगल्या-वाईट गोष्टींना मागे सारून नवीन होणाऱ्या सूर्योदयासोबत नवसंकल्पांचे अवलंब करणे, आपल्यासाठी नक्की काय चांगले हे पडताळणे, सत्याची कास धरणे, हे माझ्याकडून सुटणारच नाही ह्यापेक्षा खरंच याने माझी किती हानी होते ह्याचा विचार करायला हवा.**

आपण नवीन वर्षात नव्या उत्साहाने कामाला लागणे म्हणजेच नवीन वर्षाचे स्वागत. नवे वर्ष आले म्हटल्यावर त्याचे स्वागत आणि त्यानिमित्ताने संकल्प करणे देखील ओघाने आलेच. सरत्या वर्षाला निरोप देत नवीन वर्षाचे स्वागत करण्यासाठी सर्वांनी काहीना काही तरी प्लॅन्स केले असतील, आणि त्याच्या बरोबरीने नवीन वर्षामध्ये काय करायचे याचा संकल्पही केला असेल.. तसे पाहता प्रत्येकाचा नववर्षाचे स्वागत करण्याचा दृष्टीकोन वेग-वेगळा असतो..पद्धती वेगळ्या असतात..

हा ज्याच्या त्याच्या संतोषाचा आणि समाधानाचा भाग आहे. नववर्षाचे स्वागत देवापुढे निरंजनी लावून परिवारासमवेत करायचे कि..मद्यालयात बेधुंद होवून करायचे. याविषयी उपदेशाचे डोस पाजण्याइतपत समाज अज्ञानी नाही. परंतु नववर्षाचे स्वागत सामाजिक जान-भान जपून उत्साहपूर्ण वातावरणात केले गेले पाहिजे. पाश्चात्त्यांचे अंधानुकरण करण्याच्या नादात आपण आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य विसरून आपल्या जीवनरचनेत न शोभणारे कृत्य तर करत नाही ना? याचा जरा गंभीरपणे विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. २०२२ ला निरोप देताना सर्वांच्याच मनात संमिश्र भाव-भावना असतील! सरत्या वर्षात घडलेल्या चांगल्या-वाईट गोष्टींच्या आठवणीने मन कातर होत असेल. तर नवीन आशा घेवून येणाऱ्या नववर्षाबद्दल कमालीचे कुतूहल आणि तितकीच अनामिक भीती सुद्धा वाटते. पण जुने जावू द्या मरणालागुनी जाळून किंवा पुरून टाका; या कवितेच्या ओळीप्रमाणे सर्व भावना दूर करून नव्या उत्साहाने नववर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधीलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याची व विधायक कामाला बळ देण्याची जबाबदारी तुमची-आमची आणि सर्वांचीच आहे. याची जान व भान ठेवण्याचा संकल्प आपण सर्वांनी या नववर्षाच्या निमिताने करायला हवा. आताच्या या प्रगतीशील, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात माणूस खूप प्रगत झाला... पण तो या प्रगतीच्या नादात एखाद्या मशीनप्रमाणे वागु लागला आहे. आजुबाजुच्या परिस्थितीचा कसलाही विचार न करता क्षणिक सुखाच्या मागे धावत आहे. संवेदना, माणुसकी हे शब्द त्याच्या शब्दकोशातून हरवू पाहत आहे. त्यामुळे येणाऱ्या वर्षी माणूस म्हणून जगण्याचा आणि माणुसकीच्या नात्याने आपापल्या




कुवतीनुसार गरजवंतांना मदत करण्याचा संकल्पही आपल्याला करता येईल. छोटे - छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठे फायदा करुन देणारे ठरत असतात. संकल्प करायचा तर काय करायचा याचा विचार करताना मनात आले, की आपण आपले आर्थिक नियोजन आणि व्यवस्थापन किमानपक्षी नीट केले पाहिजे. स्वतःसाठी म्हणून काही वेळ, उसंत काढण्यासाठी दिवसाच्या चोवीस तासांचे काही गणित मांडले पाहिजे आणि ते अमलातही आणले पाहिजे. एवढे करू शकलो, तर वर्षारंभाच्या पहिल्या दिवसासारखाच आनंद देऊ शकणारे अनेक दिवस वर्षभरात आपल्याला भेटत राहतील ! प्रत्येक युगाचा, शतकाचा, वर्षाचा दिवस आपल्याला हेच तर सांगत असतो, की अरे बाबा, मागचं वाईट सगळं विसर, उपवास, दानधर्म, प्रार्थना याहून अधिक चांगले कृत्य म्हणजे तू सतत क्षमाशील राहा आणि एकमेकांशी सख्य करून आपसातील कलह संपवून टाक आणि नवीन वर्षात सत्याची, श्रमाची, तेजाची कास धर. तू जसा नववर्षाच्या स्वागत प्रसंगी प्रसन्न राहशील तसा वर्षभर निरभ्र अंतःकरणाने झळाळत रहा..! या सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी देशभरात जोरदार तयारी सुरु आहे. नवीन वर्ष साजरे करण्यासाठी आपल्या जवळच्या माणसांसोबत अनेकांनी खास प्लॅनही आखले आहेत. मात्र, सर्वांनाच भेटून नववर्षाच्या शुभेच्छा देणं शक्य होत नाहीये. सोशल मीडिया आणि टेक्स्ट मेसेजच्या माध्यमातून तुम्ही तुमच्या शहराबाहेर असलेल्या नातेवाईकांना, मित्रांना नववर्षाच्या शुभेच्छा पाठवू शकता. काळ बदलून काही होत नाही तर विचार बदलले तेंव्हाच समाज बदलत असतो त्यामुळे या वर्षात आपल्या आचारात आणि विचारात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संकल्प करून या नवीन वर्षाला सामोरे जावू या !


# नवी आशा

आधुनिक केसरी



कविता चव्हाण
संपर्क क्र. 9370062031

नविन आशा नवी उमेद सोडून सारे तुझे माझे करू या स्वागत 2023 चे 2022 वर्ष जरी संपले असले तरी काही लोक अजुन त्याच मागे संपत गेलेल्या वर्षातच जगत आहे हा असा बोलला तो तसा बोलला मागच्या गोष्टी धरुन ठेवण्यात काही अर्थ नसतो ज्या अपेक्षा आपण लोकांकडून करतो तिथे स्वताच्या चूका हि एकदा पड़ताडून पाहण आवश्यक आहे अरे तो तसा बोलला तर तुही काही शांत नसला बसणार आपल्या मनाप्रमाणे समोरच्या व्यक्तिने वागावे असा विचार करनेच मुळात चुकीचेगेलेल्या मागील वर्षात तुला जे प्रेमाने वागता आले नाही ते तू हयाँ नवीन वर्षात वागण्याचा तरी एकदा प्रयत्न कर सर्वाच्या मनाचा विचार करत बसलास तर कस होईल आजकाल लोक कोणतीही गोष्ट करताना आधी लोकांचा विचार करतात म्हणून त्यांची प्रगती होत नाही अशी कितिक वर्षन वर्ष निघून गेलित पण अजूनही लोकांचाच विचार होतोय आता तरी आपले विचार बदला जग कुठे चालल आणि तुम्ही अजुन तिथेच आहात वेळेबरोबर चालन लोकांना का मंजूर नसत काय माहीत चांगली शिकलेली सवरलेली लोक पण विचार मांगस लेले काय उपयोग तुमच्या एवढ्या शिक्षणाचा फेकून दया ती डिग्री ती डिग्रीची जागा कचरापेटी आहे, अशे कितीतरी वर्ष निघून जातील नवीन वर्ष येतील पण नवीन विचार कधी लोकांच्या मनात येणार नाही अजूनही एकविसाव्य शतकात जगत आहेत तुमचा जमाना गेला आता नवीन पिढ़ी लागली तरी मागच्या आपल्या जमान्यच्या गोष्टी सांगतात आणि तशी अपेक्षा आपल्या मुलांकडून ठेवतात कि मुलांनी असेच वागावे हेच करावे एवढ पण नको न आता तरी या नवीन वर्षात स्वताचे विचार परिवर्तन करा आणि 2023 वर्षात सर्वांच्या चेहऱ्यावर हसु बघा..... कदाचित है नवीन वर्ष कोणाच अपूर्ण स्वप्न असेल, कोणाची नोकरी असेल, असे खूप काही जे गेल्या वर्षात मनात राहिलेले ते हयाँ र्षी पूर्ण व्हावे हि सद्गुरु चरनी प्रार्थना..




हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट पेले



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**केवळ फुटबॉलमध्येच नाही तर जागतिक क्रीडा क्षेत्रात जिवंतपणीच आख्यायिका बनलेले फुटबॉलचे महान खेळाडू, फुटबॉल सम्राट पेले यांचे गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धपकाळाने निधन झाले. फुटबॉल सम्राट पेले हे आतापर्यंतचे सर्वश्रेष्ठ फुटबॉलपटू आहेत. केवळ फुटबॉल खेळणाऱ्या खेळाडूंसाठीच नव्हे तर सर्वच खेळातील खेळाडूंसाठी देवासमान असलेले पेले यांचे मूळ नाव एड्सन आरंतेस दो नासिमेंतो असे होते मात्र पेले याच नावाने जग त्यांना ओळखत असे आणि त्यांनी हेच नाव अजरामर केले. २३ ऑक्टोबर १९४० रोजी ब्राझीलमधील ट्रेस कोराकोसा येथे एका गरीब कृष्णवर्णीय कुटुंबात जन्मलेल्या पेलेंना लहानपणापासून फुटबॉलची आवड होती.**

त्यांचे वडील डोंनींडि न्हो हे एका स्थानिक क्लब साठी फुटबॉल खेळायचे. पेले यांनी लहानपणीच आपल्या वडिलांचा खेळ पाहिला होता त्यामुळे त्यांनीही वडिलांप्रमाणेच फुटबॉल खेळण्याचा निश्चिय केला आणि लहान वयातच ते फुटबॉल गाजवू लागले. त्यांचे फुटबॉलमधील कौशल्य पाहून त्यांना वयाच्या १६ व्या वर्षीच सेंटोसा क्लबकडून खेळण्याची संधी मिळाली. हा क्लब ब्राझीलमधील नामांकित क्लब म्हणून ओळखला जातो. या क्लबमध्येच फुटबॉलच्या या हिऱ्याला पैलू पाडण्यात आले. या क्लबकडून पेले यांनी असे प्रदर्शन केले की वयाच्या १६ व्या वर्षीच त्यांचे जगभर नाव झाले. क्लब फुटबॉल गाजवल्याने लवकरच त्यांची ब्राझीलच्या मुख्य संघात निवड करण्यात आली. पेले हे नेहमी फॉरवर्डला खेळत असत. फॉरवर्डला खेळणाऱ्या पेलेंच्या पायाचे आणि गोलचे नातेच जुळले होते. त्यांच्या पायाशी फुटबॉल आला की त्याला दोन्ही पायांनी खेळवत हरिणाच्या चपळाईने प्रतिपक्षाचा बचाव भेदत त्याला गोलच्या चौकटीत पाठवून देत. पेले यांनी जेंव्हापासून ब्राझीलच्या राष्ट्रीय संघाकडून खेळायला सुरवात केली तेंव्हापासून ब्राझील ही फुटबॉलमधील महाशक्ती म्हणून उदयास आली. पेले यांच्यामुळेच ब्राझीलने १९५८, १९६२, १९७० असे तीन विश्वचषक जिंकले. या तिन्ही विश्वचषक स्पर्धेत पेले यांनी अद्वितीय कामगिरी केली. पेले यांच्या नावावर अनेक विक्रम आहेत. पेले यांनी खेळलेल्या ७७ आंतरराष्ट्रीय सामन्यात ९२ गोल केले आहेत. हा एक जागतिक विक्रम आहे, जो अजूनही कोणत्या खेळाडूला मोडता आला नाही. विश्वचषक स्पर्धेतही त्यांनी १४ गोल केले आहेत. त्यांनी त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत एकूण ७७५ हुन अधिक गोल केले आहेत. सर्व प्रकारच्या फुटबॉल स्पर्धेत त्यांनी १२८१ गोल केले आहेत. त्यांच्या या कामगिरीची नोंद गिजीज बुक वर्ल्ड रेकॉर्डने देखील घेतली आहे. १९५७ साली आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण करणाऱ्या पेलेंनी आपला अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना १९७७ साली खेळला. म्हणजे जवळपास २० वर्ष त्यांनी आंतरराष्ट्रीय फुटबॉलवर हुकूमत गाजवली होती. दोन दशके फुटबॉलवर अधिराज्य गाजवणाऱ्या या महान खेळाडूची २० व्या शतकांतील सर्वोत्तम खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. ब्रिटनच्या राणीने त्यांना सर हा किताब देऊन त्यांचा गौरव केला असून युनिस्कोने त्यांची शांतता दूत म्हणून नेमणूक केली. ब्राझीलच्या अध्यक्षांनी त्यांचे वर्णन ब्राझीलचा खजिना असे केले होते. फुटबॉलप्रेमी मात्र त्यांना द किंग याच नावाने संबोधित असत. हो ते राजेच होते. केवळ राजे नव्हे तर सम्राट होते. फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट. त्यांच्या निधनाने केवळ फुटबॉलवरच नव्हे तर संपूर्ण क्रीडा विश्वावर मोठी शोककळा पसरली आहे. फुटबॉलचे अनभिषिक्त सम्राट पेले यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



# मागे वळून पाहताना....2022

**(मागील अंकावरून)**

डळमळीत असण्याचे कारण म्हणजे केवळ भ्रष्टाचार हे असू नये. त्याकरता ह्यात भ्रष्टाचाराला थारा नसावा तरच आणि तर ते शक्य आहे आज शासन प्रशासनात भ्रष्टाचार कसा चालला हे गेल्या काही दिवसात समोर आलेच आहे न्यायव्यवस्थेवरील साशंकता व्यक्त केली जाते तर प्रसारमाध्यमे ही सुद्धा सरकारी अधिपत्याखाली काम करत असलेचे सतत बोलले जाते यात सत्यता काय आहे हे जनतेने माहीत करून घेणे तेवढेच आवश्यक आहे. 2023 नववर्षाच्या आधी2022 चे शेवटी शेवटी कोरोनाची आगमन होते की काय अशा बातम्या येऊ लागले आहेत. काही बातम्या गंभीर स्वरूपाच्या तर काही आपल्या देशाला त्यापासून धोका नसल्याचे म्हटल्याच्या आहेत. आता परत वेळ आली आहे की शासनाने याबाबतीत योग्य तो अहवाल जनते समोर द्यावा आणि अशा ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या बातम्या प्रसारित होत आहेत त्यांना आळा घालावा म्हणजे त्यातील सत्यता समोर येईल अर्थात कोरोना यायला नकोच त्यासाठी जी काही महत्त्वाची पथ्य/ सुचना आहेत ती जनतेने पाळणे आवश्यकच आहेत तर अशा रोगाच्या संसर्गाला आपण टाळू शकू.

सरकार कायदे बनवते पण त्याच्या अंमलबजावणीचा अभाव असतो. आजही आपण बघतो प्रदूषण, पर्यावरण, प्लास्टिक वापर, भ्रष्टाचार, स्त्री अत्याचार, विषयक कायदे आहेत पण त्याची अंमलबजावणी होत नाही याची एकमेव कारण म्हणजे भ्रष्टाचार. आजही बाजारपेठेत प्लास्टिकचा वापर सुरू आहे गुटख्यावर बंदी असून नाव बदलून विक्री सुरू आहे. लाखो रुपयाचा गुटखा पकडला जातो. 2023 वर्षात प्रवेश करत असताना महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, स्त्रियांवरील अत्याचार, आरोग्य विषयक समस्या, भ्रष्टाचार, या गोष्टींना कुठेतरी आळा घातला गेला पाहिजे आणि त्या दृष्टीने सरकारने पाऊल उचलायला हवीच व सर्व जनतेने त्यांना साथ द्यायला हवी.

आपण स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला. बरोबर तिरंगा अभियान राबवले पंतप्रधानांनी भ्रष्टाचार मुक्त भारत व्हावा ही अपेक्षा केली व जनतेची साथ मिळावी ही अपेक्षा केली.

2023 सालात भारतालाG-20 चा अध्यक्ष पद




मिळालेला आहे. जगातील प्रमुख विकसित आणि विकसनशील देशांचा हा राष्ट्रीय गट आहे एखाद्या जागतिक आर्थिक संकटाचा सामना करणारी प्रमुख देशांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे हा त्यामागील हेतू आहे. सरकार कोणतेही असो केवळ विरोधासाठी विरोध नसावा चांगल्या कारणासाठी जरूर विरोध करावा. आपल्या महापुरुषांविषयी बोलताना अतिशय संयमाने बोलावे त्यांच्या चुका न दाखवितात जे चांगले आहे ते स्वीकारून अनुकरण करावे केवळ भाषणा साठी फुले, शाहू, आंबेडकर, टिळक, सावरकर यांच्या नावाचा वापर करू नये हे महत्त्वाचे त्यांचे कार्याचा विसर मात्र कोणालाही न पडावा. कोणाच्याही धार्मिक भावना दुखविल्या जातील असे वर्तन नसावे किंवा आपल्या धार्मिक भावना जपताना त्याचा कुणाला त्रास होणार नाही हे सुद्धा लक्षात असू द्यावे .

मध्यंतरी निळू दामले यांचा एक लेख वाचण्यात आला त्यांनी म्हटले आहे "अमृत महोत्सवी वर्षात पाऊल ठेवलेल्या आपल्या देशात एक गोष्ट मात्र पूर्वी होती तशीच आहे. ती म्हणजे गरिबी इंदिरा गांधी यांनी गरिबी हटावचा नारा देऊन निवडणुका लढवल्या ,त्यानंतर त्यांच्याच काँग्रेस पक्षाचे नव्हे तर सगळ्याच पक्षांनी वेगवेगळी लेबल लावून घोषणा केल्या. रोप्यमहोत्सव, सुवर्ण महोत्सव, झाले, तरी गरिबी गेली नाही. कारण गरीबी संपावी अशी त्यांची मनोगत इच्छा नसते. पण गरिबी संपविता येत नाही असेही नाही. जगात अपवादाने का होईना गरिबी संपल्याची उदाहरणे आहेत. त्या देशाकडे पाहून काही शिकण्याचा प्रयत्न करायला हवा."

भ्रष्टाचार मुक्तीच्या आपण गप्पा मारतो पण खरंच भ्रष्टाचार निर्मूलन व्हावे असे किती जणांना वाटते ? जे सगळे वाद-विवाद स्पर्धा सुरू आहे ते सत्ता आणि पैशासाठीच आहे तेव्हा भ्रष्टाचार संपण्याची मुळातच मानसिकता तयार व्हायला हवी आहे.

निदान असा संकल्प आपण 2023 मध्ये प्रवेश करताना करूया. तूच एवढेच.

दिलीप देशपांडे
संपर्क क्र. ८९९९५६६९१७

# हिवाळ्यात प्या हेल्दी देसी गार्लिक सूप

आधुनिक केसरी

बदलत्या ऋतूमध्ये खोकला, सर्दी किंवा घसादुखीची समस्या खूप सामान्य आहे. हिवाळ्यात तुम्ही घरच्या घरी गरमागरम व्हेज गार्लिक सूप बनवून पिऊ शकता. या सूपमध्ये भरपूर फायबर आणि पोषक घटक असतात. लसूणयुक्त हे सूप प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती मजबूत होते. अशा परिस्थितीत गार्लिक सूप तुमच्यासाठी खूप प्रभावी आहे. अशा परिस्थितीत तुम्ही लसूण सूप बनवून पिऊ शकता. चला तर जाणून घेऊया गार्लिक सूप रेसिपी. **साहित्य :** काळी मिरी संपूर्ण आणि पावडर, लसूण, दालचिनी, हिरवी धणे, आले, तूप, हिंग, जिरे, कांदा, तीन ग्लास पाणी घ्या. **कृती :** सर्वप्रथम एका खोलगट नॉन-स्टिक पॅनमध्ये तेल गरम करा. आता लसूण पाकळ्या लसूण आणि 1 कप कांदा घालून मध्यम आचेवर 1 ते 2 मिनिटे परतून घ्या. हे सूप बनवण्यासाठी तुम्हाला 7-8 लसूण पाकळ्या लागतील. ते सोलून घ्या. एका भांड्यात तीन ग्लास पाणी घ्या, आता त्यात लसणाच्या ठेचलेल्या कळ्या, आल्याचा तुकडा, काळी मिरी, दालचिनी टाका. आता शिजू द्या. तुम्ही या गोष्टी बारीक करून पाण्यात टाकू शकता. यानंतर त्यांना मंद आचेवर शिजू द्या. आता त्यात मीठ टाका. चांगले शिजू द्यावे. जेव्हा ते चांगले शिजायला लागते आणि तुम्हाला प्रत्येक गोष्टीचा वास येतो तेव्हा ते गॅसवरून उतरवा. ते फिल्टर करा किंवा तुम्ही ते फिल्टर न करता पिऊ शकता. हिरवी धणे आणि काळी मिरी पावडर घालून सर्व्ह करा. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही तुपात जिरे आणि हिंग टाकूनही ठेऊ शकता. त्यामुळे सूपची चव वाढेल. ते पौष्टिक तसेच चवदार आहे. हे सूप मुलांनाही देता येईल, पण लहान मुलांना हे सूप कमी प्रमाणातच द्यावे. **गार्लिक सूपचे फायदे :** गार्लिक सूप प्यायल्याने शरीराला अनेक फायदे होतात. शरीराला भरपूर फायबर मिळते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. या प्रकारचे सूप प्यायल्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहते. तसेच सूप प्यायल्यानेही कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित राहते. गार्लिक सूप प्यायल्याने हृदयालाही खूप फायदा होतो.



# .. आणि ती लीला मावशी बनली



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**भारतात सिनेमा 1931 मध्ये बोलायला लागला. रामलीला, नाटक, नौटंकीमध्ये काम करणाऱ्या कलाकारांनासुद्धा वाटू लागलं की आपणही एक दिवस सिनेमात काम करू. उत्तर प्रदेशमधील जायस (जिथे पद्मावतचे रचनाकार मलिक मोहम्मद जायसी यांचा जन्म झाला होता.) मध्ये रामप्रसाद मिश्रा नावाचा असाच एक कलाकार होता. जमीनदार कुटुंबातील रामप्रसाद यांचा विवाह एका बारा वर्षाच्या लीला नावाच्या मुलीशी झाला होता. नवऱ्याने आपल्या बायकोलाही आपल्या रंगात रंगवून टाकलं होतं. ते तिला सिनेमाचे रीळ दाखवून आपल्याला यात काम करायचे आहे, असे सांगायचे. लीलाला कळायचं नाही की, या छोट्याशा रीळमध्ये तिचे शरीर कसे सामावेल?**



1934 मध्ये सिनेमा पाहणं, त्यात काम करणं याला समाजातला एक वर्ग चांगल्या नजरेने पाहायचा नाही. रामप्रसाद आपल्या पत्नीला घेऊन नाशिकला गेले. सिनेमात काम करायला महिला मिळत नव्हत्या. त्यामुळे रामप्रसाद यांना 150 आणि लीलाला 500 रुपये पगार महिन्याला फिक्स झाला. पण कॅमेरासमोर ॲक्टिंग करणं म्हणजे खायची गोष्ट नव्हती. ज्यावेळेला कॅमेऱ्यासमोर उभं राहण्याची वेळ आली तेव्हा, पती-पत्नीचे हात कापू लागले. ॲक्टिंग करायला आलं नाही, त्यामुळे कंपनीतून काढून टाकण्यात आलं. 500 रुपये महिना पगार मिळवण्याचं लीलाचं स्वप्न भंगलं.

सिनेमात काम करण्यासाठी आपलं गाव सोडून आलेल्या पती-पत्नीच्या पदरी निराशा आली. मग धीर एकवटून ते नशीब आजमवायला कोल्हापूरला पोहचले. काम मिळालं,पण तिथे दुसराच प्रश्न पुढे आला. जेव्हा हिरोच्या कमरेत हात घालून मी तुझ्याशिवाय जिवंत राहू शकत नाही असा डॉयलॉग बोलण्याची संधी आली, तेव्हा आपल्या नवऱ्यावर अतूट प्रेम करणारी लीला म्हणाली,मी विवाहित आहे आणि नवऱ्याशिवाय मी दुसऱ्या कुठल्या परपुरुषाला स्पर्शही करणार नाही. तेव्हा तो सिनेमाही हातचा गेला. लवकरच संधी मिळाली दादासाहेब फाळके यांच्या दिग्दर्शनामध्ये बनत असलेल्या गंगावतरणमध्ये. या चित्रपटात पार्वती बनण्याची संधी मिळाली. चित्रपट चालला आणि मग राम आणि लीला यांना धीर आला.

पण हिरो-हिरॉइन आणि रोमांटिक सीनशिवाय काम चालणार नव्हतं. होनहार ( 1936 ), मध्ये शाहू मोडक ( ज्यांनी 30 चित्रपटांमध्ये श्री कृष्णाची भूमिका केली आहे. ) यांची हिरॉइन बनली लीला. दिग्दर्शक होते जागीरदार. त्यांच्यासमोरदेखील ती रोमांटिक काम करणार नाही म्हटल्यावर जागीरदार भडकले. पण अडचण अशी होती की, कंपनीने करार केल्याने त्यांना नोकरीवरून काढून टाकता येत नव्हतं. शेवटी तोडगा असा निघाला की, लीलाला मोडक यांची आई बनवण्यात आलं. 18 वर्षांचे मोडक मुलगा आणि 28 वर्षांची लीला आई बनली. यानंतर मात्र त्यांची गाडी पटरीला लागली. जवळपास सहा दशकं लीलाने विविध चित्रपटांमध्ये आई आणि मावशीची भूमिका साकारली. 1975 मध्ये शोलेमधल्या टांगेवाली बसंतीची आई त्यांनी साकारली. या चित्रपटात मौसी हे संबोधन त्यांना मिळाले ते कायमचेच चिटकले. ते आजही कायम राहिले. चित्रपट आणि या सिनेसृष्टीबाबत काहीच माहित नसतानाही लीला मिश्रा यांनी सत्यजीत राय, राजकपूर, गुरुदत्त, गुलजार, रमेश सिप्पीसारख्या प्रसिद्ध फिल्मकारांसोबत काम केलं. त्यांच्याकडून त्यांना खूप काही शिकायला मिळालं. त्यांना पुढे आणायला त्यांचे पती रामप्रसाद यांचा सिंहाचा वाटा आहे. मात्र रामप्रसाद यांना फारसं कुणी ओळखत नाही.पण रामप्रसाद यांच्याशिवाय लीला जगासाठी लीला मावशी बनू शकली असती का ? लीला मिश्रा यांचा जन्म 1 जानेवारी 1908 चा तर मृत्यू 17 जानेवारी 1988 मध्ये झाला.

# मंदिर 'सरकारी'करणाचा काळा कायदा ?



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

आधुनिक केसरी

**भाजपा नेते व माजी खासदार डॉ.सुब्रमण्यम स्वामी यांनी महाराष्ट्रातील तीर्थक्षेत्र पंढरपूर भेटीत त्यांनी पंतप्रधान मोदी यांच्या कार्यकाळात मंदिराचे 'सरकारी'करण' होत असल्याचे आरोप केला. ते हिंदुत्ववादी नाहीत,असे म्हंटल्याचे वृत्त आहे.स्वामीजींचा सल्ला मोदी व शहा हे मानत नाहीत,ही त्यांची नाराजी आहे.त्यातून त्यांनी टीका केली असावी. स्वामींनी मोदी व भाजपाला 'घरचा आहेर"दिला आहे,असे म्हंटले गेले. पण त्यांनी मोदींच्या विरोधात वक्तव्य केल्याने प्रसार माध्यमांनी चांगली प्रसिध्द दिली.त्यांनी देशात १९४७ नंतर सरकारने एकही चर्च अथवा मशिद ताब्यात घेतली गेलेली नाही,असे जे म्हंटले,त्याकडे सर्वांनीच काणाडोळा केला.स्वामी हे जरी राजकीय नेते असले तरी, ते कायदेतज्ज्ञ आहेत,ते उगाच बोलले नाहीत!**

भारतातील मंदिराचे 'सरकारी'करण होतय काय? याचे उत्तर काँग्रेसने द्यावे! कारण काँग्रेस सरकारने 'हिंदु धर्म आणि धर्मादाय देणगी कायदा-१९५१ ( THE HINDU RELIGIOUS AND CHARITABLE ENDOWMENT ACT OF -1951 ) हा कायदा आणलेला आहे.या कायद्याच्या विरोधात देशभर आवाज उठत आहे.हा कायदा म्हणजे 'काळा कायदा' असल्याने तो रद्द करण्याची मागणी होत आहे.त्यात स्वामींचे हे वक्तव्य पुढे आलेले आहे.

भारतात मोगलानंतर इंग्रजांनी मंदिरांच्या खजिन्यावर ताबा मिळविला होता.इंग्रजांनी१८४० पासून मंदिराचा ताबा सोडण्यास सुरूवात केली. देशात २०११ च्या जनगणनेनुसार प्रार्थनास्थळाची संख्या सुमारे ३० लाख आहे.यात बहुसंख्य हिंदु मंदिरे आहेत.१९२३ मध्ये मद्रास धार्मिक देणगी बंदोबस्त कायदा होता.या कायद्यात अनेक सुधारणा गेल्या आहेत स्वातंत्र्यानंतर काँग्रेस सरकारने १९५१ मध्ये हिंदु धार्मिक व धर्मादाय देणगी कायदा आणला.त्यावेळी केंद्र सरकार धार्मिकस्थळांत हस्तक्षेप करत असल्याचा आरोप करत या कायद्याचा विरोध केला गेला. तरीही केंद्राने सरकारने हा कायदा अस्तित्वात आणला.तेंव्हा दिल्लीत झालेल्या धर्म परिषदेत संत,वकील,विचारवंत,आदींना कायद्याला विरोध केला. संत मंडळींनी हिंदु मंदिरात हस्तक्षेप करणारा काळा कायदा रद्द करावा, अशी मागणी केली होती. भारतात या कायद्यानुसार राज्य सरकारे ४ लाख मंदिरावर देखरेख करत आहेत.देशात इतर धर्माच्या प्रार्थनास्थळा- बाबत सरकारचे कोणतेही नियंत्रण नाही.आंध्र व तेलगंणा राज्यातील सुमारे ४० हजार मंदिरावर सरकारचे नियंत्रण आहे.तसेच महाराष्ट्र कर्नाटक,ओरिसा,राजस्थान,आदी राज्यातील प्रसिध्द मंदिरे आहेत. जगातील प्रसिध्द तिरूपती बालाजी मंदिर यातून सुटका झालेली नाही. महाराष्ट्रातील चार मंदिरे,त्यात पंढरपूरचे विठ्ठल रुक्मिणी मंदिर,शिर्डीचे साईबाबा,कोल्हापूरचे महालक्ष्मी, मुंबईच्या सिध्दी- विनायक मंदिराचा समावेश आहे.स्वातंत्र्यानंतर प्रथम १९५९ मध्ये तामिळनायडू मध्ये हिंदु धार्मिक व धर्मादाय देणगी बंदोबस्त कायद्याला मंजूरी दिली गेली.तेंव्हा या कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले होते.न्यायालयाने १९५१ चा कायदा बेकायदेशीर असल्याचे म्हंटले होते.तरहीत्या सरकारने मंदिरात कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती केली. देशात काँग्रेस सरकारने हा पहिला भेदभाव करणारा व घटनेतील धार्मिक स्वातंत्र्याला छेद देणारा कायदा आणला.या कायद्यानुसार राज्य सरकारांना मंदिरावर नियंत्रण ठेवण्याचे अमर्याद अधिकार मिळालेले आहेत.मंदिरात येणारा पैसा,मौल्यवान वस्तु,जमीन व इतर साधन सामुग्रीबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आहे. सरकारला मंदिरातील व्यवहार नियमीत करण्या- साठी न्यास अथवा स्वतंत्र विश्वस्त मंडळ नियुक्त करण्याचा अधिकार आहे. यातून मंदिराच्या विश्वस्त मंडळावर राजकीय नेते,मंत्री,सनदी अधिकारी आदींची वर्णी लावली जाते.यात धर्म,धार्मिक पध्दती,मंदिराचे पावित्र्य याचे सरकारला काही देणे- घेणे नाही.ॉ सर्वोच्च न्यायालयाच्या एका निर्णयानुसार राज्य सरकारलान्यास



अथवा स्थापित मंडळावर कोणाचे ही नियुक्ती करू शकते.मग डाव्या विचारसरणीचा,तसेच तथाकथित धर्मनिरपेक्षवादी,नास्तिक व्यक्तीची नियुक्त करू शकते.यात मुस्लिम, ख्रिश्चन धर्मीय व्यक्ती विश्वस्त मंडळाचा पदाधिकारी होऊ शकते. मागे कांही वर्षापूर्वी मुंबईच्या प्रसिध्द मंदिरावर एक राजकीय मुस्लिम नेता असल्याचे प्रकरण मुंबईच्या एका वृत्तपत्राने उजेडात आणलेले होते. शिर्डीच्या साईबाबा मंदिरावर संस्थानचे सदस्यासाठी भ्रष्ट राजकीय नेते धडपडत करत असतात.महाराष्ट्र सरकारने नियुक्त केलेल्या शिर्डी विश्वस्त मंडळावरील सदस्याचा वाद चर्चेत असतो.महाविकास आघाडीने या संस्थाच्या राजकीय व इतर सदस्यांची नियुक्ती केली होती.पण न्यायालयाने सरकारचा निर्णय रद्द ठरविला.देशातील पंधरापेक्षा अधिक राज्य सरकार मंदिर प्रशासकाची निवड आदीपासून आदी १८ टक्या- पर्यंत सेवा शुल्क वसूल करत असते. पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती- च्या अंतर्गत ३ सहस्त्र,६७ मंदिराचे व्यवस्थापन पहाते. प्रसिध्द बालाजी मंदिराच्या सुमारे ८५ टक्के पैसा राज्य सरकारच्या तिजोरीत जमा केला जातो,असा आरोप आहे.तो आरोप सरकारने नाकारला नाही.तसेच चारशे वर्षापूर्वी याच बालाजी मंदिराला राजा कृष्णदेवराय यांनी सुमारे ५० सहस्र कोटी रूपायांचे मौल्यवान हिरे, दागिने दिलेले गायब झाले.हे प्रकरण दडपविण्यासाठी नकली दागिन्याचा वापर होत आहे,असा आरोप आहे.कर्नाटक सरकारने मंदिरातून ७९ कोटीचा पैसा कमविले आहेत. तामिळनायडू सरकारने मंदिराच्या जागेवर इमारती उभारल्या असून यातून दरवर्षी सरकारला प्रतिवर्षी ३५ कोटी रुपये उत्पन्न मिळवित आहे. देशातील प्रसिध्द बालाजी मंदिराची वार्षिक उत्पन्न ६०० कोटी असून एकूण संपत्ती ५२ हजार कोटीची आहे.केरळमधील पद्मनाभन स्वामी मंदिराची संपत्ती१ लाख ३६ हजार कोटी आहे. >जम्मू- काश्मिर मधील वैष्णोदेवी मंदिराचे उत्पन्न ५०० कोटीचे उत्पन्न आहे. महाराष्ट्रातील शिर्डी येथील साईबाबा मंदिराला सुमारे ३६० कोटीची देणगी मिळते.मुबंईच्या सिध्दी विनायक मंदिराचे उत्पन्न ४८ ते १२५ कोटी इतके आहे.या मंदिरातील संपत्तीवर सरकारचा डोळा आहे.तेंव्हा माजी मुख्यमंत्री काँग्रस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केंद्र सरकारने मंदिराचा संपत्ती वापर करावा, अशी मागणी केली होती.यावरून बरेच वादळ उठले होते.तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिर संस्थानमध्ये कोट्यावधीचा गैरव्यवहार झाल्याचे प्रकरण असून यात ४१ जणांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याची शिफारस राज्य गुन्हे अन्वेशन विभागाने अहवालात केली होती.मुबंईच्या सिध्दीविनायक मंदिर गैरव्यवहार प्रकरणी माजी न्यायाधीश टिपणीस यांची चौकशी समिती नियुक्त केली होती.यात समितीने कोट्यवधीचा गैरव्यवहार झाल्याचे म्हंटले होते. हे प्रकरण थंड बस्त्यात पडले आहे. पंढपूरच्या मंदिर संस्थानची ३०० वर एकर जमीन घोटाळा झाला होता, नंतर ती जमीन परत मिळाली.तसेच शिर्डीच्या साईबाबा संस्थानच्या अपात्र सदस्यांच्या चौकशीचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले होते. शिर्डी संस्थानचे अनेक व्यवहार संशयास्पद असल्याचे लेखापरिक्षणाच्या अहवाल म्हंटले होते. कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर संस्थानात गैरव्यवहार झाल्याच्या असंख्य तक्रारी आहेत.यावरून महाराष्ट्रात मंदिर संस्थान मधील कोट्यवधी देणगीचा गैरवापर होतोय!तसेच मौल्यवान दागिने गायब होणे,जमीनी बळकाविण्याच्या घटना घडलेल्या आहेत. यावरून सरकारी व्यवस्थापन असलेल्या मंदिर संस्थानचा कारभार पारदर्शक नाही,तरीही राज्य शासन याबाबत कारवाई करत नाही.तर दुसरीकडे शेगाव गजानन महाराज संस्थानचा कारभार पारदर्शक आहे.रोजचा आर्थिक व्यवहार जनतेच्या माहितीसाठी रोज फलकावर लावला जातो. मंदिर परिसरात स्वच्छता, भक्तासाठी निवास,भोजनाची व्यवस्था आदी उत्तम प्रकारे केली जाते. मंदिराला देणगीचादुरूपयोग होतो,असे नाही. म अनेक मंदिर संस्थान- तर्फे धमार्थ रुग्णालय,गरीब कुटुंबाला वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक मदत केली जाते.मंदिरांनी देणगीचा उपयोग समाज सेवेसाठी,गरिबांच्या कल्याणासाठी वापरल जावा,देव माणसातही आहे.साने गुरूजी म्हणाले, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे'! हेच खर आहे!हिंदु धर्माची शिकवण आदर्श आहे,हे जगाला दाखवून द्यावे.

स्वातंत्र्यानंतर देशातील भेदभावाचे बीज कोणी पेरले?एकीकडे हिंदुच्या विरोधात कायदे तर दुसरीकडे धार्मिक स्वातंत्र्य म्हणून त्यांच्या समर्थनाथ कायदे केले गेले.यातून भेदभावाची दरी वाढत गेली.त्यात हिंदु धार्मिक व धर्मदाय देणगी कायदा १९५१ हा हिंदुच्या मूलभूत धार्मिक स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे.१९९१ मध्ये १५ ऑगस्ट१९४७ यावेळेस धार्मिक प्रार्थनास्थळे होती,त्यात कोणताही बदल करता येणार नाही,असा तो 'प्लेसेस ऑफ स्पेशल वरशिप स्पेशल प्रोव्हिजन ॲक्ट १९९१'हा कायदा केला. तत्कालिन गृहमंत्री शंकरराव चव्हाण यांनी आणला होता.देशात इतर कट्टर धार्मिक संघटना,हिंसक कारवायांना प्रोत्साहन देणे, यातून निष्पाप लोकांचा गळा चिरून बळी घेतला जात आहे. इतकेच नव्हे, देशाचे तुकडे करण्याची भाषा केली जात आहे. या कट्टर व हिंसक प्रवृत्तीच्या विरोधात बोलावयाचे नाही काय? त्याला उत्तर देणे,यालाही व्देष म्हंटले जाते,हा अजब तर्क आहे. भाजपाने हिंदु धर्माची इतर धर्माची तुलना करणे,चर्चा,वाद टाळले पाहिजे.काँग्रेस नेते जाणीवपूर्वक हिंदू विरोधी बोलत आहेत.पक्षाला पुन्हा मुस्लिम व्होट बँक मिळवायची आहे. काँग्रेस पक्षाने नेते गांधी यांनी ज्येष्ठ नेते ए.के अँटनी यांचा सल्ला घेतला पाहिजे. घटनेनुसार कलम २५ नुसार धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार आहे. तेंव्हा १९५१ चा कायदा हा मूलभूत अधिकाराचे उल्लंघन करणारा आहे.तेंव्हा हिंदु मंदिर संस्थानातील राज्य सरकारांचा हस्तक्षेप थांबवावा, मंदिराचे 'सरकारी'करण करू नये.केंद्रांने सरकारने तो कायदा रद्द करावा तो असंवैधानिक आहे,हाच स्वामींजींचा म्हणण्यामागचा अर्थ आहे.

# नवीन वर्षात आपण काय करावे ?



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**जसजसे नवीन वर्ष जवळ येत आहे तसतसे मनात हा विचार येतो की नये नवीन वर्षात काय करावे.? मागील वर्ष काहींसाठी सुंदर आठवणी तर काहींसाठी कटू अनुभव देऊन गेले. पण जे निघून गेले त्याचा फारसा विचार न करता आज आपण नवीन वर्षाच्या चांगल्या सवयींचा विचार करू आणि आपल्याला हे देखील माहित आहे की नवीन वर्षाची नवीन सुरुवात उत्साहाने करायला हवी. तुम्ही ऐकले असेल की नवीन वर्षाची सुरुवात आनंदाने आणि उत्साहाने केली तर संपूर्ण वर्ष त्याच उत्साहात आणि आनंदात जाते. एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की जीवनाच्या प्रवासात सुख-दुःख येतात आणि जातात, पण आपण थांबायचे नाही. जीवनाच्या या प्रवासात पुढे जात राहायचे आहे.**

तर यासोबत जुन्या वर्षाचा निरोप घेऊ या. त्या सर्व जुन्या आठवणींसह ज्या आपल्याला आठवायच्या नाहीत आणि येणारे वर्ष मनाला भिडणाऱ्या गोड आठवणींसह चांगले करण्याचा प्रयत्न करूया. आज मी नवीन वर्षाच्या अशाच काही चांगल्या सवयींबद्दल बोलणार आहोत, ज्याचा अवलंब करून आपण आगामी वर्षात स्वतःला अधिक सकारात्मक आणि प्रेरित करू शकाल. स्वतःला वेळ द्या पैसे कमवण्याच्या या धावपळीच्या जगात आणि या धकाधकीच्या जीवनशैलीत आपण आपले आयुष्य स्वतःसाठी सोडतो. नवीन वर्षात स्वतःला महत्त्व द्यायला शिका आणि आयुष्यातील प्रत्येक लहान-मोठ्या आनंदाचा आनंद घ्या. तुमच्या आयुष्यात कितीही चांगली वेळ आली, तुम्हाला ती वाटली तर तुम्हाला त्यांच्याकडून प्रेरणा मिळेल, ज्यामुळे तुम्ही उत्साहाने पुढे जाल. नवीन वर्षात वचन द्या की तुम्ही स्वतःला वेळ द्याल आणि येणारे वर्ष आनंदी राहाल.

**काहीतरी नवीन शिका**

हे आयुष्य आपल्याला प्रत्येक क्षणाला काहीतरी शिकवत राहते. आयुष्यातील प्रत्येक क्षण नवे अनुभव घेऊन येतो. मग ती घटना म्हणून असो किंवा व्यक्ती म्हणून. जगातली व्यक्ती कोणीही असली तरी त्याच्यात काहीतरी कमतरता नक्कीच असते, कोणीही परिपूर्ण नसतो. एखाद्याच्या चांगल्या वागणुकीमुळे किंवा त्याच्या चांगल्या गुणांमुळे तुमची कोणतीही उणीव किंवा चूक सुधारण्याची संधी मिळाली तर त्याचा स्वीकार करण्यास आणि त्यांच्याकडून शिकण्यास मागेपुढे पाहू नका. येणारे नवीन वर्ष तुमच्यासाठी तुमचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची एक चांगली संधी आहे. नवीन वर्षात तुमची ध्येये निश्चित करा आणि ती साध्य करण्यासाठी तुमच्या सर्व शक्तीने प्रयत्न करा.

**सकारात्मक राहा**

नवीन वर्षात तुमच्या मनात नकारात्मक विचार येण्यापासून थांबवायला शिका आणि नेहमी सकारात्मक विचार करा. तुम्ही जे काही जास्त विचार करता ते सर्व तुमच्या आयुष्यात घडते. जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन आपल्याला प्रत्येक परिस्थितीत पुढे जाण्याची प्रेरणा देतो. नेहमी निराश होणे आयुष्यासाठी शाप ठरते, त्यामुळे जीवन नेहमी सकारात्मकतेने जगा, मनातील नकारात्मकता काढून टाका. नवीन वर्षात, आपल्या मनाला चांगले संकेत पाठवा जेणेकरून आयुष्यात चांगल्या गोष्टी घडतील.

**संधी शोधा - नवीन संधी शोधा**

मागील वर्षात तुम्ही काय साध्य करू शकला नाही याचा विचार करणे थांबवा आणि नवीन वर्षात निराश व्हा कारण तुम्ही त्या गोष्टीचा जितका जास्त विचार करत राहाल तितका तुम्ही भविष्याचा विचार करू शकणार नाही.म्हणूनच पश्चात्ताप करणे थांबवा आणि नवीन वर्षात नवीन संधी शोधा. जर तुम्ही तुमचे लक्ष नवीन मार्ग शोधण्यात केंद्रित केले तर हा स्वभाव तुमच्यासाठी नक्कीच नवीन संधी घेऊन येईल. नये साल मे क्या करना चाहिये, पश्चाताप करण्याऐवजी भूतकाळाचा विचार करा.

**तुलना नाही**- देवाने प्रत्येक मानवाला एकमेकांपासून वेगळे केले आहे आणि प्रत्येक मनुष्याची जीवन जगण्याची पद्धत वेगळी आहे. जेव्हा आपण स्वतःची इतरांशी तुलना करतो तेव्हा आपण सर्वात दुःखी असतो. प्रत्येक व्यक्ती स्वतःमध्ये खास असते, असे देखील होऊ शकते की जे तुमच्यामध्ये आहे किंवा जे तुमच्यामध्ये आहे ते इतरांमध्ये नाही. जर तुम्ही तुमचे आयुष्य दुसऱ्याच्या आयुष्यासारखे बनवण्याचा विचार करत असाल, तर या प्रक्रियेत तुम्ही तुमचे मूळ आयुष्यही खराब कराल, त्यामुळे नवीन वर्षात स्वतःची इतरांशी तुलना करणे थांबवा.

पण ज्याच्याशी तुम्ही तुमची तुलना करत आहात त्या व्यक्तीचे विचार आणि गुण जर चांगले असतील तर ते तुमच्या आयुष्यात नक्कीच ठेवा कारण चांगल्या सवयींमध्ये आयुष्य बदलण्याची ताकद असते.

**दयाळूपणा आणि प्रेम**

नवीन वर्ष आल्यावर कोणावरही राग, निंदा, मत्सर किंवा कठोर



शब्द सोडा. या सर्व दोषांमुळे तुमची ऊर्जा कमी होते.इतरांप्रती दयाळूपणाची भावना ठेवा. प्रेम आणि गोड बोलून तुम्ही सर्वांची मने जिंकू शकता. गेल्या वर्षभरात तुम्हाला आलेला वाईट अनुभव विसरा. एखाद्याला क्षमा करणे हे महान व्यक्तिमत्वाचे लक्षण आहे. मनातील कटुता दूर करा आणि स्वतः पुढाकार घ्या जेणेकरून कोणत्याही नात्यात दुरावा निर्माण होणार नाही.

**संयम - धीर धरायला शिका**

देवाने तुम्हाला खूप सुंदर आयुष्य दिले आहे. निरर्थक इच्छांचा पाठलाग करण्यात ते वाया घालवू नका. संयम हा माणसाचा सर्वात मोठा गुण आहे. प्रत्येक गोष्टीची एक निश्चित वेळ असते. जेवढे तुम्ही इच्छांच्या मागे धावाल तेवढे तुम्हाला अधिक समस्यांना तोंड द्यावे लागेल. त्यामुळे धीर धरा आणि आयुष्यात जे काही मिळाले आहे त्यात आनंदी राहायला शिका.

**वेळ आणि विचार**

काळानुसार लोक स्वतःमध्ये आवश्यक बदल करत असतात . _ जे एखाद्या व्यक्तीसाठी आणि त्याच्या दृष्टीसाठी देखील आवश्यक आहे ._ शिक्षण हेच यशाचे साधन आहे असे नाही . बदलाच्या युगात इंटरनेटच्या माध्यमातून अनेकांनी यश मिळवले आहे . तुम्हीही काळासोबत तुमचा विचार बदलला पाहिजे , तुमचा हा बदल तुमच्या यशस्वी भविष्यात उपयोगी पडेल .

**विचारात बदल का आवश्यक आहे**- आजच्या काळात आणि पूर्वीच्या काळात अनेक बदल दिसून येत आहेत. आता डिजिटल होण्याची वेळ आली आहे. हळूहळू सर्व देश डिजिटल झाले आहेत यासोबतच आता लोक त्यांच्या भविष्याबाबत विचारही बदलत आहेत.डिजिटल म्हणा किंवा ऑनलाइन म्हणा आजची तरुणाई मी इंटरनेटच्या मदतीने खूप लोकप्रिय झालो आहे . यू ट्यूब आणि टिकटॉकही काही उदाहरणे आहेत

**बदल चांगले भविष्य आहे**

काळ खूप झपाट्याने बदलत आहे, त्यानुसार तुमची विचारसरणीही बदलण्याची गरज आहे. जर तुम्ही तुमची विचारसरणी बदलली नाही तर वेळेनुसार तुम्ही खूप मागे राहाल. या बदलाच्या काळात नेहमी सकारात्मक विचारच तुमचे भविष्य यशस्वी करेल वेळेच्या बदलाने तुम्ही तुमचे एक दिवसाचे काम एका तासात करू शकता. आजकाल तुम्ही खूप काही शिकू शकता ज्यासाठी तुम्ही तुमची विचारसरणी बदलली पाहिजे. या बदलासाठी तुम्हाला कठोर परिश्रम आणि नियोजनाची नव्हे तर स्मार्ट वर्कची गरज आहे. हा बदल तुम्हाला लवकरच यशाच्या शिखरावर नेऊ शकतो. काळानुरूप विचार बदलणे गरजेचे झाले आहे. जे तुम्हाला लवकरच यश मिळवण्यास मदत करते तुम्हा सर्वांनी काळानुरुप विचार बदलण्याची गरज आहे.

# आणि मागे वळून पाहताना



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**प्रभातिला आली लाली अवनी दवबिंदू न् धुक्यात ओली, वाटली आज ती अलबेली आठवणीत त्या रमून गेली... सहज म्हणून मोबाईल हातात घेतला.आणि एका सुंदर प्रभातीचे चित्र डोळ्यासमोर आलं नि मग काय? आज सरत्या वर्षातला आज शेवटचा दिवस वाचनात आलेली काही अक्षरे डोळ्यासमोरुन सहज तरळून गेली.**

**२०२२ या वर्षाने मला काय दिले ?**

तसे तर येणारा प्रत्येक दिवस काही न् काही घेवून येतच असतो. आणि मग एखादा नवा अनुभव देवून सरून जात असतो. कधी चांगला कधी वाईट !काही गवसलं काही हरवलं
काही भेटलं काही हळूवारं बंद मुठीतल्या वाळूसारखं निसटून गेलं.सरत्या वर्षातला उगवतीच्या दारातून वर येणारा लाल पिवळ्या केसरी रंगातून वर येणारा सूर्य खूप काही सांगू पहात होता.

सरत्या वर्षात असेच विविध रंग पहायला मिळाले. काळ, वेळ, आशा, निराशा आशा निराशेच्या खेळात नाती आणि नात्यामधली जाणीव, उणीव( कमतरता ) नाती गोती त्यातील प्रेम , जिव्हाळा, आपुलकी, आवडी निवडी जीवनावरचे प्रेम जीवनावर चा राग . जीवन म्हणजे तारेवरची कसरत तर आहेच.पण मग तुम्ही आयुष्याला काय दिले, किंवा मग आयुष्याने आपल्याला काय दिले. या आणि अशा कितीतरी गोष्टी..?

निसर्ग निसर्गाने ही खुप काही दिले खूप काही शिकवले. किलबिलाटाच्या त्या मंद धुंद मारव्यात भारवलेली ती सुंदर प्रभात आणि प्रभातीला आलेली लाली,कुठे सुकी कुठे चिंब ओली. खूप काही शिकवून गेली.

वेलीवर उमलू पाहणाऱ्या त्या कळ्या टोचऱ्या काट्यातूनही उमलू पाहत होत्या.पण काही मात्र अर्धवट उमलण्याच्या अवस्थेत होत्या. शेवटी काय आहे, निसर्ग, नियती या आणि अशा कितीतरी गोष्टी शेवटी काय...... ?

काही कळ्या उमलू पाहत होत्या काही मात्र नियतीच्या.... ?

सुख दुःख म्हणजे पाठशिवणीचा खेळ म्हणतात ना !सुखाला दुखाःची किनार असते त्याप्रमाणे.....
हरवलय काहीतरी क्षितीजापलिकडच्या झगमगत्या दुनियेत शोध घेता घेता मन धाव घेते त्या अस्तित्वातल्या खोल खोल जाणिवेत. आणि मग पुन्हा चालू होतो आशा निराशेचा खेळ . आशा निराशेच्या खेळात कालचक्र सतत फिरत असते.

दुपारी सहज समोरच्या बागेतल्या झाडावर घरटी बांधणाऱ्या सुगरण चिमण्या पहिल्या बाजूलाच झाडावर लटकलेली सुगरण
घरटी आणि त्यातून बाहेर पडणाऱ्या सुगरण चिमण्या
काड्या काड्या जमवून घरटी बांधण्यात मग्न होत्या
.मध्येच वाऱ्याची झुळूक येवून हेलकावणाऱ्या त्या घरट्याला घट्ट पकडून त्यांचे त्यांचे काम करत होत्या.आणि काही वेळाने... आकाशात आलेले ते काळे कुट्ट ढग पाऊस येणारच.... ?पण सो.. सो.. सोसाट्याच्या वारा सुटला, अन्....सुटलेल्या वाऱ्याने मळभ दूर होऊन सूर्य प्रकाशाचं साम्राज्य पसरले. आणि मग काय... झाडावर जणू मनमुराद आनंद घेत, लटकणारे ते सुगरण चिमणीचे घरटे वाऱ्यावर झुलू लागले. सरत्या वर्षात अशाच काही....नव्हे नव्हे.. या आणि अशा कितीतरी स्मृती किती सांगणार ना !
सरत्या वर्षांत खूप काही शिकायला मिळाल, काही दिलं काही घेतल, काही हरवलं, अन् काही सापडलं...
हळू हळू घटिका पळे पळतच असतात.

**अस्ताला जाणारा तो रवि फेसाळ नाऱ्या त्या लाटा,**
**स्मृतीतल्या त्या पाऊलवाटा, कल्लोळातलं कधी फूल कधी काटा.**

डोंगराआड गेलेला सूर्य आणि पसरलेले ते विविध रंग आणि ती रात्र रात्रीच्या अंधारात साऱ्या दुखःचा नाश होऊ दे, तसेच भविष्याच्या गर्भात लपलेल्या संकटांना दुःख ला सामोरे जाण्याची शक्ती, बुद्धी लाभू दे. येणारा उद्याचा सूर्य नवयुगाची क्रांती घडवून मानवी जीवन सुखी व आनंदी जगू दे साऱ्या दुखाचा वाईटाचा नाश होऊन एक हासरी, निरोगी, भारावलेली सुखात ओली चिंब झालेली नविन ऊमलू पाहणाऱ्या फुलाप्रमाणे सुप्रभात फुलावी एवढीच आशा.

Good bye 2022 And Welcome 2023
येणारे नविन वर्ष सर्वांना आरोग्यदायी निरोगी लाभो हिच सदिच्छा
नविन वर्षाच्या सर्वांना
मनपूर्वक खूप खूप शुभेच्छा.




# करुया संकल्प नववर्षाचा



लक्ष्मण जगताप
बारामती

आधुनिक केसरी

**सरत्या वर्षाला निरोप देताना नववर्षाच्या स्वागतासाठी आपण तयार आहोत.' झाले गेले विसरुनी जावे ,पुढे पुढे चालावे ' यानुसार सरत्या वर्षातील कटू गोष्टींचे विस्मरण करुया. प्रत्येकाचे जीवन आनंदमय होवो अशी सदिच्छा मनात ठेवून पुढे जाऊयात. मुलांना नवीन वर्षात करता येण्यासारखे काही संकल्प.**

१.नवीन वर्षात माझ्या वेळेचे योग्य नियोजन करेन.
२.नियमितपणे माझी शाळा ,अभ्यास याकडे लक्ष देईन.
३.वाचन ,लेखन ,खेळ चित्रकला किंवा माझा छंद याकडे जाणीवपूर्वक लक्ष देईन.
४.माझ्या परिसरातील शेतकरी ,सैनिक अन्य कारागीर यांना भेटून त्यांच्या मुलाखती घेईन.त्यातून त्यांच्या अडचणी समजून घेईन.
५.आईवडील शिक्षक यांनी दिलेल्या आज्ञांचे पालन करेन.
६.नियमितपणे व्यायामासाठी वेळ काढून माझ्या आरोग्याची काळजी घेईन.
७.फारच गरज असेल मोबाईल वापरणार अन्यथा नाहीच.
८.रोज ठराविक वेळ वाचनासाठी देईन.
९.पर्यावरणाच्या रक्षणासाठी माझे योगदान देईन.
१०.रोज नवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करेन.

**जिंदगी मिलेगी ना दोबारा**

माणसाचे आयुष्य क्षणभंगुर आहे.कधी कोणाची एक्झिट होईल याचा नेम नाही. रुसवा, हेवेदावे, राग,भांडण सोडा.प्रत्येकाशी प्रेमाने आणि आपुलकीने वागा. आयुष्य हे आनंदी जगण्यासाठी असते दुःख करत बसण्यासाठी नाही. येणार प्रत्येक क्षण मस्त मजेत घालावा. माणूस हा चुकणारा प्राणी आहे. त्यामुळे इथं प्रत्येक जणच चुकू शकतो.या जगात सर्वगुणसंपन्न कुणीच नाही.प्रत्येकाचा आदर करा. दुसऱ्यांच्या भावनांची कदर करा.एकमेकांना सहकार्य करा.दुसऱ्याची निंदा नालस्ती टाळा. नेहमी मीच बरोबर .मलाच सगळे कळते.मी चुकूच शकत नाही.हे पहिल्यांदा डोक्यातून काढा.इतरांना समजून घ्या.माणसाचे रंग ,रुप ,सौंदर्य बघू नका.त्याचे मन कसे आहे हे बघा. भूतकाळातील वाईट गोष्टी विसरा.तुमच्या मनातील नकारात्मक भावनांना थांबवा.आणि आनंदी क्षणांना आठवा. तुमच्या नंतर सगळं इथेच राहणार आहे.मागे उरणार फक्त तुमचा चांगूलपणा..बाकी दुसरे काय ...मग ठरवा कसं जगायचे ते...कण्हत ,कुथत दुःखात की ...मौज मस्तीत.....

# देवी शाकंभरी- नवरात्र उत्सवारंभ

आधुनिक केसरी

**आजपासून देवी शाख्मबरी नवरात्र उत्सव सुरवात झाली. आहे शंखबरी देवी हि चव्हाण कुळाची कुळदेवता आहे समाज कुठलाही असो ज्याचे चव्हाण कुळ असेल त्याने देवी शाख्मबरीची पूजा करून दर्शन नक्की घ्यावे नवसाला पावनारी हि देवी कधीच आपल्या भक्ताना निराश करत नाही राजस्थान येथील सांभर जिल्या जवळ शंखबर नावाने प्रसिद्ध आहे त्या तिर्थस्थळाला सांभर गड़ नावाने हि ओळखले जाते .**

जळगाव जिल्ह्यातील म्हसावद तालुक्या तील छोट्यासा गावातील लोकांनी काही वर्षापूर्वी संभरगढ़ येथून शंखबरी देवीची मुर्ती म्हसावद गावी आणली आणि तिचे छान असे मंदिरबनुन तिची स्थापना केली. त्या आधीपासून म्हसावद गावातील चव्हाण कुळातील आणि बाकी दूसरे ही लोक देवीचा हा उत्सव मोठ्या दिमाखत साजरा करतात पहिल्या दिवशी देवीची मिरवनुक काढली जाते पण ब्राम्हणाच्या हाताने मनोभावे पूर्ण श्रद्धांपूर्वक पूजा करून नउ दिवस रोज सकाळ संध्याकाळ आरती रात्री कीर्तनाचा कार्यक्रम होतो पोष मास मध्ये शुक्ल पक्षात अष्टमीला शांखबरी नवरात्र उत्सव सुरु होतो तर पोष मास शुक्ल पक्ष पूर्णिमेंला या उत्सवाची सांगता होते पौराणिक कथेनुसार एकदा पृथ्वी वर दुर्गम नावाच्या राक्षसाने धुमाकुळ घातला होता लोकांना अन्न मिळत नसे प्यायला पाण्याचा दुष्काळ होता. अन्न पाण्यावीना लोक मरायला लागले होते. तेव्हा देवी दुर्गा मातेने माता शांखबरी चे रूप धारण करून रडायला सुरवात केली तेव्हा मातेच्या अश्रूंनी जणु पाऊस पडू लागला पूर्ण पृथ्वी जल प्रवाहित झाली तेव्हा देवी शांखबरी ने दुर्गम देत्या असुराचा वध केला जो हि मनापासून अगदी श्रद्धापूर्वांक नऊ दिवस देवीचे उपवास करून तिला मनातील इच्छा बोलतो त्याची ती इच्छा देवी आई नक्की पूर्ण करते..अश्या सर्वांचे ती कल्याण करो हिच तिच्या चरणी प्रार्थना.



# शुभम् भवतु २०२३




सौ. शुभदा कुलकर्णी
संपर्क क्र. 9421214708

आधुनिक केसरी

**काळाचा ओघ पुढे चालला आहे.मला घेऊनच अर्थात..तसे पाहिले तर ही एक आग्ल वर्षांची सुरुवात. पण तारखा, साल, डायरी, कॅलेंडर बदलत राहतात. म्हणून नवीन वर्ष. गेल्या वर्षात एक महत्त्वाचा हात निसटून गेला. काकांचा. जो केव्हाही मदतीला तयार असायचा. निराधार वाटत राहिले काही दिवस. तसे आजपर्यंत असे अनेक आधाराचे हात सुटत गेले. आई,आप्पा, नाना,ताई,आजी आणखी कुणी कुणी. अगदी शेजारी,सिनीयर अॅड देशपांडे.तेव्हाही हेच वाटले होते. पडझड झालीच मनाची. पण सावरत गेले स्वतःला.**

पण काही नव्यानही आलेच की आयुष्यात.श्रिजा, अन्श. माझ्या मुलांची मुलं.सुखाला साय यावी अशी अनुभूती मिळालीच की.काही साहित्यिक मित्र, मैत्रिणी पण मिळाल्या.मदतीचा हात देणाऱ्या. कौतुक करणा-या..काहींना रोखून पण धरावे लागले. अजूनही स्त्री म्हणून जो. ससेमीरा असतो तो आहेच. काही वेळा टेन्शन ही आलीच.पाय लटपटत राहिले. पण एवढ्याने मी संपणारी नाही हा विश्वास ही होताच पाठीशी.आणि सावरले त्यातूनही.अजूनही किती संकट येणार आहेत आणि मी त्यातून सही सलामत बाहेर पडणार आहे, माहिती नाही.पण कुणी तरी आहे पाठीशी, मला सही सलामत बाहेर काढणारे हे मात्र नक्की. सतत रंग बदलत राहणारी ही आपली काही माणसं...सुख दुःखाचे वर खाली होणारे आलेख.ढासळणं काय असतं हेही अनुभवलं. हे खोटे आहे हे मनाला बजावत होते सारखं सारखं. पण नाही .तरी बसलेच जाऊन आनंदाच्या झुल्यात. सुखाची ती नाटकंही इमाने इतबारे निभावली.त्याचे फोलपणं लक्षात आल्यावर आत आत पोखरत राहिले स्वतः लाच.दुषणे दिली स्वतः लाच.पण ते सुखही अनुभवलेच की त्या क्षणी.रंगले होतेच त्यात मन काही क्षण. कनवटीला हे सगळे बांधून निघाले आहे पुढच्या प्रवासाला. याल तुम्ही बरोबर? गृहीत तर धरलय तुमचं साहचर्य.ब घा तुमची मर्जी. तसे पाहिले तर कुणीच नसते बरोबर आताशा. संध्याकाळी बघते तर पक्षांचे थवे घरट्याकडे परत येत असतात.लहान मुले शाळेतून परत येत असतात. सूर्य नारायणाचा मात्र परतीचा प्रवास सुरू होणार असतो . तेव्हा कातर कातर होते मन. सांजवेळी अंगणात डुबणा-या सूर्याची सांजवात दूर गेल्या पाखरांची सय टोचते मनात. अशी अवस्था होतेच. तरी बरे घरात अजूनही कुणीतरी आहे. कुणाची तरी सोबत आहे.हे काय कमी आहे? एकमेकांना समांतर असूही कदाचित.पण लौकिक अर्थाचं एक घट्ट नातं मला जखडून टाकणारं आहे घरात.मनाला बांधून घालणार.शरीराचा आता प्रश्न संपलाय.त्या गरजा संपून गेल्यात.पण तरी रितेपण आहे त्यातून झिरपणारे मनात.पण एकमेकांना समांतर तर समांतर .पण आहेच कुणीतरी असे ठामपणे उभे पुढयात.पण त्यामुळे लेखाजोखा नाही मांडला जात.मी ,माझी लेखणी,माझे त्याबाबतीतील स्वातंत्र्य अबाधित आहे.शब्दाच्या दुनियेतील मुशाफिरी चालूच आहे.तो बहर.. ती पानगळ.. माझीच. माझ्यातील.मी शब्दात बांधते आहे. पण कधी कधी भिती ही वाटते. हेही सौख्य तुटण्याची. कधीतरी हे होणारच. हेही एक अटळ सत्य आहे. कितीक लोकांना पाहते जाताना तसे.जाणाराच जग तसं छोटं असतं मागे उरलेलं. काही कपडे, काही आठवणी. कपडे नाशवंत.आणि आठवणी ज्याच्या त्यांच्या मनात फक्त. काही दिवस ठळक.नंतर धूसर धूसर.देह तर मातीत माती होऊन मिसळून जातो. मग राहिलेल्या कुणाचं तरी एकाकी, दुबळे होऊन जगणं. एखाद्याची सवय सुद्धा किती एकाकी करून जाते मनाला.लोंबकळत राहतात ही माणसं मधेच. कधी कधी खटके उडाल्यावर नात्याचे खरे रूप दिसते. अगदी एखादेच वाक्यही पुरेसे असते तेव्हा. आपली जागा कळते तेव्हा.पण उन्मळून जाऊनही उपयोग नसतोच.आत्तापर्यंतचे क्षण बुडबुडे वाटायला लागतात.आतले झिरप.. कुठेच नसतात. असे का होते आपल्याच बाबतीत.सभ्रम वाढत जातात. काही कळत नाही.वळत नाही.जो वर बसलाय त्याचा यातही काही तरी हेतू असेलच की.असे म्हणून सोडून देते झालं जेव्हा हातातून काही निसटत असतं तेव्हा नव्यानही काही मिळत असतं तेव्हा जाणा-याच दुःख मनात लपवून येणा-याच स्वागत हसून करायचं असतं पण हाताशी काय लागणार याचा तरी कुठे काय अंदाज असतो?पण तरी ढकलत रहायचे स्वतः ला. पुढे पुढे. माणसांच्या गराड्यात.त्यातील कुणी नसेना का आपले .पण त्याचा एक आपण भाग आहोत,हेही नसे थोडके.




# सरत्या वर्षास निरोप देत जरा विसावू या वळणावर...

आधुनिक केसरी

सरत्या वर्षांस निरोप देण्यासाठी आपण सारे सज्ज झालो आहोत. जुन्या आणि नव्या हिंदोळ्यावर मात करीत बेभान होऊन आयुष्य जगत सारेजण समाजासाठी सतत कार्यरत आपण राहत आहोत. नववर्ष सतत काहीना काही देऊन जाते. तसेच जुने वर्ष अनेक सुखाचे आणि दुःखाचे प्रसंग आपल्याला देत असताना जीवनात सन्मान मिळवून देतात हे विसरून कसे चालेल. दैनिक आधुनिक केसरीने वाचकांना केंद्रस्थानी मानून रोज नाविण्यपूर्ण वाचकांना समर्पित करीत आले आहे. सरत्या वर्षांस निरोप देताना आधुनिकतेची कास धरीत आधुनिक केसरी परिवारातील आघाडीच्या लेखक-गझलकार-कवी मंडळींनी साधलेला हा वैविध्यपूर्ण संवाद खास वाचकांसाठी....

## आकाशी झेप घे रे पाखरा....



बाळासाहेब जोगदंड
संपर्क क्र. 9423051246

जुन्या वर्षाला निरोप देत नव्या वर्षाचे स्वागत करताना निश्चितच मनामनांत आनंदासोबत मागील क्षणांचे सुख आणि दुःख मनात येत असते . येणाऱ्या प्रत्येक वर्षात सतत काही नवनव्या घटना आणि प्रसंग आपण पाहत आलो आहोत. आकाशी झेप घे रे पाखरा, सोडी सोन्याचा पिंजरा... कवी आणि गीतकार जगदीश खेबुडकर यांची कविता आणि सुधीर फडके यांनी चढवलेला स्वरसाज निश्चितच जुन्या वर्षाला निरोप देत मनामनात आनंद तरंग निर्माण करून जातो. पण सध्याच्या संकटांच्या काळात आणि परिस्थितीत सरत्या वर्षाला निरोप देऊन नव्या वर्षात पदार्पण करताना रोजचा सूर्य आणि चंद्र येतो आणि त्याच्याकडे बघायला वेळ नसणारे आपण सर्वजण नववर्षाच्या शुभेच्छा देण्यासाठी सज्ज राहतो. आणि वर्षाच्या पहिल्याच दिवशी आपला आनंद द्विगुणीत करत असतो. परंतु सभोवतालच्या वैभव, सत्ता, संपत्ती या लौकिकातील सोन्याचा पिंज-याचे वर्णन मनामनाला विचार करण्यास भाग पाडत आहे. या मोहापायी त्यात असलेल्या जीवाची भीती खुंटत चालली आहे. आणि त्यामुळे जीवनाची प्रगती होत नाही. सुखसोयीमुळे कर्तृत्व थांबले आहे. म्हणून हा सोन्याचा पिंजरा सोडून ध्येयाच्या मोकळ्या आकाशात आपण झेप घेतली पाहिजे असा संकल्प करून आपण सारेजण जगलो तर केवढा आनंद सर्वत्र पाहायला मिळेल. आता एक संपले की दुसरे संकट तयार असल्याची जणू काही मालिकाच सुरू आहे. या संकटामुळे सर्वच क्षेत्रात आजारपण आले आहे. माणूस पार नागवलेला दिसून येत आहे. या साऱ्या परिस्थितीत एकमेकांना बळ देत, प्रेम देत , संवाद साधत नव्या वर्षातला आनंद नक्कीच द्विगुणित करता येऊ शकेल. रात्रीच्या गर्भात कितीही उलथापालथ झाली तरी दिवस मात्र त्याच्याच लईच साधेपणाने आणि प्रसन्नपणे उगवतो. या निसर्गाला साद देत आपण सर्वजण त्याच्याशी जुळवून घेत जगलो तर तो क्षण आनंद तरंग निर्माण करून जाईल एवढा आत्मविश्वास निश्चितच मनामनांत आनंद तरंग निर्माण केल्याशिवाय राहणार नाही एवढे मात्र नक्की..!

## नवं वर्ष नवा संकल्प !



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9834367059

पंचवार्षिक, वार्षिक आणि दैनिक नियोजनही करतोच आपण नव्या वर्षाच्या हौसेनं.गेल्या वर्षात पदरात काय पडलं याचा लेखा-जोखाही मांडुन पहातो.हाती निराशा आली तरी, नवा जोम नवी आशा जन्माला घालतोच.शंभर गोष्टी करीन म्हणतो माणुस नियोजनाच्या भरात आणि प्रत्यक्ष कृतीची वानवा जानवते सालभर. हे असंच सुरु असतं माणसाचं सालोन् साल !

**"जुने जावू द्या मरणा लागुन जाळुन अथवा पुरुन टाका."**

असं केशवसूत म्हणाले तरी आठवनींचे बोचके आपण सालोन् साल सांभाळंत आलो आहोत. 'विस्मरणशक्ती' निसर्गानं दिली माणसांना ती कामातही राहिली पाहिजे. पण तसं होत नाही.प्रसंगा प्रसंगांनी फाईल्स खट्टकुन उघडंत राहतात.हवा तो डाटा वर येतोच.

१. छान आभ्यास करुन शिकवू लेकरांना वर्षभर आणि छान छान उपक्रम

२. राबवू त्यांच्या मन आणि मेंदूला क्रियाशील ठेवू. वर्षभर लिहीतं राहीलमन याचाच साधा सोपा अर्थ असा की वर्षभर वाचन, चिंतन, मनन, लेखण, प्रकाशन सुरुच राहिल आणि नवनव्या प्रश्नांची उकल करणंही आलंच त्या पाठोपाठ. दै. अधुनिक केसरी मधील 'संयमाचा परीघ' हे सदर दर मंगळवारी नवं कांही घेऊन येत राहिल.

३. वर्षभर कुणाची कुचीनिंदी करणार नाहीत आपण आणि यापुर्वीही कधी कुणाची केल्याचं आठवत नाही. मनाच्या खोल तळातुन काही वर आलं तर त्याच्या कविता गजलाही जन्माला येतीलच.

४. वर्षभर कुणाच्या कामात आपल्यामुळं व्यत्यय येणार नाही याची तसदी घेऊ.

५. वर्षभर कुणाबद्दल विनाकारण अपशब्द वापरण्याचाही विषय नाही आपला. वर्षभर नवनवी आव्हाणं स्विकारु आणि पेलूही. पळकुटा आपला स्वभाव नाही त्यामुळं पळ काढणे ही विषयही नाही आगामी वर्षाच्या नियोजनात.

६. वर्ष कुठलंही आणि कितीही अवघड...

आला दिवस आनंदात जगणे हे आपलं दैनिक कालनिर्णय असेल 2023 मधे.

'तुझ्या वाचून करमेना' या मराठी सिनेमातील सुधीर मोघे यांनी लिहिलेलं आणि अनुराधा पौडवालच्या सुमधूर सुरांनी सजलेलं हे फार सुंदर गीत या निमित्ताने आपल्यासाठी...

"भले बुरे जे घडून गेले विसरुन जावू सारे क्षणभर,
जरा विसावू या वळणावर, या वळणावर."

## काय कमावलं याचा बोध व्हावा...



प्रमोद कुलकर्णी
संपर्क क्र. 7249205507

नवीन वर्ष म्हटले की नवीन उत्साह ,नविन ऊर्जा, व आनंदाचा दिवस असतो. मागील वर्षाच्या चांगल्या आठवणी सोबत घेऊन आयुष्यात नव्या उमदेणे जाण्यासाठी नविन वर्षाचे स्वागत सर्वजण करत असतात. प्रत्येक धर्मात नविन वर्षाचे स्वागत वेगवेगळ्या दिवशी केले जाते. हिंदू लोकात नविन वर्ष चैत्र महिन्यात शुक्ल प्रतिपदेपासून होते.सिंधी लोकात चेटीचंड उत्साहापासुन नविन वर्ष ची सुरुवात होते.पंजाबी लोक बैसाखी उत्साह साजरा करून नववर्षाचे स्वागत करतात.जैन लोक नववर्ष दिपावली च्या दुसऱ्या दिवशी साजरा करतात.जगात सर्वात जास्त ईसाई वर्ष 1 जानेवारी ला साजरे केले जाते. त्याच प्रथेचे अनुकरण करून नविन वर्षाचे स्वागत आपण करत आहोत. नोकरी करणारे कर्मचारी यांचा जास्त सहभाग या दिवशी नविन वर्ष साजरे करण्यामध्ये असतो.पण नवीन वर्ष साजरे करताना आपल्या संस्कृतीचे भान सर्वाने ठेवले पाहिजे.नविन वर्ष साजरे करताना स्वतः मध्ये सकारात्मक बद्दल घडून आणावयास पाहिजे.माणुसकीची जपणूक सर्वानी केली पाहिजे.माणूसकीच नात हे जगातल्या कुठल्याही संपती पेक्षा महत्वाचे आहे या नात्याला टिकवण्यासाठी एकमेकांवर विश्वास आदर आवश्यक आहे.या नात्याची जपणूक ही सर्वश्रेष्ठ जमापुंजी आहे. त्यासाठी आपण नवीन वर्षी प्रत्येक जण प्रयत्न करू. इंटरनेट मुळे जग इतकं जवळ आलं तरी माणूस माणसापासून दूर गेला आहे. हे वास्तव आहे.

आपण व आपले कुटूंब निरोगी राहण्यासाठी नविन वर्षाच्या संकल्प केला पाहिजे. नवीन वर्षाचा विचार करत असताना वर्षभरात आपण काय गमावलं यापेक्षा आपण काय कमावलं या दृष्टिकोनातून आपण सरलेल्या वर्षाकडे बघितले तर आगामी काळासाठी या आठवणी निश्चित प्रेरणादायी असतील यात कुठलीही शंका नाही. 2022 वर्ष हे महाराष्ट्र साठीच नवे संपूर्ण भारतासाठी विविध घटनांनी नाट्यमय असे वर्ष दिसून आलं या सर्व वातावरणामध्ये आपण स्वतःचा शोध घेत असताना आगामी काळात नियतीने आपल्यापुढे काय वाढून ठेवले आहे याची शाश्वती कोणालाही देता येणार नाही, मात्र येणाऱ्या परिस्थितीला आपण खंबीरपणे सामोरे जाऊ हे मात्र निश्चित. राजकीय उलथापालथ आपल्या राज्यात झाली त्यामुळे समाजवर त्यांचा अप्रत्यक्ष बरा वाईट परिणाम होत असतो. शासन हे स्थिर असावयास पाहिजे जेणेकरून लोकहिताचे निर्णय घेऊन ते लवकरात लवकर अंमलात आणता येतात. येणारे नवीन वर्ष सर्वा साठी आरोग्यदायी जावो या शुभेच्छा..!

## जपूयात मनाचे किनारे...



प्रवीण संगमकर
संपर्क क्र. 7414931177

काही क्षणांचा उत्सव, काही क्षण स्तब्धता ,शांतता, काही क्षण आक्रोश, काही क्षण... अशा अनेक क्षणांची सर मिसळ म्हणजे हे जाणारे वर्ष एक नवी पालवी एक नवी आशा नवी पहाट नवी दिशा नवीन विचार नवे संकल्प या सगळ्यांची आशादायी उंबरठ्यावर सजलेली रांगोळी म्हणजे हे नवीन वर्ष

मागील वर्षात झालेल्या चुकांची पुनरावृत्ती टाळणे नव्या दुरुस्तीसह आयुष्य नव्याने प्रवाही ठेवणं आपण केलेल्या चांगल्या कामाची नोंद ठेवणे तेवढेच गरजेचे आहे आयुष्याची दशा आणि दिशा बदलण्यासाठी जो एक विचारांचा उंबरठा ओलांडण्याची स्थिती असते ती स्थिती म्हणजे 31 डिसेंबर पासून एक जानेवारीत म्हणजेच नवीन वर्षात आपण प्रवेश करत असतो ती... आपल्या पुरता मर्यादित विचार न करता आता वेळ आली आहे सामाजिक बदलाच्या दृष्टीने आपल्या विचारांतही काही बदल या नवीन वर्षात करण्याची मागील वर्ष करोणा सारख्या स्थितीतून आपण बाहेर पडलो पण त्यातून बरेच काही शिकलोय आता गरज आहे सामाजिक स्वास्थ्य व सामाजिक विचारधारा ठरवण्याची एकसंघ साखळी मानवतेची निर्माण करण्याची त्यामुळेच येणाऱ्या नवीन वर्षात आपण संकल्प करूया आजूबाजूला होत असलेल्या पर्यावरण प्रदूषणाच्या संदर्भातली जागृती, आपल्या सवयी व आहार विहार व्यायाम यासंबंधीचे चांगले इतरांपर्यंत पर्यंतही पोहोचवण्याची, नवीन वर्षात वसुंधरेची पर्यावरणाची काळजी घेणे त्यासंबंधीचे बदल आपल्यापासून सुरुवात करून आजूबाजूच्या परिसरात रूजवणं महत्त्वाचे आहे तसेच आपल्यातील चांगले नवनीत नवे समाजापर्यंत घेऊन जाणे हे या वर्षात आपण करूयात या सरत्या वर्षाला निरोप देताना माझी एक कविता आपल्यापुढे ठेवतो जपूयात मनाचे किनारे

जपूयात मनाचे किनारे पाने पलटावी तशी दिवस कसे बदलतात..
आठवणींच्या कॅनव्हासवर सुख दुःखाचे हिशेब सजतात, लाट होवून येणारा प्रत्येक दिवस किना-यावर धडकतो, बरच काही घेवून जातो नकळत ठेवून खोल काळजात, आठवणींच्या पाऊल खुणा, फक्त जपूयात मनाचे किनारे, भरती आहोटीचे दिवस तर येत जात राहतील...या नववर्षातही..

## व्हावी आरोग्य संपन्नतेकडे वाटचाल...



राजेंद्र फंड
संपर्क क्र. 9881085671

दोन वर्षाच्या प्रदीर्घ कोरोना साथीनंतर 2022 च्या नवीन वर्षाला सुरुवात झाली होती. जनतेने कोरोना लस घेवून कोरोनाविषयक इम्यूनिटी वाढवली आहे. दोन वर्षापासून कोरोनाने आलेले दुःख, दारिद्र्य विसरून ठप्प झालेले जनजीवन , सण , समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, निवडणुका, व्यवहार, पर्यटन पुन्हा नव्या जोमाने सुरू झाले आहे. या वर्षी पाऊस चांगला झाल्याने शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढण्याच्या आशा वाढल्या आहेत. या वर्षात खूप मान्यवर साहित्यिकांना पुरस्कार प्राप्त झालेत. तसेच अनेक साहित्यिक, कला, क्रीडा, व इतर क्षेत्रातील मान्यवरांना आपण भावपूर्ण निरोप दिले आहेत. हे वर्षच कभी खुशी कभी गम हे अनुभवतांना या वर्षाअखेरीस पुन्हा कोरोना साथ येण्याची शक्यता वाढली आहे. कोरोनाचे समूळ उच्चाटन न होता थोड्या फार प्रमाणात तो राहणारच असल्याने त्याची भीती न बाळगता प्रत्येकाने आपली शरीर संपदा योग, प्राणायामाने, पूरक पोषण आहार घेवून आपली इम्यूनिटी वाढवून करावी.


## चला...नव्या उमेदीने उभे राहूया...



सीमा देशमुख
संपर्क क्र. 7498568346

घड्याळाचे काटे जसे टिक टिक करत एकूण साठ..... साठाव्या सेकंदाला येऊन पोहोचतात आणी सुरु होतो नवीन वर्षाच्या स्वागताचा जल्लोष. जो तो आपापल्या परीने आपल्या पद्धतीने सज्ज असतो नवीन वर्षासाठी. मित्रांनो आपला उत्साह पहिल्या दिवशी तर एवढा दांडगा असतो की नवीन संकल्प..रिझोल्युशन आपण बनवलेलं असतं ते आपण तंतोतंत पाळतो, पण...दुसऱ्या दिवशी पासून मात्र हळूहळू ते मनोरे ढासळायला लागतात. म्हणूनच आपण आधीच आपल्या मनाशी पक्क केलं पाहिजे की पहिला दिवस की एक दिवस म्हणजेच डे वन और वन डे?? आपली रोजची रहाट गाडी चालूच राहणार मित्रांनो तरी दर वर्षी एक नावीन्य पूर्ण आव्हान स्वीकारून ते पूर्णत्वास नेण्यास काही औरच मजा आहे. ज्यातून आपल्याला समाधान मिळेल, आपल्या जगण्याला अर्थ मिळेल, आनंद होईल ते नक्कीच करावे. आयुष्य हे भरभरून जगावे. नेहमी सकारात्मक लोकांनाच आपल्याजवळ येण्यास मुभा द्यावी व नकारात्मकतेला बाय-बाय करावे. सगळंच आपल्या मनासारखं होईल असं देखील नाही! तरी आपल्या स्वतःला खुश ठेवणं, आपल्या अडीअडचणी दूर करणं व आपले सर्व कामे पूर्णत्वासने न्हेन सर्वस्वी स्वतःची जबाबदारी असून त्यासाठी दुसऱ्या कडून अपेक्षा ठेवू नये.. अपेक्षा भंग होणारच नाही. कुठल्याही अपयशाने खचून न जाताः पुन्हा स्वतःला उभारी देणं हे महत्त्वाचं!चला तर नवीन वर्षी आपण हिट मी डॉल बनुया समाजाने, प्रतिकूल परिस्थितीने किंवा कोणीही सहकारी, मित्र मैत्रिणी अथवा आप्तसखीयांनी आपल्याला जेवढा जोरात प्रहार करून पाडण्याचा प्रयत्न केला तेवढ्याच डबल ताकदीने आणि नवीन उमेदीने आपल्याला पुन्हा उभं राहायचं आहे आणि ते पण हसत हसत. ठरलं तर मग,नवीन वर्षाच्या सोनेरी, मंगलमयी शुभेच्छासह....

## सरले सरले हेही वर्ष सरले...



डॉ. दिपाली उमाळे
संपर्क क्र. 9969739833

मावळत्या दिनकरा तुला आमचा प्रणाम... तू तुझे काम अगदी नित्य नियमाने करतोस. रोज सकाळी उगवतो ,रोज सायंकाळी मावळतो. पण, रोजच्या दिवसाकडे आपण कसं बघतो हे महत्त्वाचे आहे. सूर्य आपलं काम योग्य रीतीने पार पाडत असतो. पण,माणूस मात्र सगळ्या चांगल्या वाईट कामाचं खापर तो त्या दिवसावर फोडत असतो. खरंतर प्रत्येक दिवसाकडे तुम्ही कुठल्या दृष्टीने बघता हे खूप महत्त्वाचं असतं. काळाचे हे चक्र चालूच राहणार. दिवसामागून दिवस निघून जातील. वर्षामागून वर्ष सरून जातील. पण, मागील वर्षात आपण काय केले आणि पुढच्या वर्षात काय करणार आहोत याची चर्चा फक्त वर्षाच्या शेवटच्या दिवशीच होत असते. एक जानेवारीपर्यंत हा उत्साह खूप असतो पण, नंतर येरे माझ्या मागल्या. कारण,माणूस हा अतिशय स्वार्थी प्राणी आहे.तो सर्व कामांना आपल्या सोईनुसार आखत असतो आणि जर, ते काम वेळात झाले नाही तर, म्हणतो की,आजचा दिवसच खराब होता. म्हणजे, अगदी सोयीस्कर रीत्या आपल्या न करतेपणाचे खापर तो त्या दिवसावर फोडतो. माणसाने प्रत्येक दिवसाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. ज्या दिवशी जे काम ठरवले ते पूर्ण झालेच पाहिजे असा निश्चय केला तर ,वर्ष कुठलेही असो, आपल्याला यश नक्कीच मिळतं. खरंतर, वर्षातील प्रत्येक दिवस,प्रत्येक तास, प्रत्येक क्षण हा चांगलाच असतो. आपण सकारात्मक दृष्टीने प्रत्येक दिवसाकडे पाहिले पाहिजे. मागील वर्षात आपण काय- काय गमावले हे ही ध्यानात ठेवले पाहिजे.ऋतुचक्राचे म्हणाल तर, मागील वर्षी पावसाळा मुक्काम ठोकून होता. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले. अनेक राजकीय घडामोडी मागील वर्षात झाल्या. अनेक मोठे धक्के सर्वसामान्य जनतेने पचवले. मागच्या वर्षातील सर्वात दुःखद घटना म्हणजे, गाणं सम्राज्ञी लतादीदी यांच्यासारख्या कोहिनूर हिऱ्याला आपण गमावले. माझ्या मते, ही सरत्या वर्षातील अत्यंत दुःखद घटना आहे. असो, काळापुढे कुणाचेच काहीही चालत नाही. आनेवाला पल जानेवाला है... हो सके तो इसमे जिंदगी बसा लो, पल ये भी जानेवाला है.... म्हणून म्हणते, मंडळी येणाऱ्या वर्षाचे स्वागत सकारात्मक दृष्टीने करा. नवीन वर्षात तुम्ही केलेले जे निश्चय आहेत, ते पूर्ण करा.

# सेफीड तारे- आकाशगंगेहून भिन्न दीर्घिका!



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**हबल एडविन पॉवेल हे अमेरिकन ज्योतिर्विद व खगोल भौतिकीविद होते. आकाशगंगेबाहेरील- गांगेय बाह्य ज्योतिषशास्त्राचे ते संस्थापक मानले जातात. त्यांनी दीर्घिकांचे- तारामंडलांचे शोध लावले व त्यांचे वर्गीकरण केले. तसेच ते प्रसरणशील विश्व या विश्वाविषयीच्या प्रतिकृतीचा पहिला पुरावा देणारे ज्योतिर्विद आहेत. अधिक माहिती श्री एन. कृष्णकुमार जी. यांच्या या लेखात वाचा... संपादक.**

हबल यांचा जन्म दि.२० नोव्हेंबर १८८९ रोजी मार्शफील्ड, मिसूरी, अमेरिका येथे झाला. शालेय विद्यार्थी असताना ते हुशार होतेच, शिवाय त्यांना खेळांतही रस होता. मात्र त्यांना शिकागो विद्यापीठातील ज्योतिर्विद जॉर्ज एलरी हेल यांच्या प्रेरणेने ज्योतिषशास्त्र विषयाची आवड निर्माण झाली. याच विद्यापीठात त्यांनी गणित व ज्योतिषशास्त्र या विषयांतील पदवीपूर्व पदवी मिळविली. तसेच तेथे ते उत्कृष्ट मुष्टियोद्धा म्हणूनही प्रसिद्ध होते. मात्र पदवी संपादन केल्यानंतर त्यांनी ज्योतिषशास्त्र व कसरतीचे खेळ यांतील लक्ष काढून घेतले आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात ऱ्होड्स स्कॉलर म्हणून कायद्याचे अध्ययन सुरू केले. कायद्याची बीए पदवी सन १९१२मध्ये मिळविल्यावर ते केंचुकी येथे वकिली करू लागले. तथापि वर्षभरातच ते वकिली व्यवसायाला कंटाळले. अनेक विषयांत गती असलेल्या हबल यांनी अखेरीस ज्योतिषशास्त्रात काम करण्यावर लक्ष केंद्रित करावयाचे ठरविले. ते शिकागो विद्यापीठ व त्याची विस्कॉन्सिन येथील यर्कीझ वेधशाळा येथे परत आले. तेथे त्यांनी एडविन ब्रांट यांच्या मार्गदर्शनाखाली आकाशगंगेतील नवतारे आणि तेजस्वितेत बदल होणारे चल तारे- नवतारा व अतिदीप्त नवतारा यांचा अभ्यास केला. हबल यांनी ज्योतिषशास्त्रातील पीएचडी पदवी सन १९१७मध्ये मिळविली. पहिल्या महायुद्धात भाग घेतल्यानंतर ते कॅलिफोर्नियातील पॅसाडीनालगत असलेल्या मौंट विल्सन वेधाशाळेत दाखल झाले. तेथे त्यांनी आकाशगंगेबाहेरच्या ज्योतिषशास्त्रीय आविष्कारांशी निगडित संशोधन करण्यास सुरुवात केली. त्यांनी दि.३० डिसें.१९२४ रोजी आकाशगंगे खेरीज इतर दीर्घिकाही अस्तित्त्वात असल्याचे जाहीर केले.

आपल्या सुर्यकुलात असणारा सूर्य हा एक मध्यम आकाराचा तारा आहे. अशा आपल्या सूर्याएवढ्या अंदाजे सुमारे १०० अब्ज ताऱ्यांच्या समुहास आकाशगंगा असे म्हणतात. याचा आकार प्रचंड मोठा असतो. अशा अंदाजे सुमारे १०० अब्ज आकाशगंगांच्या समुहास दिर्घिका असे म्हणतात. अशा १०० अब्ज दिर्घिका या ब्रम्हांडात असण्याची शक्यता आहे. यावरुन ब्रम्हांड किती प्रचंड मोठे आहे, याची आपल्याला कल्पना येईल. आकाशगंगा या कोट्यवधी तारे असलेल्या दीर्घिकेत सूर्यही आहे. मात्र आकाशात दिसणाऱ्या सर्व अभ्रिका आकाशगंगेचा भाग नाहीत, हा शोध हबल यांनी सन १९२२-२४ या काळात मौंट विल्सन वेधशाळेतील निरीक्षणांद्वारे लावला. त्यांनी १,३०० खगोलीय क्षेत्रे निवडून शेकडो छायाचित्रे घेतली. विशिष्ट अभ्रिकांमध्ये १२ सेफीड चल तारे असल्याचे त्यांना आढळले. सेफीड हा आवर्ती चल ताऱ्यांचा उपगट असून त्यांचा तेजस्वीपणा काळानुसार स्थिर राहत नाही आणि त्यांच्या तेजस्वीपणातील बदलाचा आवर्तकाल त्यांचा अंगभूत माध्यम- सरासरी तेजस्वीपणाशी निगडित असतो.

हबल यांनी मौंट विल्सन वेधशाळेतील २५४ सेंमी दूरदर्शकाद्वारे घेतलेल्या वेधांवरून व आढळलेल्या ताम्रच्युतींवरून पर्यायाने दूर जाण्याच्या गतीवरून अंतर, भासमान प्रत व निरपेक्ष प्रत यांच्यातील परस्परसंबंधाचा उपयोग केला. सेफीड तारे लाखो प्रकाशवर्षे अंतरावर म्हणजे आकाशगंगेच्या पलीकडचे असल्याचे निश्चित झाले. ज्या अभ्रिकांमध्ये हे सेफीड तारे आहेत त्या प्रत्यक्षात आकाशगंगेहून भिन्न अशा दीर्घिकाच असल्याचे त्यांनी दाखवून दिले. उदा.देवयानी अभ्रिकेतील एम-३१ ही दीर्घिका आकाशगंगेच्या फारच बाहेर म्हणजे साडेसात लक्ष प्रकाशवर्षे इतकी दूर आहे. उलट आकाशगंगेचा व्याप फक्त एक लक्ष प्रकाशवर्षे एवढा आहे. हा शोध त्यांनी १९२४मध्ये घोषित केला व त्यामुळे ज्योतिर्विदांना विश्वाविषयीच्या त्यांच्या कल्पना तपासून पाहणे भाग पडले. आकाशगंगेबाहेरच्या या दीर्घिका शोधून काढल्यावर लवकरच हबल यांनी सन १९२६मध्ये या दीर्घिकांचे त्यांच्या आकारानुसार वर्गीकरण करण्याचे आणि त्यांचे तारकीय घटक व त्यांच्या तेजस्वीपणाचे आकृतिबंध यांच्या समन्वेषणाचे कामही सुरू केले. त्यांनी दीर्घिकांचे १ ) विवृत्ताकार, २ ) साध्या चक्रभुजीय, ३ ) दंडयुक्त चक्रभुजीय आणि ४ ) रचनारहित हे चार प्रमुख वर्ग केले- संदर्भ ज्योतिषशास्त्र. दीर्घिकांचा अभ्यास करताना त्यांनी पुढील दुसरा लक्षणीय शोध १९२७मध्ये लावला. या दीर्घिका उघडपणे आकाशगंगेपासून दूर जात आहेत आणि त्या जितक्या अधिक दूर असतात तितक्या अधिक वेगाने दूर जात आहेत. या शोधाचे असंख्य मतितार्थ- अटकळी वा अन्वय होते. दीर्घकाळ विश्व स्थिर अवस्थेत असल्याचे मानले जात होते. या शोधामुळे विश्व प्रसरण पावत असल्याचे दिसून आले. त्यांनी दीर्घिकांची गती व त्यांचे अंतर यांचे गुणोत्तर हा स्थिरांक असेल अशा प्रकारे विश्व प्रसरण पावत असल्याचे शोधून काढले. या स्थिरांकाला त्यांच्या नावावरून हबल स्थिरांक हे नाव पडले. विश्व प्रसरण पावत असल्याचे हबल यांचे मत बरोबर होते. मात्र त्यांनी गणिताने काढलेले हबल स्थिरांकाचे मूल्य बरोबर नव्हते. कारण त्यावरून आकाशगंगेची प्रणाली इतर सर्व दीर्घिकांपेक्षा अधिक मोठी आहे आणि पृथ्वीच्या अंदाजाने काढलेल्या वयापेक्षा संपूर्ण विश्व लहान आहे, असा चुकीचा अर्थ निघत होता. तथापि नंतर ज्योतिर्विदांनी त्यांचे निष्कर्ष पुन्हा तपासून पाहिले व त्यामुळे हबल यांच्या सिद्धांतांचा बचाव झाला. यामुळे विश्व १०-२० अब्ज वर्षे स्थिर त्वरेने प्रसरण पावत असल्याचे चित्र निर्माण झाले.

हबल यांनी दिलेली हॅली व्याख्याने- ऑक्सफर्ड विद्यापीठ, सन १९३४; सिलिमन व्याख्याने- येल विद्यापीठ, सन १९३५ आणि ऱ्होड्स मेमोरियल व्याख्याने प्रसिद्ध आहेत. रेड शिफ्टस् इन दि स्पेक्ट्रा ऑफ नेब्युली- सन १९३४ आणि दि हबल ॲटलास- संपा.ॲलन रेक्स सँडेज, सन १९६१ ही त्यांची प्रसिद्ध पुस्तके आहेत. ज्योतिषशास्त्रात त्यांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांना अनेक मानसन्मान व पुरस्कार मिळाले होते. उदा.अमेरिकेतील बर्नार्ड, ब्रूस व फ्रँक्लिन ही सुवर्ण पदके तसेच रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सुवर्ण पदक- सन १९४० आणि ऑक्सफर्डच्या क्वीन्स कॉलेजचे फेलो, शिवाय पृथ्वीभोवतीच्या कक्षेत स्थापित केलेल्या दूरदर्शकाला त्यांच्या सन्मानार्थ हबल अवकाश दूरदर्शक- हबल स्पेस टेलिस्कोप हे नाव देण्यात आले. हबल यांचे दि.२८ सप्टेंबर १९५३ रोजी सान मारीनो, कॅलिफोर्निया, अमेरिका येथे निधन झाले. त्यांची कामगिरी जगाला वेडावणारी ठरली, हे येथे उल्लेखनीयच!

तुकारामनीती
भाग 39

# तैसे चित्त शुद्ध नाही । तेथे बोध करील काई ॥



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**संपूर्ण मानवाच्या उत्कर्षाचा इतिहास पाहू जाता, अचंबित करणाऱ्या अनंत बाबी वाचायला मिळातात आणि त्यापासून तुम्ही-आम्ही अजूनही अनभिज्ञ आहोत! हेच या सृष्टीचे गूढ आहे! अश्मयुगात प्राण्यांसारखा जगणारा रानटी माणूस आज इतर प्राण्यांना आपल्या काबूत करून तो सर्वश्रेष्ठ सिद्ध झाला आहे. ही उत्क्रांती एक दिवसांत नाही घडून आली. चार्लस डार्विनच्या अगोदर अनेकांनी जीवाच्या क्रांती- उत्क्रांतीचा परामर्श घेतलेला आढळून येतो. ते सर्व सिद्धांत मांडण्यासाठी अगदी ख्रिस्तपूर्व काळापासून तत्ववेत्त्यांनी मानवी मन आणि त्याच्या सहाय्याने होणाऱ्या शरीरातील मुलाग्र बदलाची महत्वपूर्ण मांडणी केलेली आढळून येते. ग्रीक तत्वज्ञ प्लेटो म्हणतो की, "मन आणि शरीर मूलभूतपणे भिन्न आहेत कारण मन तर्कसंगत आहे, याचा अर्थ मनाचे परीक्षण केल्याने सत्य होऊ शकते. याउलट, शरीराचा भाग असलेल्या इंद्रियांद्वारे आपण अनुभवलेल्या कोणत्याही गोष्टीवर आपण विश्वास ठेवू शकत नाही, कारण ते फसवले जाऊ शकतात." याच अनुषंगाने डार्विन 'एक्सप्रेषण' ग्रंथात लिहितो की "जसे मानवाचे विचार तशीच अभिव्यक्तीची भाषा," तर विसाव्या शतकातील शास्त्रज्ञ सिग्मंड फ्राइड "अचेतन मन हे मानवी वर्तनाचे प्राथमिक स्त्रोत आहे.**

हिमखंडाप्रमाणे, मनाचा सर्वात महत्वाचा भाग म्हणजे आपण पाहू शकत नाही. आपल्या भावना, हेतू आणि निर्णय प्रत्यक्षात आपल्या भूतकाळातील अनुभवांवर प्रभावशाली असतात आणि बेशुद्ध अवस्थेत साठवले जातात" असे लिहून फ्राइड मानवी मनाला अनन्यसाधारण महत्व असल्याचे स्पष्ट करतो. त्या नंतर अनेक विद्वजनांनी मानवी मनाला प्राधान्य देऊन संपूर्ण मानवी व्यवहाराचे केंद्र हे मनच आहे याचे अनंत दाखले दिलेले आपल्याला आढळून येते. याच अनुषंगाने संत तुकोबाराय मानवी मनाचे महत्व अत्यंत प्रभावशाली पद्धतीने मांडतात.

नाही निर्मळ जीवन । काय करील साबण ॥१॥
तैसे चित्त शुद्ध नाही । तेथे बोध करील
काई ॥धृ॥
वृक्ष न धरी पुष्पफळ । काय करील
वसंतकाळ ॥२॥
वांझा न होती लेकुरे । काय करावे भ्रतारे ॥३॥
नपुंसका पुरुषासी । काय करील बाईल
त्यासी ॥४॥
प्राण गेलिया शरीर । काय करिल वेव्हार ॥५॥
तुका म्हणे जीवनेवीण । पीक नव्हे नव्हे
जाण ॥६॥ (शा.अ.गाथा अ.क्र.७६५)

हा अभंग किंवा अन्य वारकरीवाङ्मय वाचल्यास सहजतेने वारकऱ्यांनी सर्वांगीण मानव कल्याण आणि त्याच मार्गाने भक्तीची वाट सोपी करण्याचा प्रयत्न केला आहे असे लक्षात येते.


प्रस्तुत अभंगात तुकोबारायसुद्धा मानवी चित्ताला अनन्यसाधारण महत्व देतांना त्याला जोडून विविध दृष्टांत देऊन प्राधान्याने मानवी मनाचे विश्लेषण करतात. एखादी व्यक्ती अंघोळीला महागडा-सुवासिक साबण घेऊन अंघोळीला बसली परंतु आंघोळीचे पाणीच घाणेरडे-दुर्गंधीयुक्त आहे! तेंव्हा ते सुवासिक आणि महागडे साबण काय कामाचे? त्याचबरोबर एखादे झाड वाढले आहे परंतु वसंत ऋतूत त्या वृक्षाला फुले-फळे येत नसतील तर वसंत आला काय नी गेला काय? एखादि सुंदर स्त्री आहे आणि तीचा पती सुद्धा तेवढाच धष्ठ्पुष्ठ-देखणा आहे मात्र ती स्त्री वांझ आहे. सौंदर्यवती असूनही ती स्त्री संतती निर्मिती करू शकत नाही. या उलट एखादा पुरुष धष्ठ्पुष्ठ-देखणा असला तरी तो नपुंसक आहे, त्याच्या धाष्ठ्पुष्ठ-देखणेपणा काय कामाचा? एखादे शरीर बलदंड-आकर्षक आहे, त्याला महागड्या वस्त्रअलंकारांनी नटविले-सजविले आहे, मात्र ते शरीर मुडदा आहे. तो साज-श्रृंगार काय कामाचा? हे सर्व दृष्टांत देऊन शेवटी कुणबी तुकोबा शेतकऱ्याचा 'शेत खूप सपाट असून काळी-सुपीक जमीन आहे मात्र पाऊस नाही कुठलीही सिंचन व्यवस्था नसेल तर ते शेत कितीही आणि कसेही असले तरी काय कामाचे?' हा दृष्टांत देऊन वरील सर्वच दृष्टांताप्रमाणे माणसाचे चित्त किंवा मनच शुद्ध नसेल तर त्या माणसाला सर्व प्रकारचे बोध काय कामाचे? इथे तुकोबा मानवी मनाची क्षमता प्रकट करण्यासाठी निर्मळ पाणी, वांझ झाड-स्त्री, नपुंसक पुरुष, मुडदा, पाणी नसलेले शेत इत्यादी सरळ साधे दृष्टांत देऊन आपला "चित्त शुद्धीचा" सिद्धांत पटवून देतात. संत कबीरजी सुद्धा मनाला अनन्यसाधारण महत्व देतांना

कबीर मनहिं गयन्द है, अंकुश दै दै राखु |
विष की बेली परिहारो, अमृत का फल चाखू ||

म्हणजे 'मानवी मनच गोविंद असून, जयाने मनावर ताबा मिळवला तो विषवृक्षाच्या सावलीत राहून सुद्धा अमृताची फळे चाखू शकतो.' असे आणि अन्य काही दोहे लिहून मानवाला मनावर अंकुश ठेवायला सांगतात. या शिवाय संत ज्ञानेश्वर आपल्या २८ अभंगाच्या हरिपाठ ग्रंथात, "मनोमार्गे गेला तो तेथे मुकला । ठायीच मुराला अनुभव॥" असे लिहून मनावर अंकुश ठेवणे म्हणजेच संपूर्ण विश्वावर नियंत्रण मिळवणे, विजय मिळवणे होय. याच अनुषंगाने माउली आपल्या ज्ञानेश्वरी ग्रंथातील चवथ्या अध्यायात

हें अर्जुना सकळ कुवाडें । जे अनुष्ठितां
अतिसांकडें ।
परी जितेंद्रियासीचि घडे । योग्यतावशें ॥१४३॥

या अगोदरच्या काही ओव्या आणि ह्या ओवीच्या आधारे 'ज्यांनी मनाच्या सहाय्याने आपली इंद्रिये जिंकली आहेत तेच अनुष्ठानांसाठी योग्य आहेत' असे सुचवून मनाचे महत्व अधोरेखित करतात. याशिवाय महात्मा गौतम बुद्धांनी आपल्या विपस्यना मार्गाने मानवी मनालाच उपदेशीत केले आहे. जगातील प्रत्येक प्रज्ञावंत व्यक्तिमत्वाने मानवी जीवनाला जर सदैव आनंदी आणि विकाररहित ठेवायचे असेल तर मनावर अंकुश असणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन केलेले आढळून येते.



हे सर्व मनाचे विकार आणि मनाचा व्यापार झाला, परंतु मानवी मन नियंत्रित करायचे कसे? हा मोठा कठीण आणि सर्वांनाच नित्य त्रास देणारा विषय आहे. त्यासाठी स्वामी विवेकानंद म्हणतात, "सर्व धर्मांनी ध्यानावर भर दिला आहे. ध्यानावस्था ही मनाची सर्वोच्च अवस्था आहे. तेंव्हा दररोज एकांतात ध्यान करीत जा, सारी कवाडे आपोआप उघडतील. भावनाप्रवनता ध्यानसमयी अगदी दाबून टाकावयास हवी. ती मोठी धोक्याची गोष्ट आहे. त्यासाठी तैलधारेप्रमाणे मन अखंडितपणे एकाच वस्तूवर लावून ठेवावयास हवे." म्हणजेच मानवी मनाच्या विविध छटा आणि रंग नियंत्रित करण्याला केवळ माणसाचे मन एकाग्र असणे अत्यंत आवश्यक आहे. माणसाच्या मनःपटलावर अनंत तरंग उठतात. क्षणाक्षणाला चंचल मन अगदी माकडासारखे इकडून तिकडे उड्या मारत असते, म्हणून इंग्रजीमध्ये मनाला 'मंकी माइंड' असे संबोधले जाते. मनाची एकाग्रता साधने म्हणजे जीवनात सर्वात मोठे ध्येय साध्य करणे आहे. सांप्रतकाळी मानवी मनाचा निग्रह करण्याचे दिवस आले आहेत. संपूर्ण भोवताल धावपळीने व्यस्त आहे. आज कुणाकडेच वेळ नाही असे सहजतेने बोलले जाते आणि काम काय आहे? उत्तर पटकन सापडत नाही. आज माणूस कस्तुरीमृगासारखा सुगंधासाठी रानोमाळ धावत सुटला आहे! आनंदाच्या शोधत तो रात्रंदिवस पळतो आहे! वस्तू, पैसा, सोने-नाणे, कपडे, महागड्या वस्तू मिळविण्यासाठी तो जीवाचे रान करत पळत सुटलाय! शांती-आनंद-विश्राम मिळवण्यासाठी तो वाट्टेल ते करायला तयार आहे! दुर्दैवाने ही अनाठायी धावपळ करतानाच तो आपले मूळ विसरून गेला आहे. मनुष्य मुळात शांतीस्वरूप आणि आनंदी असतांना त्याच्याच शोधात तो धावतो आहे! सुख-शांती-आनंद ह्या दर्शनी अथवा बाजारात विकत घायच्या बाबी नाहीत हेच आज आपण विसरून गेलो आहोत. ह्या सर्वच गोष्टी आपल्याकडेच आहेत, मात्र "परी तू जागा चुकलासी" या जगद्‌गुरू तुकोबारायांच्या अभंगाप्रमाणे या सर्वच समस्येची उत्तरे आपल्याकडे आहेत. आपण स्वतःचा शोध घेण्याचा नित्य प्रयत्न करणे आवश्यक आहे. पैसा, पद, प्रतिष्ठा, संपत्ती, गाडी, घर यासाठी सर्वांनी नक्की प्रयत्नरत राहणे योग्य असले तरी हे सर्व कमावण्यात स्वतःकडील सर्वश्रेष्ठ गमावण्याची वेळ येऊ नये!

त्यासाठी आज शाळा, महाविद्यालये, गावोगाव, शहराशहरात मनःशांतीसाठी प्रयत्न होणे अत्यंत अत्यंत गरजेचे आहे! आज आपण सार्वांनीच दररोज एक तास मनाचा निग्रह करून योगा-प्राणायाम-ध्यान-धारणा करण्यासाठी तयार होणे गरजेचे आहे. प्रत्येकजण मोबाईल मेनियाने झपाटला आहे. चालतांना, बोलतांना, खातांना, पितांना, शिकतांना आपल्याला मोबाईल हवा आहे. आपण मोबाईलचे व्यसनी झालो आहोत. क्षणाक्षणाला येणारे मिडीयावरील संदेश आणि नोटिफिकेशन यामुळे मानवी मनाची एकाग्रता संपूर्णतः भंग पावली आहे! एक काळ असा होता की, सकाळी उठल्याबरोबर आपण प्रार्थना किंवा "कराग्रे वसते लक्ष्मी" सारखा एखादा मंत्र म्हणून सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करायचो. आज मात्र आपण उठल्याबरोबर मोबाईल, झोपतांना मोबाईल आणि मेसेजेस पाहून डिस्टर्ब होत आहोत. सज्जनहो, आपल्याला खरंच शांती हवी असेल तर दारू-गुटखा-तंबाखू या व्यसनाएवढेच दिवसात काही तास तरी किमान आपल्याला मोबाईलपासून दूर रहावे लागेल अन्यथा अकाली अंधत्व, विक्षिप्तपणा, चीडचीडेपणा यातून बिपी, शुगर सारखे महाभयंकर रोग आपल्याला संपवून टाकतील! तेंव्हा चला योगा-प्राणायाम-ध्यान करून प्रस्तुत अभंगाप्रमाणे मनावर नियंत्रण ठेवून आपले जीवन कृतार्थ करूयात! असे झाल्यास खऱ्या अर्थाने तुकोबांच्या आणि त्याच अनुषंगाने सुरु असलेल्या तुकाराम नीतीचे सार्थक होईल यात तिळमात्र शंका नाही! जय तुकोबाराय!

# वीर माता : हीरा बेन मोदी



रवींद्र मुळे
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

आधुनिक केसरी

**काल एका प्रचारक कार्यकर्त्यांच्या माते बद्दल जो लेख लिहला तो अनेक स्वयंसेवक ,कार्यकर्ते आणि समाज जीवनातील अनेक लोकांस भावला. स्वयंसेवक आणि कार्यकर्ते यांची प्रतिक्रिया अशी की या दृष्टीने कधी आम्ही बघितलेच नाही किंवा असा विचार मनात आलाच नाही की त्या माऊली पुढे काही प्रश्न असतील ! त्यांच्या मनाची उलघाल काय होत असेल? कारण हा सगळा मनो व्यापार आहे. यात काही बंधने आहेत. आणि ही उदाहरणे आवती भोवती आहेत पणं लक्षात येत नाहीत. त्या मुळे हा धांडोळा कधी तरी घेण्याची गरज आहे हे सर्वांच्याच लक्षात आले.**

समाज जीवनातील मान्यवरांना हे सगळे माहीतच नाही ही त्यांची अडचण आहे. कारण प्रचारक ही व्यवस्था प्रसिध्दी पासून दूर ठेवण्याची संघाची पद्धत आहे. त्या मुळे ही व्यवस्था कशाच्या आधारावर चालते आणि यात कुठली जीवन मूल्ये सांभाळली जातात हे कधी लोकांस कळले नाही.

सन्यस्त जीवन जगणे म्हणजे सर्व संग परित्याग. तो मनो निग्रह जो ते जीवन अंगिकारत असतो त्याला सांभाळता येतो त्यासाठी तो जीवन मार्गात आणि दैनंदिन जीवनात काही नियमन करत असतो. पण त्यांनी ज्याचे बरोबर आपले भावबंधन तोडले असतात ते तर व्यवहारिक जीवन जगत असतात त्यांचे काय ? त्यांचा मार्ग अधिक कठीण असतो आणि तो म्हणूनच समजून घेणे गरजेचे आहे. काल उल्लेख केलेली वीर माता ही परंपरा खूप मोठी आहे. त्यांची ओळख जगाला नसते. स्वामी विवेकानंद जगाला माहीत झाले कारण त्यांच्या वीर मातेने स्वामी विवेकानंद याना त्यांनी असे जीवन जगण्यातील आपल्या मायेचा अडथळा दूर केला. असेच भारत मातेच्या सद्भाग्याने देशाला जे पंतप्रधान मिळाले ते नरेंद्र मोदी हे याच प्रचारक परंपरेतील. आणि त्यांच्या मातोश्री हीरा बेन ह्या याच वीर माता मधील एक.हीरा बेन यांचा संसार एका सामान्य महीलेसारखाच सुरू झाला होता ना. त्यांच्या त्या छोट्या वडनगर गावात त्या मोलमजुरी करत संसाराच्या चाकाला ओढत होत्या. त्यांच्या मुलाला म्हणजे आजच्या नरेंद्र यास त्या नी कुठल्याही महत्वाकांक्षा देवून संस्कारित केले नव्हते .अगदी तसेच जसे जिजा मातेने शिवाजी महाराजांस राजा होण्याचे संस्कार नव्हते दिले रयतेचे संरक्षण कर असा संस्कार दिला. रयतेने त्यांना राजा केले. आपली मुले शिकावी आणि संस्कारित व्हावी एव्हढी मर्यादित अपेक्षा हीरा बेन यांची होती. मुले शिकावी आणि त्यांनी आपले आज चे मोल मजुरीचे दिवस संपवून म्हातारपणी आधार बनावे अशी सामान्य कल्पना त्यांची पण होती. सगळ्यात नरेंद्र वेगळा विचार करायला लागला . त्याचा संघ शाखेशी संबंध आला होता.आणि मधुकर राव भागवत, लक्ष्मण राव इनामदार अशा ज्योती पुंज जीवनी संपर्कात आल्यावर अशा प्रकारचे सन्यस्त जीवन जगण्याचे आकर्षण त्यात निर्माण झाले होते. असे जगणारे अनेक मंडळी हीरा बेन यांचे घरी त्यावेळी येवुन गेलेले होते आणि हीरा बेन यांनी त्यांना आपल्या मुला प्रमाणे ममत्व दिलेले होते नरेंद्र एक दिवस जेंव्हा त्यांना म्हणाला मला सन्यस्त जीवन जगायचे आहे . मला घरी राहता येणार नाही तेंव्हा तुलनेने कमी जग पाहिलेल्या हीरा बेन ला काहीं कळले नसेल कदाचित पण घर सोडून नरेंद्र निघाले आणि त्यांनी संघाच्या कामात स्वताला झोकून दिले आणि बघता बघता उत्तुंग व्यक्तिमत्व बनले . नाव लौकीक मिळवण्यासाठी त्यांनी हे केले नाही पण त्यानी जो कर्म योग शिकलेला होता त्यातून ते मुख्य मंत्री बनले . आता पंतप्रधान बनले. पण हे सगळे घडत असताना हीरा बेन कुठे होत्या ? प्रचारक निघण्याचा अर्थ त्यांना हळू हळू कदाचित समजला असेल . पण नंतर, आपला मुलगा त्याला आपण जन्म दिला पण एकदा त्याला समाजा प्रती समर्पित केले आहे त्या मुळे त्याच्यावर आपला अधिकार नाही हे अवघड सत्य हीरा बेन ज्या सहजतेने आपल्या व्यवहारातून प्रगट करतात त्यामुळे त्यांचे वीर मातेचे रूप अजूनच मनोहारी वाटू लागते. कारण त्या कायम प्रचारकाच्या माता राहतात किंबहुना त्यांच्या अशा राहण्या मुळे नरेंद्र मोदी हे मुख्यमंत्री, पंतप्रधान होतात लोकेषणा आणि नावलौकिक मिळवतात पण त्यांच्यातला प्रचारक जिवंत राहतो तो हीरा बेन यांच्या मुळे. नरेंद्र मोदी नावाचे व्यक्तिमत्व आज जगाला माहीत झाले. पण त्यांच्या जीवनातील दीर्घ काळ हा असा होता जेंव्हा ते. कुठे आहेत काय काम करतात त्यांची जेवणावी राहण्याची व्यवस्था काय आहे याची त्यांना काही माहिति पण नसेल. आम् आदमी सारखे किंवा उरलेल्या त्यांच्याच मुलासारखे तो लग्न नोकरी का नाही करत असा प्रश्न त्या काही न शिकलेल्या मातेला पडणे स्वाभाविक होते पण त्या वेके स दाखवलेली स्थितप्रज्ञ अवस्था त्यांना आता ही उपयोगी पडते कुठल्याही आईला या वयात असे वाटू शकते



आपण आपल्या मुख्यमंत्री असलेल्या मुलाबरोबर राहवे किंवा पंतप्रधान झाल्यावर पंतप्रधान निवासात राहवे तेथे नोकर चाकर दिमतीला असतील. कुठे जाण्यास गाडी मिळेल. पण हीरा बेन आपल्या दुसऱ्या मुलाकडे राहणे पसंत करतात रिक्षाने जा ये करतात या वयात वेळ पडली तर रांगेत उभ्या राहतात कारण काय याचे? संघाच्या प्रचारकाच्या कठोर व्याख्येत नरेंद्र मोदी बसत नसतील ही पणं त्यांची प्रेरणा आणि मनस्थिती प्रचारक असण्याची च आहे . त्या मुळे हीरा बेन या आधी प्रचारकाचीमाता आहेत आणि मग पंतप्रधान या सवैधानिक व्यक्तीच्या आई आहेत. जसे एखाद्या ला एखादे कार्यक्षेत्र मिळते जिल्हा ,विभाग तसे त्याला संपूर्ण भारत किंवा विश्वच कार्यक्षेत्र मिळाले आहे आणि जसे कुणाला संघ , कुणाला अभाविप कुणाला विहींप तसे मोदींना राजकीय क्षेत्र मिळाले. त्या पदावर राहून ही एका विश्वस्ता च्या भूमिकेत वावरणे हे तेंव्हाच जमते जेंव्हा हीरा बेन सारखी माता मिळते. वर्षातून जेंव्हा त्यांची भेट होते तेंव्हा एकीकडे त्या माऊलीच्या चेहर्यावर कौतुक असते दुसरीकडे मुलाची काळजी असते आणि त्याच वेळेस एक अलिप्त पणा पण असतो. या सर्व काळात आपला मुलगा खूप मोठा झाला हे त्यांना कळले. अनेक विचार त्यांच्या मनात आले असतील आपले बाकीचे मुले, मुलगी नातेवाईक यांचा पण उत्कर्ष व्हावा नरेंद्रनं कुठे तरी शब्द टाकावा काही तरी आपले वजन वापरून फायदा करून द्यावा. पण नरेंद्र मोदी यांच्या गेल्या ३० वर्षातील प्रशासकीय कारकिर्दीत आणि आधीच्या राजकीय कारकिर्दीत असा दोष त्यांच्या माठी आला नाही. ही त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वात मोठी शक्ती आहे आणि या शक्तीचे संवर्धन खऱ्या अर्थाने माता हीरा बेन यांनीच केले आहे. हे सगळे जे आहे ते सोपे नाही हे नक्कला करणाऱ्या किंवा खालच्या पातळीवर टीका करणाऱ्या आणि खानदानी पारिवारिक राजकारण करणाऱ्यांच्या समजण्याच्या बाहेर चे आहे. देशासाठी जगताना पथ हा अग्निपथ असतो. त्या वरून जाताना हीरा बेन सारखे वीर माता जेंव्हा पाठीशी असतात तेंव्हा नरेंद्र मोदी घडतात. कोणत्या आईला असे वाटणार नाही की आपला मुलगा दिवाळीला आपल्या घरी असावा ? आज आपण मोदी यांस सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करताना बघतो. पण त्या पूर्वी जेंव्हा पासून त्यांनी प्रचारक जीवनाचे व्रत स्विकारले तेंव्हापासून ते दिवाळीला घरी गेले नसतील आणि हे ह्या वीर मातेने सहज स्विकारले असेल. आपल्या अपत्या बाबतीत स्वामित्व भावना सोडून द्यायची आणि जगाच्या कल्याणासाठी मुलाशी संबंध कमी करायचे या साठी खूप मोठे धैर्य लागते आणि ती वीरता युद्ध भूमीवरील युद्धातील वीरते इतकीच महत्वाची असते . म्हणून या माता वीर माता आहेत. संपूर्ण जगाला झुकवणारे नरेंद्र मोदी हे जेंव्हा हीरा बेन यांस भेटायला जातात तेंव्हा नतमस्तक होतात आणि आशीर्वाद घेतात आणि आपण सगळे ते दृश्य मनात साठवून ठेवतो . ते नतमस्तक होणे म्हणजे या वीर माते प्रतीचा श्रद्धा भाव असतो. आणि सगळा भारत याचा साक्षीदार असतो.

# वंजारी सेवा संघ: समाज बांधिलकीचे प्रगल्भ संघटन!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**भारतीय स्वातंत्र्याच्या पहिल्या काही दशकानंतर समाजातील विविध घटकात शिक्षणाच्या अनुषंगाने जागृती होत गेली. समाजाला आपल्या विविध कक्षांचे ज्ञान व्हायला लागले आणि समाजात अमुलाग्र बदल होण्याच्या दिशेने हळूहळू काम सुरु झाले. त्याच धर्तीवर विविध जाती-धर्माच्या लोकांची अनेकविध संघटने उभी राहू लागली. आपल्या लोकांना एकत्र करून त्यांच्या जागृतीची आणि त्यांच्यामध्ये एकोप्याची भावना वृद्धिंगत करण्यासाठी विविध जातींची संघटना उदयास यायला लागल्या. तसे पहिले तर महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जातीअंतासाठी आपले मूलगामी तत्वज्ञान अधोरेखित केले होते. बाबासाहेबांना जातीच्या स्तरावर अनंत चटके खावे लागले होते. बाबासाहेबांना या देशातील जात संपुष्टात आणावयाची होती, मात्र दुर्दैवाने जाती आणखीनच घट्ट व्हायला लागल्या. यासाठी बहुसंख्य आणि प्रस्थापित जातीनीच प्रकर्षाने आपापली संघटने उभी करायला प्रारंभ केला. याचा परिपाक असा झाला की, छोट्या-छोट्या दुर्लक्षित जातींच्या आपले संघटन उभे करायला प्रारंभ केला.**

महाराष्ट्रात अनेक जाती असून त्या जातीच्या लोकांनी आपली संघटने स्थापन केलीं असून त्यातून जागृती करण्याचा मुलभूत प्रयत्न केला आहे. याच अनुषंगाने साधारणतः मागील दहा वर्षापूर्वी श्री राहुल जाधवर, श्री देवेंद्र बारगजे, श्री अमोल कुटे, श्री बाजी दराडे, श्री विष्णू जाधवर आणि अन्य वंजारी जातीच्या काही उच्च शिक्षित, शिक्षक, आणि नौकरदार युवकांनी आपलेही एक संघटन असावे या हेतून राष्ट्रसंत भगवानबाबा यांच्या कार्य आणि अस्तित्वाने पवित्र झालेल्या श्रीक्षेत्र भगवानगड येथे "वंजारी सेवा संघ" संघटनेची स्थापना केली. "ऐक्यं बलं समाजस्य तद्भावे स दुर्बलः| तस्मात् ऐक्यं प्रशंसन्ति दृढं राष्ट्र हितैषिणः||" या संस्कृत सुभाषिताप्रमाणे वंजारी जातीतील पुढच्या पिढीतील लोकांना संघटीत करून सामाजिक ऐक्य निर्माण करण्याच्या हेतूने या संघाची स्थापना झाली. तसे पहिले तर जंगल-जंगल फिरून, भटकंती करून, लोकांना रसद पुरविणारी वंजारी जात ही मुळातच दुर्लक्षीत आणि उपेक्षित! वंजारी या नावातच सर्वकाही आहे. जे लोक वनात राहून वनातील मिळणाऱ्या गोष्टी जसे डिंक, मध, औषधी वनस्पती जमा करून गावात आणून विकायच्या आणि त्यावर उदरनिर्वाह करणार ही काटक जात! मुळ राजस्थानातून व्यापाराच्या निमित्ताने भारतभर विखुरलेली ही जात देशाच्या एकूण लोकसंखेच्या मानाने अत्यल्प आणि कायम दूर्लक्षितच! एक खडतर इतिहास-भूगोल असतांना सुद्धा कालौघात या जातीच्या लोकांनी आपल्या काटक-दणकट-बुद्धिमान-आक्रमक या निसर्गदत्त गुणांच्या जोरावर भटकंती बंद करून डोंगर पायथ्यासी, जिथे जागा भेटेल तेथे वाडी-वस्तीच्या रूपाने स्थायिक झाले. मुळातच कष्टाळू आणि वारकरी सांप्रदायासी एकनिष्ठ असलेल्या या जातीतील स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या एक-दोन पिढ्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या, कारण कोणत्या गोष्टींचे ज्ञान नसल्यामुळे वंजारी जातीच्या लोकांनी प्रथम समाजात आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि नंतर ही जात महाराष्ट्रात स्थिरस्थावर झालेली पाहायला मिळते.

त्याच अनुषंगाने उपरोक्त तरुणांनी "सङ्घे शक्तिः कलौ युगे" या न्यायाने संघटन शक्ती जागृत समाज ऋण फेडण्याचे ठरवले. या संघटनेच्या माध्यमातून गावागावात शिक्षण-आरोग्य या दृष्टीने प्रचार-प्रसार करून लोक जागृती करणे, अंधश्रद्धा, जुन्या वाईट चालीरीती टाकून देणे, कालबाह्य गोष्टींना जीवनात स्थान न देता आपले जीवन एका ध्येयाने प्रेरित करण्यासाठी वंजारी समाजातील तरुणांना जागृत करण्याचे महत्कार्य या संघाने हाती घेतले. याचाच परिपाक म्हणजे मागील दहा वर्षात वंजारी सेवा संघाच्या महाराष्ट्राच्या सर्वच्या सर्व जिल्ह्यात शाखा असून त्या त्या जिल्ह्यातील तालुक्यात शाखा स्थापन होत आहेत आणि आता गाव तिथे शाखा असे अभियान सुरु आहे. आत्तापर्यंत वंजारी सेवा संघाचे संत भगवानबाबा संस्थान औरंगाबाद, श्री क्षेत्र भगवानगड, लातूर, बार्शी, पुणे येथे भव्य-दिव्य मेळाव्यांच्या कार्यक्रमांचे आयोजन केले असून मोठ्या प्रमाणात समाज बंधू-भगिनींना सन्मानित केले आहे. आत्तापर्यंत वंजारी सेवा संघाने समाजातील उपेक्षित आणि दुर्लक्षित लोकांना व्यासपीठ प्राप्त करून देतांना समाज भूषण आणि इतर सन्मान देऊन गौरव केला आहे. वंजारी सेवा संघाच्या माध्यमातून राष्ट्रसंत भगवानबाबा जयंतीचे आयोजन करण्याबाबत समाजामध्ये जागृती करून भगवानबाबांच्या पुण्यतिथी बरोबरच जयंती सुद्धा मोठ्या प्रमाणात साजरी करण्यासाठी प्रबोधन करण्याचे कार्य वंजारी सेवा संघाने केले आहे. त्याचबरोबर वंजारी समाजातील गुणवंत, प्रज्ञावंत आणि शासकीय पदावर विराजमान झालेल्या सन्माननीय बंधू-भगिनींचे सत्कार सोहळ्याचे कार्यक्रम घेण्यात आले आहेत.




लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या अकाली जाण्याने समाजात मोठी पोकळी निर्माण झाली होती. समाज सैरभैर झाला होता. त्या काळात लातूर येथे वंजारी सेवा संघाच्या वतीने दोन दिवशीय व्याख्यानमाला आयोजित करून समाजाचे प्रबोधन करण्याचा यशस्वी प्रयत्न करण्यात आला. त्याच अनुषंगाने दिनांक १ जानेवारी २०२३ रविवार रोजी नाशिक येथे वंजारी सेवा संघ, महाराष्ट्र प्रदेश चा मेळावा आयोजित केला असून या मेळाव्यात माजी आमदार श्री गोविंद अण्णा केंद्रे, भटके विमुक्त चळवळीचे अभ्यासक तथा सदस्य नीती आयोग भारत सरकार श्री दादा इदाते, ओबीसी चळवळीचे मार्गदर्शक आणि मंडलस्तंभ उभारणारे माजी आमदार डॉ.नारायणराव मुंडे, मा.आमदार तोताराम कायंदे, भगवान सेनेचे सरसेनापती श्री फुलचंद कराड, त्याचबरोबर डॉ.दिपाताई गीते, श्री राजेंद्र राख, श्री अरुण खरमाटे आदि मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. या मेळाव्याचे आयोजन वंजारी सेवा संघ कोकण विभागीय कार्यकारिणीने केले असून यासाठी प्रदेश उपाध्यक्ष प्राचार्य डॉ.शंकर मुंडे, कोकण विभाग अध्यक्ष श्री मोहनराव नागरगोजे, प्रदेश संघटक नितीन गर्जे, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष श्री नागेश जाधवर, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रा.अच्युतराव वनवे, रायगड जिल्हाध्यक्ष श्री गोरख आघाव, यांच्यासह कोकण विभागातील सर्वच पदाधिकारी अहोरात्र परिश्रम घेत आहेत. तेंव्हा रत्नागिरी येथे संपण होणाऱ्या या मेळाव्यास जास्तीत जास्त बंधू-भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन वंजारी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश अध्यक्ष श्री राहुल जाधवर, प्रदेश कार्याध्यक्ष श्री देवेंद्र बारगजे, प्रदेश महासचिव इंजि.श्री बाजी दराडे, प्रदेश उपाध्यक्ष श्री अमोल कुटे, महिला प्रदेश अध्यक्षा डॉ.मंजुषाताई दराडे, महिला प्रदेश कार्याध्यक्षा सौ.साविताताई मुंडे, युवा आघाडी प्रदेश अध्यक्ष श्री प्रकाश आवाड, युवा प्रदेश कार्याध्यक्ष श्री नितीन सांगळे तसेच तमाम पदाधिकारी बंधू-भगिनींनी केले आहे. या संपन्न होणाऱ्या मेळाव्यास उपस्थित राहून आपण आपली सामाजिक बांधिलकी जपून संघटनेत काम करणाऱ्या हातांना बळ द्यावे. भविष्यात वंजारी सेवा संघाच्या वतीने समाजातील होतकरू विद्यार्थ्यांना मोठ्या शहरात उच्च शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षा तयारी करणाऱ्या विध्यार्थ्यांना सोयी-सुविधा पुरविण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. तरी समाज बांधवानी भविष्यातील या योजनांना सहकार्य करण्याचे आवाहन वंजारी सेवा संघाच्या वतीने करण्यात येत आहे.

# जगण्यासाठी अजून काय हवं?

आधुनिक केसरी

आई, एक बाप,
एक भाऊ, एक बहिण,
असं एखादं घर हवं,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक मित्र, एक शत्रु,
एक सुख, एक दु;ख,
असं साधं जीवन
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक प्रेयसी, एक अर्धांगिनी,
एक खरं प्रेम, एक भक्क्म आधार,
यात कुठेही नसला प्रेमाचा अभाव तर,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक सुर्य, एक चंद्र,
एक दिवस, एक रात्र,
फक्त सगळं समजायला हवं,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक शक्ती, एक भक्ती,
एक सुड, एक आसक्ती
ठायी असेल युक्ती तर,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

थोडा पैसा, थोडी हाव,
थोडा थाट, थोडाबडेजाव,
सगळयांच्या तोडी आपलंच नाव,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक नोकरी, एक छोकरी,
दोन मुलं अन खायला भाकरी,
उत्तम प्रकारची जर असेल चाकरी,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक समुद्र, एक नदी,
एक शांत, एक अवखळ
जीवनात असली जर एक तळमळ
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

एक इच्छा, एक आशा,
एक मागणं, अक अभिलाषा,
मनात भरलेली सदा नशा,
जगण्यासाठी अजुन काय हवं ?

## ये बा तु नवंवर्षा...

येबा तु नवंवर्षा...
श्रमणाऱ्या हातांना काम दे
कष्टाला दाम दे;
अज्ञानाचा तिमिर भेदण्या
ज्ञानाचा तु प्रकाश दे...

धन-धान्याची रास दे
भुकेल्यास घास दे,
नि सुखाचा श्वास दे...
कष्टकरी बळीला तु
सुख शांतीचं वरदान दे...

विज्ञानाचा तु सांगती
अंश्रध्दा-अज्ञानाला मात
दे...
अविचारांच्या गर्तेतुन
पडण्या
बाहेर बहुजना तु हात दे...

जाती-पाती विषमता
करूनिया
भेदभाव,छळतात बहुजना
इथले हे गांव-रावं
या बुध्दीहिनांच्या मनी
समता
रूजविण्या तयांना तु
विवेकी बुध्दी दे...

स्वार्थी,सत्तापिपासु
पुढाऱ्यांना लोकसेवेचं
व्रत दे,
ये बा तु नवंवर्षा
जनी आनंद हर्ष घेऊनी ये
ये बा तु नवंवर्षा करूनिया
स्वागत तुझं वंदीतो...

गौतमकुमार रामदास
निकम
चाळीसगांव,
सुसंवाद-९८२२०६७०५५




## नवे वर्षे आले...!




फुलांची उधळण ही
साऱ्या अंगणात झाली,
दिवस हा उगवला
आज धरती नटली.
मानवतेच्या मार्गात
उठली होती ही ज्वाला,
मोठा संघर्ष करून
गुंफूया सुखांची माला.
नसानसातून जोश
चित्ती उधळू दे गडे,
प्रगतीचा हात धरू
सगळ्या जगाच्या पुढे.
शुन्यातून आता मात्र
जिद्दीने विश्व उभारू,
विज्ञानाच्या प्रकाशाने
भव्य-दिव्य क्रांती करू.
चैतन्य ऱ्हदयी घेऊनी
नैराश्याची होळी करू,
स्फुर्ती मनात आणून
उत्कर्षाचा मार्ग धरू.
नवीन युगाचे गाणे
आनंदाने गाऊ मनी,
चांगले संकल्प करू
या नव्या वर्षाच्या दिनी...!

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४.

## "नववर्ष"

वारा वाहे मंद धुंद
नवा दिस नवी रात
मनी दाटे तो आनंद
रानी वनी पक्षी गात..!

क्षण आले बहरुन
हृदयात एक श्वास
प्रण गेले थबकून
तैसा होतो मज भास..!

प्रीत अशी खुलू यावी
सप्न येई पूर्णत्वास
फुलांसवे ती फुलावी
जगण्याला मिळे आस..!

झाले आकाश मोकळे
नववर्ष उदयास
खेळ रात्रीस चालला
चंद्र तारे स्वागतास..!

मना मनातली गुढी
प्रसंगात उभारावी
हर्ष होईल तेव्हाच
सृष्टी साभार फुलावी..!

©प्रदीप बडदे, नवी मुंबई.
मो. ९५९४०२७९९५




## 2022 बाय बाय




नको विदेशी
वापरा स्वदेशी
हायफाय संस्कृतीला
कायमचा बाय बाय
2022 बाय बाय
भ्रष्टाचारान पिळवणूकनं
सर्वसामान्य घाबरलायं
नुसती पैशासाठी
उठाठेव हाय हाय
2022 बाय बाय
रेव पार्टीचा
धांगडधिंगा हाय
माणूसकीला माणूस
विसरत जाय विसरत जाय
2022 बाय बाय
संकटा मागून संकट
आता नव्यानं कोरोना
सावट येत जाय
या संकट परत जाय
शेतकरी आत्महत्या
वाढत जाय
2022 बाय बाय
महागाई बेरोजगारीने
कळस गाठलाय
खाजगीकरण कंत्राटीकरणानं
ऊपासमार वाढत जाय
2022 बाय बाय
सध्याच सरकार
लुटारू विश्वासघातकी
नैतिक मूल्ये लोकशाही
संविधान पायदळी
तुडविणारं हाय निर्लज्जपणाचा
कळस गाठलाय
ह्या सरकारला
नववर्षात करा बाय बाय
2022 बाय बाय
आतंकवादी दुष्मण राष्ट्र
चीन पाकिस्तान
पासून धोका हाय
2022 बाय बाय
2023 हे नववर्ष
तुम्हा आम्हा सकलजना
सुखमय आंनदमय जाय

- मल्हारराव नाचण डोणगावकर
औरंगाबाद मो. 9637937579

## बाकी काही नाही

आता तरी बदल वागणे , बाकी काही नाही
मुखी असू दे गोड बोलणे, बाकी काही नाही.
का करतो हाव एव्हढी सगळे आहे हाताशी
शोभत नाही सदा रडणे, बाकी काही नाही.
पद, प्रतिष्ठा ,नाव कागदावरचे आहे क्षणिक भावा
आवडत नाही टेंभा मिरवणे, बाकी काही नाही.
कित्येकांची केली फसवणूक मालामाल तुझी हवेली
मिळेल का रे झोप सुखाची, बाकी काही नाही.
देहावरती सुवर्णचांदी बोटात हिरेमोत्यांच्या अंगठ्या
पसंत नाही कुणा हिनवणे, बाकी काही नाही.
मातीचे हे शरीर नश्वर ,गळून जाईल चेहराकांती
नको गर्व त्या गौर वर्णाचा ,बाकी काही नाही.
माज नको रे श्रीमंतीचा ,राजाचा रंक होतो बरं
माझे आपले तुला सांगणे, बाकी काही नाही.

रज्जाक शेख
श्रीरामपूर 9665778558

## सांज उतरता..



गळतात पाने सोडवून मिठी पून्हा भेटी-गाठी होणे नाही..
ऊन सावल्यांचा आभाळात खेळ घातलेला मेळ झुलताना..
झेलला उन्हाळा चिंब पावसाळा हिवाचा हिवाळा हिमतीने..
सूख दुःखाठायी भिडले संगती अंगती-पंगती सोबतीने..
सांज उतरता अंधुकली माया अंधाराची छाया गडदली..!

महादेव बी. बुरुटे, शेगाव, ता. जत, जि. सांगली
मो. 9765374805

## नव वर्षा ..

पक्ष्याने सहज यावे
नीतळ हवे सरोवर
नव वर्षं सुखी व्हावे
सजवू अशी धरोवर

गुलाबी सरती रात्र
आठवण ही मनोहर
उष:कालआशादायी
हवा तितकाचं सुंदर

स्वागत नव वसंताचे
सजवून ठेवले मखर
दूर ठेवा कडवटपणा
स्वभावा हवी साखर

नको डि जे धिंगाणा
कोकिळा गाई सुस्वर
वेदना सरल्या रात्री
आला उदया भास्कर

कसे रहावे वर्षाने या
नसेल हाती खरोखर



कर्म करावे आपण
हे ही तितके बरोबर

पिवळी पाने समर्पीत
नवपालवी आल्यावर
नवरी दिसते धरोवर
रे हिरवत्व ल्याल्यावर

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## मला जगायच संघर्ष करायला

मला जगायच संघर्ष करायला
डोळ्यात भरुन ठेवलेले स्वप्न
प्रत्यक्षात बघायला मला जगायच
माझ्या छोट्याश्या पंखात
बळ निर्माण करायला
स्वप्न ठेवून उराशी
शिकायचे आता उडायला
मला जगायच
मी दाबलेले हास्य
प्रत्यक्षात हसायला
मला जगायच
संघर्ष करायला
ध्येयाचे शिखर गाठायला
जिवनात आनंदाचा
गुलाल उधळायला
मला जगायच प्रेम करायला
जिवनात आलेले प्रत्येक क्षण
आनंदी बनवायला
मला जगायच संघर्ष करायला

- लक्ष्मण वाल्डे -कन्नड
मो.नं-888606068




## एक जानेवारी




आनंदाचा नि हर्षाचा
सोहळा साजरा करूया
उगवतीच्या नववर्षाचा
करूया नवे संकल्प
टीकवूया नाती
जनसेवेचे व्रत
घेवूया हाती
निसर्गाच्या कुशीत
फुलली धरा
मनाला भुरळ घाली
तो गंधीत वारा
मनातील कटूता
विसरूया सारी
सलोख्याचे तोरण
बांधूया दारी
किलबिल पक्ष्यांचा
नभी उडाला थवा
खुलवूया रंग
चैतन्याचा नवा

- रवींद्र व्ही. चालीकवार
मो.9011559106



# संकल्प करा विचारपूर्वक



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**2023 सालात आपण पदार्पण केले आहे. कालनिर्णय, महालक्ष्मी,सनातन, दिनदर्शिका आणि अशा अनेक दिनदर्शिका बाजारात आलेल्या आहेत.. तसेच नव्या वर्षाच्या रोजनिशी अर्थात डायऱ्या बाजारात आलेल्या आहेत. गेल्या बऱ्याच वर्षापासून मी गीता प्रेस गोरखपुर ची रोजनिशी- डायरी घेत असतो .आता ही ती आणली आहे. काही वर्षांपूर्वी खूप प्रकारची शुभेच्छा कार्डही विक्रीला येत होती. आताही येतात परंतु त्याच एवढा आकर्षण राहिले नाही. आता व्हाट्सअप आणि फेसबुक वगैरे मुळे नववर्ष शुभेच्छा कार्ड पाठवण्याची पद्धत जवळपास बंदच झाली आहे. त्याऐवजी व्हाट्सअप वर शुभेच्छा दिल्या जातात.**

नवीन वर्षाचे निरनिराळे वैयक्तिक आणि सामाजिक निर्माण होणारे संकल्प केले जात असतात. खरंतर नवीन वर्षाचे संकल्प करण्यापूर्वी गतवर्षात आपण काय ठरवले होते, काय संकल्प केले होते, ते कितपत पूर्ण झाले याचा विचार करणे हे तेवढेच आवश्यक आहे. त्यामुळे नवीन वर्षाच्या वळणावर आपण काय करायला हवे ते ठरविता येते. संकल्प म्हणजे काय तर आपणच आपल्याला दिलेले जे वचन असते. आणि आपण जर स्वतः दिलेले वचन जर पाळू शकत नसलो तर दुसऱ्याला दिलेले वचन कसे पाळणार ? तेव्हा आपण म्हणतो ना वचनाला जागला तर... त्यात याच गोष्टीचा अंतर्भाव असतो, आणि त्यातून एखादी गोष्ट ठरवून कोणाला काही देणे ह्यात आपण आपला सकारात्मक बदल किंवा सकारात्मक विचार पुढे नेऊ शकतो.. नवीन वर्षात आपण अनेकविध संकल्प करू शकतो. त्यात आपण काही वैयक्तिक स्वरूपात गोष्टी करायचे ठरवतो तर काही सामाजिक देणे."देणे समाजाचे" म्हणून ते करायचे असतात. वैयक्तिक मध्ये वाचनाचा संकल्प करणे, लिखाणाचा संकल्प करणे, आपल्या आरोग्य विषयी काही काळजी घेणे, सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे, व्यसनापासून दूर राहणे,

सामाजिक गोष्टी मध्ये पर्यावरण, प्रदूषण, वृक्ष लागवड, स्वयंसेवी संस्थांना मदत करणे, आपल्या घरात आपण टाकून दिलेली आहे परंतु वापरण्याजोगी कपडे असल्यास ते त्या त्या संस्थाला देणे, गरजूंना मदत करणे एखाद्या वाचनालयाला पुस्तकांची भेट देणे. सामाजिक कार्यात किंवा आपण सर्वांशी निगडित एखादा संकल्प करतो त्यावेळेला आपण केलेल्या संकल्प हा इतरांसाठी महत्त्वाचा आहे ,जसा जो तो आपल्यासाठी आहे आणि आपणच जर त्याचे उल्लंघन केलं तर त्यापासून आपल्या होणाऱ्या नुकसाना बरोबरच इतर अनेकांची नुकसान होऊ शकते त्यामुळे ही जाणीव मनामध्ये प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे आणि अशी जाणीव जर आपल्या मनात निर्माण झाली तरच आपण केलेले संकल्प पुर्णत्वास नेऊ शकतो. जसे आपल्याकडून जर प्रदूषण आणि पर्यावरणाची हानी होत असेल तर ती आपल्याला जर त्रासदायक आहे पण त्याचबरोबर त्यामुळे असंख्य लोकांना त्यापासून उपद्रव होऊ शकतो त्यामुळेच ही जाणीव महत्त्वाची आहे.

आपली प्रतिष्ठा ही सुद्धा संकल्प करताना महत्वाची असते. म्हणजे जसे संकल्प करताना आपले समाजातले स्थान, मित्र मंडळीतले स्थान, नातेवाईकांमध्ये स्थान, अशा सर्व गोष्टींचा अंतर्भाव होतो आणि आपण जे संकल्प जाहीर करतो ते जर पूर्ण केले नाही तर त्यामुळे आपल्या प्रतिष्ठेला धोका पोहचतो म्हणजेच संकल्प करताना प्रतिष्ठा ही सुद्धा प्रेरणाच असते. त्यासाठी हा विचार होणे आवश्यक आहे. म्हणजेच आपण जे काही संकल्प करतो ते जाहीर करणे आवश्यक आहे आणि फायद्याचा सुद्धा आहे. भ्रष्टाचार मुक्ती अभियानास सहकार्य करणे थोडक्यात भ्रष्ट मार्गाने काम करून न घेणे. रस्त्यावर वाहन उभे करून अडथळा निर्माण न करणे. कार्यक्रमात डी.जे. सारखे वाद्य वाजवून ध्वनी प्रदूषण करणे टाळायला हवे. वृक्षतोड करणे टाळावे त्याऐवजी वृक्षारोपण करावे. एक तरी झाड लावण्याचा आणि जगण्याचा संकल्प करावा. पाण्याचा योग्य वापर करणे आणि अनावश्यक वापर करण्याचे टाळावे. स्त्री भ्रूणहत्या, स्त्री अत्याचार विरोधात अभियानास मदत करणे, प्लास्टिक पिशव्यांचा किंवा हानिकारक प्लास्टिक चा वापर न करणे. सार्वजनिक जागी कचरा करणे, गुटखा पुड्या टाकणेआणि अस्वच्छता करणे टाळायला हवे. कुठलेही व्यसन न करणे.

याप्रकारे हे जे सामाजिक जाणीव मनात ठेवून करायचे संकल्पन ते प्रत्येकाने करणे आवश्यक आहे. जेणेकरून त्यामुळे आपल्यालाही आणि संपूर्ण समाजालाही त्यापासून काही धोका पोहोचू शकत नाही व आपले आरोग्य धोक्यात येत नाही चांगले कार्य करणाऱ्या संस्थेला काही आर्थिक मदत करता आल्यास ती करावी. अनेक सेवाभावी संस्था आहेत, निराधार मुलांना सांभाळून त्यांचे राहण्याचा शिक्षणाचा खर्च करून बऱ्याच संस्था समाजात चांगले कार्य करत आहेत, तील अनेक मुली आज उच्च शिक्षण मोठ मोठ्या वर नोकरी करत आहेत. त्यांना आर्थिक मदत करणे किंवा एक दिवसाचे अन्नदान, त्यांना ड्रेस,पुस्तके, वगैरे साठी मदत आपण करू शकतो. तर आपल्यालाही चांगला कार्य केल्याचे आत्मिक समाधान मिळत.

राजकीय नेत्यांनी त्यांच्या स्वागताचा होणारा हार, गुच्छ, होर्डिंग, यावर होणारा मोठा खर्च टाळावा. नवीन वर्षात शेतीमालास चांगला भाव मिळण्यासाठी, बेरोजगारी कमी करून महागाई कमी करण्याचा संकल्प करावा. युवाशक्तीचा वापर फक्त निवडणुकीच्या कामी करणे बरोबरच त्यांच्या बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे.

राजकीय नेत्यांनी बोलताना मोजकेच आणि सगळ्यांच्या हिताचे बोलावे ज्यामुळे वाद विवाद होतील आणि सामाजिक ऐक्य बिघडेल अशा प्रकारचे वक्तव्य करू नये.

स्त्रियांवरील अत्याचार कमी होत नाहीत राज्यात त्यासाठी महिला आयोग आहे परंतु त्यांच्याकडून फारशी कामे होत नाहीत आणि त्यामुळे त्याविषयी मोठ्या प्रमाणावर नाराजी आहे, याविषयी विचार करुन कार्यवाही व कारवाई होणे आवश्यक आहे.

या सर्व गोष्टीत काही ना काही चांगले करणे म्हणजे संकल्पच आहे. कुठलीही चांगली गोष्ट ठरवून ती पूर्णत्वास नेणे हाच खूप मोठा संकल्प आहे. आणि याचाच विचार आपण सगळ्यांनी करून जे जे चांगले आहे समाजाच्या हिताचे आहे आपल्या स्वतःच्या हिताचे आहे ती करण्याचे ठरवावे हाच सर्वांसाठी 2023 सालाचा संकल्प समजावा. येणारे वर्ष सगळ्यांना सुख-समृद्धीचे आनंदाचे जावो ही शुभेच्छा !!

# भूल जा बाता....

आधुनिक केसरी

**कवी डी के शेख यांची नुकतीच ताजी टवटवीत दखनी तडका रचना वाचायला मिळाली. अत्यंत सुंदर रचना आहे या रचनेचा गर्भितार्थ उलगडण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. बीते रातां भूल जा बातां दिलमें रखिंगे अपना नाता, संसार चक्की घुमते रयती, सुक दुक आता होर जाता, किस किस का तू सोचिंगा ? फिरिंगा अच्चा खासा माथा, जान लगाव कित्तीबी तूम, दिलका टुकडा मारता लाता, ईदर की उदर होंदेव दुनिया, फकीर डफली बजाता गाता**

**"बीते रातां भूल जा बातां"**
**"दिलमें रखिंगे अपना नाता"**

कवी डी के शेख यांच्या दखनी तडक्यातल्या पहिल्या दोन पंक्ती वाचल्या आणि मला "आपली माणसं" या चित्रपटातील उषा मंगेशकर आणि महेंद्र कपूर यांनी गायलेलं राम कदम यांनी संगीतबद्ध केलेल्या गीताची आठवण झाली

**"जीवनगाणे गातच रहावे"**
**"झाले गेले विसरुन जावे, पुढे पुढे चालावे."**

अतिशय समर्पक गाण्याचे बोल डी के शेख यांच्या या दोन पंक्तीला लागू होतात. मानसानं मनात दुःख ठेवू नये. झालं गेलं विसरून एकमेकांना आधार द्यावा, मनातलं हितगुज एकमेकांना सांगावं. मनात एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा स्नेहाचं नातं जपलं पाहिजे. रोज नवा दिवस उगवतो, गेलेला काळ परत येत नाही तसेच काल काय झालं ते विसरून नवीन दिवसांची सुरूवात नव्या विचारांनी केली तर जीवन समृद्ध होते. या अतिशय गर्भित अर्थानं कवी डी के शेख यांच्या दखनी तडक्यातल्या या दोन पंक्ती आल्या आहेत.

संसाररूपी या जगरहाटीत सुखदुःख कुणाला टळले नाही. सुख मिळविण्यासाठी दुःखाचे चटके सहन करावेच लागतात. प्रत्येकाला या सुखदुःखाच्या फे-यातून जावेच लागते. प्रपंच असो वा समाज दोन्हीतही सुखदुःखाचे चटके, चांगल्या वाईट गोष्टींचे अनुभव येत असतात. या विश्वाच्या पसा-यात भलेबुरे घडतच असते त्याची चिंता करायची नसते म्हणूनच कवी म्हणतात की -

**"संसार चक्की घुमते रयती"**
**"सुक दुक आता होर जाता"**

समाजात अनेक विचारांची माणसं आपल्या आयुष्यात येत असतात. "पिंड पिंड मतिर्भिन्ना" या उक्तीप्रमाणे प्रत्येकाच्या मतीत काही तरी वेगळेच असते. जो तो आपल्या बौद्धिक क्षमतेवर आपल्याला उपदेश देत असतो, कधी दुषणे देत असतो तर कधी कधी सुखाची अनुभुती देत असतो. यातून चांगले काय ते घ्यायचे बाकी निरर्थक सोडून द्यायचे. कारण प्रत्येकाच्या मताचा विचार जर केला तर आपल्याला काम करणे अवघड होईल, निर्णय घेणे अडचणीचे ठरेल. आपणच आपल्या मेंदूला ताण देवून स्वास्थ्य खराब करून घेऊ. म्हणून इतरांबद्दल विचार करण्यात बसू नका. कोणाकोणाचा विचार करत बसणार, त्यामुळे चांगल्या सुपिक आपल्याच डोक्याला त्रास होईल. म्हणून कवी म्हणतात की-

**"किस किस का तू सोचिंगा ?"**
**"फिरिंगा अच्चा खासा माथा"**

दिवसेंदिवस माणूस बदलत चालला आहे. समाज त्याला जशी अक्कल देईल तसा त्याचा मेंदू काम करायला लागला आहे. प्रत्येकजण स्वार्थाला कवटाळतांना दिसून येत आहे. चांगल्या वाईटाचा सारासार विचार न करता मनुष्य मृगजळी व्यवस्थेच्या मागे धावताना दिसत आहे. आपलं कोण, परकं कोण? याचा विचारच डोक्यात घुसेना असा झाला आहे. स्वतःच्या आईबापाला मुले जीव लावत नाहीत, भाऊ भावाला यमसदनी पाठवत आहे. काही काही औलादी तर ज्याला नऊ महिने गर्भात वाढवून लहानाचा मोठा केला ती नालायक औलादही आईच्या जीवावर उठलेली समाजात आपल्याला बघायला मिळते. कितीही जीव लावला तरी आई बापाला लाता घालणा-या अशा औलादींबद्दल अशा नालायक व्यवस्थेवर कवी मन व्यथित होते , समाजातील या भंपक, नालायकाबद्दल कवी म्हणतात की -

**"जान लगाव कित्तीबी तूम"**
**"दिलका टुकडा मारता लाता"**

समाजात सर्वात सुखी जर कोणी असेल तर तो मजूर, ज्याला आज कमावायचे आणि आजचं खर्च करायचे. उद्याची भ्रांत नाही, कुणासाठी संचय नाही, आज ज्याच्या आशीर्वादाने, पुण्याईने दोन घास टिचभर पोटाला मिळाले त्याला धन्यवाद देवून उद्या उगवणा-या चांगल्या दिवसांसाठी सुखाची झोप घेणारा हा मजूर , कष्टकरी समाज हा आज जगातला सुखी आहे. दुनिया इकडची तिकडं झाली तरी त्याला त्याच्याशी काही देणं घेणं नसतं. तो आपल्या स्वतःच्या विश्वात रमत असतो. तो फकीर असतो, त्याची झोळी नेहमी खाली असते. कवी म्हणतात की "फकीर डफली बजाता गाता" म्हणजे हा निर्धन मजूर ज्याला उद्याची चिंता नाही तो डफली बजाता गाता म्हणजे स्वतःच्याच विश्वात रमलेला असतो. त्याला कुणीच्याही वैभवाशी स्पर्धा करायची नसते किंवा त्याचा हव्यासही नव्हतो.

**"ईदर की उदर होंदेव दुनिया"**
**"फकीर डफली बजाता गाता"**

**प्रशांत शहादू वाघ (पॅसिफिक टायगर)**
**संपर्क - तीन सत्ते एकोणचाळीस पंचवीस हजार**

# विद्यार्थी - शिक्षक आंतरक्रियेचा अनुभवकोष... गुरूजी तू मला आवडला !

आधुनिक केसरी

**विद्यार्थी आणि शिक्षक ह्या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. एका शिवाय दुसऱ्याच्या अस्तित्वाला अर्थ नाही. या दोन्ही घटकांत सतत आंतरक्रिया होत असते. शिक्षकाचा विद्यार्थ्यांवर तसेच विद्यार्थ्यांचा शिक्षकावर आपसूकच परीणाम होत असतो. या परीणामाच्या परीपाकातूनच मग अध्ययन - अध्यापन प्रक्रिया रूप घेत जाते. निकोप आंतरक्रियेतून मग 'गुरूजी तू मला आवडला' यासारखे पुस्तक आकारास येते.**

युवराज माने हे जि. प. शाळा पारडी ता. शेलू जि. परभणी या शाळेतील प्राथमिक शिक्षक आहेत. आपल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे 'उपक्रमशिल शिक्षक' म्हणून राज्यभर परिचीत आहेत. शाळेतील मुलांना छोट्या छोट्या प्रसंगांतून, कृतीतून ज्ञानेंद्रियांना सतत तत्पर ठेवत मुलांना आनंददायी पद्धतीने शाळेत रमवण्याचे काम ते आनंदाने करतात.

मुलांना सतत नाविण्याचा ध्यास लावणारे माने सरांनी मुलांच्या मनात 'आनंदाचे झाड' ही संकल्पना रूजवण्याचे काम केले आहे. शाळेतील प्रत्येक मूल हे आनंदाचा अखंड वाहता झरा आहे. त्यालाच 'आनंदाचे झाड' संबोधून त्याला फुलवण्याचे काम ते करताहेत. गुरूजी तू मला आवडला हे अशाच प्रयत्नांचा अनुभवकोष आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांना शाळेने आपलेसे केले तर परत आयुष्यभर ते मूल शाळेला दांडी मारण्याचा विचारही करणार नाही. मुलांचे शाळेत मन रमावे यासाठी शाळेच्या पहिल्याच दिवशी माने सरांनी मुलांना रंगांसोबत खेळवण्याच्या प्रयत्नाने मुलांना शाळा आपलीच वाटली. याचा प्रत्यय आपल्याला 'अरे, इथे मजा आहे की!' या पहिल्याच प्रसंगात वाचायला मिळते. आणि या पुस्तकात अजून काय काय दडलेलं आहे याची आपसूकच उत्सुकता वाचकाला लागते.




मुलांना शाळा, शिक्षक आपले वाटावे, शाळेत येताना त्यांच्या मनात भिती न राहता एकप्रकारचा उत्साह राहावा. मुले फुलताना ते आनंदाची झाडं व्हावीत. समाजाला ज्यांचा अभिमान वाटेल अशी मुले घडवण्याचा माने सरांनी केलेला प्रयत्न प्रत्येक शिक्षकासाठी प्रेरणादायी ठरावा असा आहे. पुस्तक वाचताना पुस्तकाच्या पानापानांवर एका प्रामाणिक प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या निष्ठावंत शिक्षकाच्या मेहनतीचा गंध दरवळताना दिसतो. खेळातून शिकण्याकडे, संवादसेतू, अस्तित्व सहचरांचं, सहलगाडी, मुलांचा अमूल्य खजिना, नवे मित्र येणार अशा जाणिवपूर्वक राबवलेल्या उपक्रमांतून मुलांना आपण माणूस म्हणून जगताना आपले पर्यावरण, मित्र, अवतीभवतीचे पशू पक्षी यांच्या अस्तित्वाची जाणिव करून देणे खूपच महत्वाचे आहे. झाडे लावण्यासाठी मुलांनी बिया आणने, त्या इवल्या इवल्या हातांनी लावणे, मातीत लपून बसलेल्या बिया काही दिवसांनी बाहेर रूप बदलून बाहेर पडणे हे बालमनाला अत्यंत आनंदाची भरती आणणारे आहे. हाताचे ठसे घेणे, चित्रगप्पांतून बालमन उलगडणे, ज्ञानेंद्रियांना आपले मित्र संबोधून ज्ञानेंद्रियांची करून दिलेली ओळख नाविण्याचा ध्यास घेणाराच करू शकतो. मुलांचं मन हे टिप कागदासारखं असते. त्यांच्या सभोवती घडणारे बदल, दिसणारे दृश्य, अनुभवलेले प्रसंग ते सतत त्यावर टिपत असतात. अशा मनरूपी टिपकागदावर संस्कारक्षम अनुभवांचे टिपण होत गेले की, आयुष्य समृद्ध होतं. हे टिपकागद समृद्ध अशा अनुभवांनी भरण्याचा लेखकाने सतत प्रयत्न केलेला आहे. शिवार भ्रमंती, चिखलातले मुळाक्षरे, शाळेतलं स्वयंपाकघर, ताटातली आरोग्यशाळा, वर्गसभा, संगे राहू संगे खाऊ, कुतूहलपेटी, बालसभा अशा मुलांना अनुभव संपन्न करणाऱ्या उपक्रमांच्या माध्यमातून माने सरांनी मुलांना प्रत्यक्ष अनुभव देत शिकण्याची शिकवण्याची प्रक्रिया आनंदायी केली आहे.

प्रत्येक मूल हे एकापेक्षा वेगळं असतं. प्रत्येकाला स्वतंत्र मन आणि मेंदू असतो. त्याला सतत वेगवेगळ्या कल्पना येत असतात. नवनवे प्रश्न पडत असतात. ते आपल्या कुवतीनुसार विचारही करत असतात. अशा लेकरांना वेळीच योग्य मार्गदर्शन आणि योग्य प्रमाणात खतपानी मिळाले तर या कल्पनेचे रूपांतर कल्पकतेत होण्यास वेळ लागत नाही. या पुस्तकातील 'एक क्षण आपुलकीचा', 'आरसा मुलांच्या मनांचा', 'शाळेच्या अंगणातील कल्पनांची कारंजी', 'चित्र - बालमनाचा आरसा', 'वाचनसेतू' यासारखे उपक्रम वाचले की माने सरांनी मुलांच्या मनावर केलेल्या सिंचनाची आपल्याला कल्पना येते.

पुस्तकाला लेखक तथा माजी राज्य प्रकल्प समन्वयक भाऊ गावंडे यांनी दिलेली समर्पक अशी प्रस्तावना आणि वयम मासिकच्या मुख्य संपादक शुभदा ताई चौकर यांनी केलेली पाठराखण माने गुरूजींच्या या अनुभवकोषाला वेगळ्या उंचीवर घेऊन जाते. माने सरांच्या प्रयास आणि तन्मय या दोन्ही मुलांनी केलेली मुखपृष्ठाची रचना मुलांच्या भावविश्वाला अधिक ठळकपणे प्रदर्शित करणारे आहे. दिलीपराज प्रकाशनने केलेली पुस्तकाची रचना आणि निर्मिती आकर्षक अशी आहे. माने सरांचा हा अनुभवकोष शिक्षक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रत्येकाने एकदातरी वाचावा आणि आपल्या संग्रही ठेवावा असाच आहे.

**पुस्तकाचे नाव - गुरूजी, तू मला आवडला!**
**पुस्तकाचे लेखक - युवराज माने**
**प्रकाशक - दिलीपराज प्रकाशन, पुणे**
**मूल्य - २८०**

गुलाब बिसेन
संपर्क क्र. 9404235191

# जला जाणूया नदीला; शिवना नदी संवाद यात्रा !

## नद्यांच्या प्रदूषणमुक्तीसाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा उपविभागीय आधिकारी मानसिंग आहेर

आधुनिक केसरी न्यूज

**शांताराम मगर**

**वैजापूर :** नदीप्रदूषण पूर्णपणे मानवनिर्मित आहे. दोन-अडीच दशकांपूर्वी राज्यातील नद्यांची स्थिती चांगली होती. मुले लहान वयातच नदीत पोहण्यात तरबेज व्हायची. पूर आला की, बिनदिक्कतपणे सूर मारायची. नदीला आता अवकळा आली. जीवनदायिनी मृतप्राय झाली आहे.

जला जानुया नदीला या आभियाना अंतर्गत वैजापुर तालुक्यातील शिवना नदी स्वंवाद यात्रेला सुरुवात मालेगाव कन्नड येथुन सुरुवात करण्यात आली. झोलेगाव जांबरखेडा लाखणी मांडकी भायगा राजुरा येथील ग्रामस्थ विद्यार्थ्यांकडून स्वंवाद यात्रेचे ढोल लेझीम पथकाने जंगी स्वागत करण्यात आले यावेळेस उपजिल्हाप्रमुख विभागीय आधिकारी मानसिक आहेस.प्र.तहसीलदार महाजन गट विकास आधिरकारी हरकळ कुषी एधिकारी एच आर बोयनार संवाद यात्रेचे समन्वयक गोकुळ सुरासे सतिश वाघ विपीन साळे आवर्जुन घोडके रुपके वाघ विस्तार आधिकारी आर आर शिनगारे वनविभाचे आधिकारी तलाठी मंडळ आधिकरी ग्रामसेवक सरपंच पोलीस पाटिल गावकरी यांचा मोठा सहभाग होता.

पुढे बोलतांना मलिक आहेर म्हणाले जलदाहिनी समझल्या जाणार्या नद्या बेसुमार जंगलतोड आतिक्रमण आणि अनियंत्रित वाळूउपशाने नद्यांची दुरवस्था आहे.येथील जमीन खडकाळ असल्याने पाणी जिरण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने नद्या पावसाळ्यातच वाहतात. शिवना नदि काठ सुजलाम-सुफलाम आहे. नद्यांचा प्रवाह खंडित झाल्याने जलसंस्कृती लोप पावली आहे. वाहणाऱ्या नद्या आहेत; परंतु नियोजनाअभावी दरवर्षी टंचाईचा सामना करावा लागतो. पाण्याचे स्त्रोत घटता आसुसून शिवना गोदावरी,पाऊस होऊनही टंचाईला सामोरे जावे लागते. कचरा, सांडपाणी व मैलामिश्रित पाण्यामुळे नदी प्रदूषित आहे. का होते नदी धूप थांबविणारी वनसंपदा नष्ट, खोऱ्यात जंगलतोड नदीकाठावरील सिमेंट, डांबरी रस्त्यांमुळे भूगर्भात पाणी न मुरणे अखंड प्रवाहाचे भूमिगत झरे, कुंड आटणे; त्यांचे नाल्यात रूपांतर,होऊन



गावातीलघरगुती, दूषित प्रक्रियाविरहीत पाणी; तसेच घनकचरा नदीत टाकणे निर्माल्य विसर्जित करणे सौंदर्यीकरणाच्या नावाखाली नदीकाठावर कॉंक्रिटीकरण, पात्रात वीटभट्ट्या आणि अतिक्रमणेपरिणाम नदीप्रदूषणाचे मगरी, मासे, पाणपक्षी, कासव, खेकडे,झिंगे यांच्या प्रजाती धोक्यात आल्या आहे नद्यांभोवती वृक्षारोपण करणे नद्यांचे खोऱ्यातील भूजलस्तर वाढवण्यासाठी सर्वानी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# पेव्हर ब्लॉक सिमेंट रस्त्यावर बसवल्यास उपोषणाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पिरबावडा :** जिल्हा परिषद अंतर्गत शेलगाव खु येथील दलित वस्तीत पेव्हर ब्लॉक बसवण्याचे काम आलेले असून सदरील पेव्हर ब्लॉक हे सिमेंट रस्त्यावर ग्रामपंचायत सदस्याच्या घराजवळ बसवण्यास शेलगाव येथील ग्रामस्थांचा तीव्र विरोध असताना ग्रामपंचायत पदाधिकारी हेतुपुरस्कर पणे हे काम करण्याचे प्रयत्न करत असल्याने शेलगाव खु येथील ग्रामस्थांनी गट विकास अधिकारी व आदी वरिष्ठांना वेळोवेळी निवेदन दिलेले असून ही सदरील पेव्हर ब्लॉक साठे नगर दलित वस्तीत होत नसल्याने शेलगाव खु येथिल दलित वस्तीमधील रहिवाश्यानी आज गट विकास अधिकारी यांना निवेदन दिले आहे निवेदनात म्हंटल आहे की शेलगाव खु दलित वस्तीत आलेले पेव्हर ब्लॉक ग्रामपंचायत सदस्य यांच्या घरासमोरील सिमेंट रस्त्यावर न बसवता ते साठे नगर मधील सभागृह परिसरात बसवण्यात यावे सदरील कामाचे अंदाजपत्रक व कार्यरंभ आदेश ही जनतेला उपलब्ध करुन देण्यात यावे अन्यथा 26 जानेवारी रोजी आमरण उपोषणाचा इशारा देण्यात आलेला आहे या निवेदनावर पंडित साठे, सोमीनाथ साठे, दादाराव साठे, शिवाजी साठे, कैलास साठे, विलास साठे, केसरबाई साठे आदींच्या सह्या आहेत.

> शेलगाव खु येथील दलित वस्तीच्या कामात ग्रामपंचायत भेदभाव करत असून साठे नगर मधील दलित वस्तीत कामे केली जात नाहीत येथील रहिवाश्यांची अडवणूक केली जाते, वयक्तिक लाभाच्या योजना ग्रामपंचायत सदस्यांना दिल्या जातात . आता पेव्हर ब्लॉक बसनवण्याची गरज साठे नगर वस्तीत असताना ग्रामपंचायत पदाधिकारी मुद्दाम ग्रामपंचायत सदस्याच्या घरासमोर सिमेंट रस्त्यावर बसवणंयाचा प्रयत्न करत असून आमचा ह्या मनमानीला तीव्र विरोध असून जर 26 जानेवारीपर्यत हे काम साठे नगर मध्ये झाले नाही तर आमरण उपोषण करण्यात येईल .
>
> **पंडित साठे शेलगाव खु ग्रामस्थ**

# नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई; सपोनि वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** फर्दापूर राज्यासह संपूर्ण भारतात



मकरसंक्रांतीचा पतंगोत्सव मोठ्या थाटामाटात उत्साहात साजरा करण्यात येतो.. पतगोत्सवाचा आनंद घेण्यासाठी लहानांपासून चोरल्यांपर्यंत सर्वच नागरिक घेत असतात. सोयगाव तालुक्यात विविध सावळदबारा परिसरात पतंग व मांजा विक्रेत्यांनी आप- असतात. पतंगोत्सव मोठमोठ्याने गाणे लावून नृत्य पर्यावरणाची काळजी व सांभाळ मांजा प्रसंगी लोकांना दुखापत होवुन आपला देखील जीव गमवावा लागतो.उदाहरण आपण वर्तमानपत्र प्रसारमाध्यमांद्वारे बातम्या वाचलेला आहे. आपली दुकाने मांडलेली अशा प्रकारच्या पंतग उडविण्याच्या धाग्यामुळे मानव जिवितांस संरक्षण अत्यंत गरजेचे आहे. परंतु सण साजरा करून आपली दुर्मिळ व नष्टप्राय होत असलेल्या फर्दापूर पोलीस ठाण्याचे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी सांगितले.

संस्कृती टिकवत असतांना निष्पाप पक्षांचे संरक्षण करणे

पतंग उडवितांना केलेल्या नायलॉन मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होऊन आग लागणे, उपकेंद्र बंद पडणे अपघात घडणे इजाजत शक्यता नाकारता येत नाही, नागरिकांना आवाहन करण्यात येते प्लॅस्टीक किंवा तर कृत्रीम वस्तु पासून बनवलेल्या नायलॉन मांजा या नावाने परिचित असलेल्या पक्या याचा वापर पतंग उडविणाच्या बंदी घालण्यात आलेली आहे. तसेच नायलॉन मांजाची किरकोळ विक्री किंवा प्रमुख विक्रेत्याचा शोध घेवून त्याचेवर पर्यावरण ( संरक्षण ) अधिनियम १९८६ च्या कलमान्वये कारवाई करण्यात येईल वस्तूंपासून पर्यावरणास हानी माजांची विक्री, साठवणुक किया सदरची कामगिरी पोलीस हाताळणी करणायांवर देखील कारवाई करण्यात येईल असे आवाहन फर्दापूरचे पोलिस सहाय्यक पोलीस निरीक्षक देवीदास वाघमोडे यांनी केले आहे.

# ठाणे जिल्हा परिषदेच्या उपशिक्षणाधिकारीपदी अरुण शिंदे

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** तालुक्यातील बोरसर येथील जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक अरुण शिंदे यांना ठाणे जिल्हा परिषद येथे उपशिक्षणाधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली असून त्यांच्या या पदोन्नती बद्दल सर्व मित्रपरिवार, नातेवाईक, सहकारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या आहे. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ए. वाय. शिंदे, शिक्षक बि. एस. वाठोरे, आर. एस. गायके, पी. के. शिंपी,आर एस नवले,केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक एस सोनवणे, डी एस गायकवाड, जी नाईक, के पांढरे सह अंगणवाडी सेविका कविता एम. गायके, ए. टी. भोजने, विद्यार्थी आदीसह माजी विद्यार्थी व शाळेचे कर्मचारी यांची उपस्थिती होती.







# जल जीवन मिशन की, अभियंता - गुत्तेदारांचे राशन

## निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या अभियंता व गुत्तेदारावर कारवाई होणार का ?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** धर्माबाद तालुक्यात जल जीवन मिशन योजने अंतर्गत होणारे काम इस्टीमेट नुसार होत नाही अशा तक्रारी प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील वृत्त दैनिक आधुनिक केसरीने प्रकाशित केले होते.याची दखलं आमदार राजेश पवार यांनीही घेतली होती.तसेच माझ्या मतदार संघातील कोणत्याही योजेनेत गैर व्यवहार होत असेल तर त्यांची गय केली जाणार नाही असा इशारा दिला होता. विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार गुत्तेदार व अभियंता आमदार महोदयाच्या भेटीस गेले होते. मात्र ही भेट नेमकी कशासाठी होती ह्या भेटीचे कारण मात्र गुलदस्त्यात आहे. देश स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना लोकांना साधं व स्वच्छ पिण्याचे पाणी मिळू नये हे दुर्दैवी आहे.ही निकडं भागविण्यासाठी केंद्र सरकारने जल जीवन मिशन योजना सुरु केली. हर घर नल, हर घर जल हे उदिष्ट ठेवण्यात आले.त्यासाठी हजारो कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली.


केसरी
जल जीवन मिशन योजना बनतेय, गुत्तेदार व अभियंताचे कुरण

धर्माबाद तालुक्यात ही जल जीवन मिशन योजने अंतर्गत कामे प्रगती पथावर आहेत.मात्र या कामांचा दर्जा अत्यंत सुमार आहे अशा तक्रारी झाल्या आहेत. मात्र गुत्तेदाराचे वर्तन पाहता सताधाऱ्यांशी हात मिळवणी करून मलाई लाटता येईल असा विश्वास गुत्तेदाराना वाटतो की अशी? अशी शंका लोकांना वाटत आहे. या कामात होणाऱ्या गैर व्यवहाराच्या अनुषंगाने वर्तमानपत्रातुन बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर आमदार राजेश पवारांनी या संदर्भात आवाज उठविण्याचा इशारा दिला होता.

त्यानंतर गुत्तेदार व अभियंत्यांनी आमदारांची भेट घेतल्याची माहिती समोर आली.

मात्र ही भेट कशासाठी होती? या भेटीत नेमकी काय चर्चा झाली? ह्या भेटी नंतर पुढील चौकशी होणार का? या सारखे प्रश्न उपास्थित होत आहेत.या योजने चे ऑडिट व्हावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

जल जीवन मिशन योजनेत भ्रष्टाचार झाला की नाही यासाठी पारदर्शक चौकशी होण्यासाठी एकादी समिती नेमली जाणार का?

# गोद्री कुंभमेळ्यानिमित्त सहा बसस्थानके

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** तालुक्यातील गोद्री येथे होत असलेल्या २५ जानेवारी ते ३० जानेवारी २०२३ रोजीच्या कुंभमेळा करीता होणाऱ्या हिंदू गोर बंजारा लभाना नायकडा समाजाच्या महा कुंभमेळ्यासाठी सहा ठिकाणी तात्पुरते बसस्थानक उभारण्यात येणार आहे. अशी माहिती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण (नादांतांडा) यांनी उपसंपादक गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना सांगितले. प्रभारी जिल्हाधिकारी प्रवीण महाजन यांनी कुंभ मेळाव्याची आढावा बैठक घेतली होती.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# कल्याण येथे राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मनस्पर्शी साहित्य परिवार यांचे वतीने रविवार दिनांक ८ जानेवारी २०२३ रोजी पहिल्या राज्यस्तरीय काव्य संमेलनाचे आयोजन कल्याण येथील सिद्धीविनायक गार्डन हॉल , बिर्ला रोड, भोईरवाडी या ठिकाणी करण्यात आले आहे. या निमित्ताने महाराष्ट्रातील प्रतिभावान व नवोदीत साहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ मिळावे, त्यांच्या साहित्याला नवी ओळख मिळावी या उद्देशाने या साहित्य संमेलनाचे आयोजन होत आहे.




"मनस्पर्शी साहित्य परिवार" हा व्हॉट्सॅप समूह २४ जुलै २०१९ रोजी काही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सुरू केला आहे. गेली तीन वर्षे या समूहात लेखनाचे असंख्य उपक्रम राबवून साहित्यिकांच्या लेखणीला प्रोत्साहन देत मनस्पर्शी कार्यरत आहे. या समूहात दररोज दैनंदिन उपक्रमाअंतर्गत वेगवेगळे विषय दिले जातात व त्यावर मुक्तपणे आवडत्या लेखन प्रकारातून व्यक्त होण्याची संधी मिळते. समूहातर्फे विविध विषयांवर वेगवेगळ्या राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजनही केले जाते. सुरुवातीला अगदी ३ सदस्यांपासून सुरू केलेला हा समूह आज जवळपास ५००० सदस्यांच्या संपर्कात आला आहे. आजवरच्या ३ वर्षाच्या साहित्य सेवेत सक्रिय असताना या समूहाने २७ विशेष काव्य स्पर्धा,५ लेख स्पर्धा,३ कथा स्पर्धा,२ अलक स्पर्धा,१० ऑनलाईन काव्य संमेलन, एक गझल मुशायरा, आणि एक महास्पर्धा वेळोवेळी घेण्यात आल्या. यामधील विजेत्यांना रोख पारितोषिके व ऑनलाईन प्रमाणपत्रे देवून गौरविण्यात आले. त्यामुळे समूहाशी अनेक साहित्यिक जोडले गेले. मनस्पर्शी साहित्य परिवाराचे भव्य राज्य स्तरीय काव्य संमेलन दि. ८ जानेवारी,२०२३ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ पर्यंत चालणार आहे.या संमेलनाचे उद्घाटक - मा. दत्तात्रय शिंदे, स्वागताध्यक्ष कवयित्री प्रा. मानसी जोशी, संमेलनाचे प्रमुख वक्ते आनंद लेले हे असून मुख्य संमेलनाध्यक्ष म्हणून कवयित्री व लेखिका प्रा. प्रतिभा सराफ या उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी मान्यवर कवयित्री कल्पना गवारे, लेखिका राधिका भांडारकर ,अस्मिता पंडित हे असून मनस्पर्शीच्या कु. मानसी पंडित तसेच मा. प्रा. विजय काकडे हे व्याख्याते संमेलनात महत्वाचे स्थान भूषविणार आहेत. या संमेलनाचे सूत्रसंचालन मनस्पर्शी साहित्य समुहाचे प्रशासक व युवा कवी मा. निखील कोलते व समूहाच्या अध्यक्षा मानसी ताई पंडित करणार आहेत. या संमेलनास प्रायोजक म्हणून ठाणे येथील तन्वी हर्बल्स तर्फे डॉ. मानसी मेहेंदळे धामणकर यांनी खूप मोलाचे सहकार्य करून संमेलनासाठी महत्वाचे योगदान दिले आहे. संमेलन यशस्वी करण्यासाठी निखील कोलते.,राजेश नागुलवार,जयश्री चौधरी,सौ मधुरा कर्वे, . सौ सोनाली जगताप, जयश्री शेळके, सौ. संपदा देशपांडे, आनंद लेले यांनी कार्यकारणीचे सदस्य आपले अमूल्य योगदान देत आहेत. पहिल्याच पण भव्य दिव्य कवी संमेलनात प्रथम नावनोंदणी करणाऱ्या एकूण ३५ निमंत्रित कवींना संधी देण्यात आली आहे. त्या प्रत्येक सहभागी सर्व कवींना उपस्थित मान्यवरांचे हस्ते आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.




नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
ग्रामपंचायत कार्यालय तिसगाव व तिसगाव तांडा
तालुका खुलताबाद जिल्हा औरंगाबाद
सरपंच संतोष विधाते, उपसरपंच गणेश चव्हाण, तिसगाव तांडा सरपंच प्रमोद राठोड, उपसरपंच सुभाष पवार, ग्रामसेवक शिवाजीराव वावरे
2023 HAPPY NEW YEAR